# माणूस

शनिवार । ३ एप्रिल १९७६ । एक रुपया



## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : त्रेचाळीसावा** (४३)

३ एप्रिल १९७६

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# नंदादीप

आधुनिक मराठी साहित्याच्या जन्मापासून आजतागायत भाऊसाहेब खांडेकरांना लाभला इतका मानमरातब व प्रेमादर कुणाही साहित्यिकाला लाभलेला नसेल. असा भाग्यवान साहित्यिक विरळाच. एकही बहुमान आता भाऊसाहेबांना लाभायचा राहिलेला नाही. श्रीमंत-गरीब, उच्च-नीच, ग्रामीण-शहरी असा कुठलाही भेदभाव भाऊसाहेबांच्या लोकमान्यतेच्या आड येत नाही. खेड्यापाड्यांपासून दिल्लीपर्यंत ठिकठिकाणी त्यांचे उत्स्फूर्त आणि आपुलकीच्या भावनेने ओथंबलेले सत्कार सुरू आहेत आणि अजूनही ही मालिका संपलेली नाही. हा त्यांच्या साहित्याचा निर्भेळ गौरव आहे असेही नाही. उच्चभ्रू टीकाकार व सौंदर्यसमीक्षक भाऊसाहेबांच्या साहित्याला फार श्रेष्ठ समजत नाहीत, हे आता गुपित राहिलेले नाही. कुणी हे प्रकटपणे, कुणी आडपड्याने सूचित करतो एवढेच. भाऊसाहेबांपेक्षा उच्चदर्जाची वाङ्मयनिर्मिती करणारे भाऊसाहेबांच्या काळात, तसेच आजही अनेक असू शकतील. तरीपण भाऊसाहेबांना जे रसिक वाचकांचे प्रेम मिळाले, भाऊसाहेबांबद्दल मराठी माणसाला जो जिव्हाळा व आदरभाव उपजतच वाटतो तसा अन्यकुणा साहित्यिकाबद्दल क्वचितच वाटत असावा. या चमत्काराचे मूळ कशात असावे? अनेकांनी अनेक कारणे सांगितलेली आहेत. पण मुख्य कारण हे जाणवते की, भाऊसाहेबांनाही समाजाबद्दल एकप्रकारचा उपजत जिव्हाळा सुरुवातीपासूनच वाटत आलेला आहे. सामाजिक जिव्हाळा ही त्यांच्या साहित्यनिर्मितीची आद्य प्रेरणा वाटते. जुन्याकाळी हरिभाऊ आपटे, आगरकर हे त्यांचे आदर्श असतील. पुढे गांधी–मार्क्स यांचा त्यांच्या लिखाणावर प्रभाव पडला असेल. आता कदाचित भाऊसाहेब महाभारतात रममाण झाले असतील. पण हा सगळा प्रवास कशासाठी होता किंवा अजूनही तो चालू आहे? त्यांना वाटणाऱ्या माणसांबद्दलच्या सहानुभूतीपोटी, असे या चिरं-

तन प्रवासाचे उद्दिष्ट सांगता येईल. त्यांच्या साहित्यात कृत्रिमपणा आहे असे समीक्षक खुशाल म्हणोत पण त्यांतले शब्द, विचार, प्रामाणिक व कळकळीचे आहेत, आपल्या सभोवतालच्या जीवनाविषयी वाटणाऱ्या ओतप्रोत जिव्हाळ्याने भरलेले आहेत, असा अनुभव आज चार पिढ्यांना येतो आहे. भाऊसाहेब केवळ लोकप्रिय लेखक नाहीत. लोकप्रिय साहित्यिक आणखीही काही होते व आहेतही. फडक्यांना पाहायला–ऐकायला, त्यांचे साहित्य वाचायला मराठी रसिकांनी काही कमी गर्दी केली नव्हती. फडक्यांचे साहित्य तंत्रदृष्ट्या अधिक निर्दोषही ठरवले गेलेले आहे. पण फडके फार तर केवळ लोकप्रिय लेखक राहिले. भाऊसाहेबांप्रमाणे त्यांच्या कीर्तीचा नंदादीप घरांघरांतून उजळला नाही. त्या दीपापुढे नमोस्तु ते, नमोस्तु ते ! म्हणावे असे कुणाला वाटले नाही. कारण असे वाटण्यासाठी केवळ लोकप्रियता पुरेशी पडत नाही. मायेचा, प्रेमाचा, आंतरिक स्नेहाचा अतूट धागा कुठूनतरी जुळून यावा लागतो. खांडेकरांच्या स्वभावातच हा धागा विणला गेलेला असल्याने ते केवळ फडक्यांप्रमाणे ओसरीवर ऐटीत बसलेले राहिले नाहीत, तर अगदी माजघरात, देवघरात जाऊन पोचले. घरच्यांसारखे केव्हा एकरूप होऊन गेले, कळलेच नाही. साहित्यिक असूनही हाडाचे शिक्षक असल्यामुळे हा चमत्कार सहजपणे घडून आला. शिक्षकाला हवी तशी समाजाच्या भल्याविषयी एक उपजत कळकळ भाऊसाहेबांजवळ आहे. या कळकळीचे रूपांतर एखाद्या ठामठोक तत्त्वज्ञानात, विचारसरणीत त्यांनी कधी केले नाही. तो त्यांचा पिंडच नाही. भौतिक स्थिती सुधारली की माणूस सुधारेल असे त्यांना एकेकाळी तीव्रतेने वाटत होते. आता भौतिकाच्या मागे वेड्यासारखे धावू नका असे त्यांचा ' ययाती ' सांगतो आहे. समाजाला असे सारखे काही सांगत राहण्याची ओढ, उत्स्फूर्त तळमळ हा शिक्षकाचा स्थायीभाव असतो आणि या स्थायीभावात भाऊसाहेबांच्या प्रभावाचे रहस्य आहे. भाऊसाहेबांचे गौरव हे एका जातिवंत शिक्षकाचे गौरव आहेत. शाळा आणि साहित्य ही या शिक्षकाची दोन प्रमुख माध्यमे. चित्रपट माध्यमही या शिक्षकाने काही काळ वापरले, पण तेही समाजाला काहीतरी शिकवण्यासाठी. बोधवादासाठी. बोधाचा अतिरेक



झाला तर तो कंटाळवाणा होतो, हे खरे असले तरी, बोधाची जागा केवळ कला घेऊ शकत नाही हेही तितकेच खरे आहे. आजकाल कमिटमेंटच्या गोष्टी चालतात. या नव्या कमिटेड साहित्यिकांच्या साचेबंद लिखाणापेक्षा भाऊसाहेबासारख्यांचा त्या काळातला कादंबरी-चित्रपटातून केला गेलेला बोध कमी कंटाळवाणा होता, हे त्यांच्या साहित्यावरूनही सहज ध्यानात येईल. बोध म्हटला की काही प्रमाणात तो कंटाळवाणा, ठराविक व पुनरुक्त हा असतोच, त्याशिवाय माणसाची घडणही होत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला काही आकारही संभवत नाही. संस्कारित मनेही याशिवाय निर्माण होत नाहीत. भाऊसाहेबांसारखा शिक्षकच हे कार्य करू शकतो. तो साहित्यिकही असल्यास मणिकांचन योगामुळे हे कार्य अधिक उठावदारपणे साध्य होते. पण साहित्य हा या योगातील मणी आहे. कांचनाशिवाय या मण्यालाही आधार नाही, प्रतिष्ठा नाही. भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वात हा मणिकांचन योग सुरुवातीपासूनच जमून आला आहे. आणि हा योगच त्यांना आजचे भाग्याचे दिवस दाखवतो आहे. दिल्लीपासून कोल्हापूरपर्यंत निघालेली ही भाऊसाहेबांची भाग्ययात्रा एरवी एवढी दुथडी भरून वाहिली नसती, त्यांत जनसामान्यांनी एवढा मनापासून भाग घेतला नसता. ही एका मास्तरांना, गुरूला, उपदेशकाला, ऋषीला त्याच्या विद्यार्थ्यांनी वाहिलेली आदरांजली आहे, ' आमच्यावर चांगले संस्कार केलेत, आम्ही कृतज्ञ आहोत, ' हा या आदरांजलीचा आतला ओला भाव आहे, केवळ साहित्यिकाला लाभलेले हे एक देदिप्यमान यश नव्हे.

**श्री. ग. मा.**

# मी पडलो नाही त्याची गोष्ट

तात्पर्य नसलेली ही गोष्ट आहे. परंतु अशा गोष्टी वाचनाची आता वाचकांना उत्तम सवय लागलेली असल्याने हे लिहिले आहे.

'महाराष्ट्र साहित्य परिषद' नावाची एक बलाढ्य संस्था महाराष्ट्रात आहे. या संस्थेचे प्रमुख कार्यालय पुणे येथे आहे. टिळक पथावरून जाताना बहुतेक वेळा सायंकाळी परिषदेच्या सभागृहात विवाहाचा मोसम असेल तर, स्वागतसमारंभ चालू असतो तो दिसतो. दर्शनी दरवाजा लोटलेला असला, आणि कुलूप नसले की, आत कुणाचे तरी पुस्तक प्रकाशन वा पुण्यतिथी साजरी होते आहे असे खुशाल समजावे. अशा कोणत्याही कार्यक्रमाला साधारणपणे १५ पासून ते ७५ पर्यंत पुणेरी ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध हजर असताना दिसतात. तरुण मुले या इमारतीत चुकून शिरत नाहीत.

अशा या संस्थेचा मी आजीव सदस्य असल्यामुळे, जशी पुण्यतिथ्यांची व सत्कार-समारंभांची निमंत्रणे पोस्टाने येतात, तसाच पत्रिकेचा अंकही दर तीन महिन्यांनी येतो. गेल्या तीन वर्षांतले अंक सहज चाळले तरी, परिषदेत प्रा. भीमराव कुलकर्णी व रा. ज. देशमुख यांचे मोठे बस्तान बसल्याचे जाणवते. दोघेही आपापल्या क्षेत्रात नाणावलेले असल्याने परिषद उत्तम कार्य करीत आहे, याविषयी माझी खात्री होती. मध्यंतरी तिथे व्यंकटेश माडगुळकर, वासू देशपांडे वगैरे निवडून आले होते. ते निवडून का आले आणि राजीनामे देऊन का गेले, यासंबंधी कुणाच्याही मनात कसलेही औत्सुक्यदेखील निर्माण झाले नाही.

अशी ही साहित्य परिषद माझ्या सेवेची वाट पाहत असेल अशी मला कल्पना नव्हती. सुमारे दोन महिन्यांपूर्वी एके दिवशी सकाळी माझे मित्र म. श्री. दीक्षित आले. पलंगावर ऐसपैस बसत म्हणाले–

'म्हटलं तुम्ही भेटता की नाही. दोन वेळा येऊन गेलो.'

'बोला.'

'अहो बोला असे थंडपणे काय सांगता? आजची शेवटची तारीख आहे!'

मला काही समजेना! कसली शेवटची तारीख? पण दीक्षितांनी मला फार वेळ खेळवले नाही. ते म्हणाले–

'साहित्य परिषदेच्या त्रैवार्षिक निवडणुका आलेल्या आहेत आणि तुमचं नाव सुचवलं गेलं आहे. मला तुमचे संमतीपत्र आत्ताच्या आता हवे आहे.'

'माझी अशी थट्टा करणारा हा कोण आहे बुवा? मला विचार केला पाहिजे–'

'विचार कसला करता! तुमच्यासारखी माणसं तिथे गेली पाहिजेत निवडून–'

'पण कशाकरता?'

'कशाकरता म्हणजे कार्य करणारे लोक तिथे गेले पाहिजेत.'

'दीक्षित मला तिथे जाऊन कसलेही कार्य करावयाचे नाही. माझ्यापुढे तसा काही विचार नाही.'

'अहो तुम्ही उभे राहिला म्हणजे रा. ज. देशमुख पडण्याचे चान्सेस वाढले–'

दीक्षितांचा चेहरा मुत्सद्यासारखा झाला. डोळे चकाकू लागले. मला तर ते नाना फडणीस वाटले. मोहन आगाशे सिनेमात गेला तर जाऊ दे. दीक्षितला घ्या म्हणावं घाशीरामात.

माझे डोके गरगरायला लागले. रा. ज. देशमुख केवढा थोरला माणूस. भेटले की प्रेमाने बोलतात. बलदंड प्रकाशक देशमुख निवडून यायला हवेत आणि ते येणारच. परिषदेत बहुतेक वेळा देशमुखच तर दिसतात. आणि असे हे पु. लं.चे बलदंड प्रकाशक पडण्यासाठी मी उभे राहावे असा या नाना फडणीसांचा आग्रह का? मी म्हटले–

'अहो दीक्षित, रा. ज. देशमुख पडणे शक्य नाही. पैज लावतो दहा रुपयांची. दहा नको– एक रुपयाची लावू–'

'अहो तो भयंकर माणूस आहे–'

आणि मग दीक्षितांनी रा. ज. देशमुख हे किती भयंकर आहेत याचे चांगले अर्धातास वर्णन केले. रा. शं. वाळिंबे यांनी हा भस्मासूर निर्माण केला. देशमुख हिटलर आहेत. प्रा. कुलकर्णी, रा. चिं. ढेरे, शं. दा. पेंडसे, अर्जुनवाडकर यांचा त्यांनी बळी घेतला वगैरे दीक्षित सांगत होते. एवढी घालमेल होत असताना आपल्याला त्याचा पत्ताही नसावा, याची मला अगदी शरम वाटू लागली. मी म्हणालो–

'हा भयंकर माणूस, माझ्यामुळे पडेल, असे वाटते ना तुम्हाला दीक्षित? मग घ्या संमतीपत्र. पण लक्षात ठेवा, देशमुख पडणार नाहीत, मी नक्की पडेन.'

माझे संमतीपत्र घेऊन दीक्षित गेले. मी संमतीपत्र दिले हे लगेचच विसरलो. २८–२–७६ ला पोस्टाने निवडणुकीचा फतवा आला.

गट क्र. १ पुणे विभाग, जागा फक्त ५. सेवेसाठी उत्सुक उमेदवार ८. यांतले नक्की निवडून येणारे नाव जोत्स्ना देवधर. सगळे पुरुष त्यांना एक मत देणार. फक्त काही स्त्रियांची मते त्यांना मिळायची नाहीत. उरल्या चार जागा. त्यांत सातजणांची लठ्ठालठ्ठी. जनसेवेसाठी इतकी कार्यक्षेत्रे उपलब्ध असताना कशासाठी ही निवडणूक!

नाव मागे घेण्यासाठी परिषदेकडे निघालो तो वाटेत श्री. ज. जोशी भेटले. बिनविरोध निवडून आलेले कार्याध्यक्ष! मी त्यांना म्हटले, 'कार्याध्यक्षासाठी दुसरा उमेदवार नाही आणि गटवार इतकी लठ्ठालठ्ठी कशी काय?'

जोशी म्हणाले, 'कुणाला सांगू नका. काय झाले ते सांगतो. मी अर्ज घेऊन परिषदेत बसलो होतो. वेळ संपायला पाच मिनिटे असताना अर्ज दिला, सहा तीसला अर्ज दिला. सहा पस्तीसला निवडून आलो. तुमच्या ऑफिसचा फोन नंबर देऊन ठेवा. यापुढे मला तुम्हाला इथून फोन करता येईल. मी कार्याध्यक्ष आहे!'

मी त्यांना म्हणालो– 'तीन कुणी तरी नावे मागे घेतली की निवडणूक होणार नाही. मी तयार आहे. इतर दोघे कोणी तयार होतील का ?'

जोशी म्हणाले– 'नाव मागे घेऊ नका. अहो जास्तीत जास्त काय होईल ? तुम्ही पडाल, मागल्या वेळेला नाही का पडला ?'

नंतर जोशीबुवांबरोबर मिसळ खायला गेलो. नाव मागे घ्यायचे राहूनच गेले.

पुढच्या ८–१० दिवसांत टपालाने रोज उमेदवारांची मतयाचनापत्रके घरात येत होती. एका उमेदवाराची पुस्तके रसिकमान्य होती. एका उमेदवाराने संत साहित्याचा गाढ अभ्यास केलेला होता. दोन उमेदवारांनी यापूर्वीच भरीव कार्य केलेले होते. एकाने कळवले होते, 'तुम्ही आम्हाला मत द्यावे, आम्ही तुम्हाला देऊ. प्रतारणा होणार नाही, माझी माहिती परिषदेत तुम्हाला कोणीही देईल.' एका उमेदवाराला मत देण्यासाठी आठ-दहा नामवंतांनी गळ घातली होती. या सर्वांत रा. ज. देशमुखांचे पत्र हे, मला फार आवडले. आपण आतापर्यंत काय केले, काय करणार हे सर्व पत्रकात दिलेले होते. सर्वांची पत्रके वाचून माझी खात्री झाली की, हे सर्व-जण निवडून यायला हवेतच.

काही दिवसांनी पोस्टाने मतपत्रिका आली. एके दिवशी सकाळी सर्वांची पत्रके व मतपत्रिका घेऊन पहाटेच मतदानाच्या कार्याला बसलो. जोत्स्नाबाईंना एक मत दिले. पुणे गटात पाच फुल्या केल्यानंतर तीन नावे मोकळी राहिली. त्यांतले एक माझे होते. प्रत्येकाचे पत्रक वाचल्यानंतर कुणालाही मत नाकारणे मला शक्य झाले नाही.

पुन्हा दीक्षित आले–

'पायाला भिंगरी लावली आहे. तुमच्या-करता फिरतो आहे.'

'का बुवा ?'

'देशमुख पडले पाहिजेत. आणि ते पडणार ! काय खोटारडे पत्रक काढले आहे !!'

'मला ते पत्रक सर्वांत आवडले. मी त्यांना मतसुद्धा दिले–'

'कमाल आहे तुमची ! चावटपणा करू नका. तुमचे पत्रक कधी काढता ?'

'मला पत्रक काढायचे नाही.त्यात लिहा-यचे काय दीक्षित ? शिवाय १५०० मतदार. कार्ड म्हटले तरी प्रत्येकी पंधरा नयेपैसे. शिवाय छपाई. तीनशे रुपये लागतील. माझ्या-जवळ इतके पैसे नाहीत.'

निवडून यायचे तर खर्च करावा लागतो महाराज. यात चान्सेस घेता येत नाहीत.'

–नाना फडणीसांनी मुत्सद्दीपणा साकार केला.

मी म्हटले–

'पत्रक काढले नाही तर मी नक्की पडेन हे नक्की का ?'

'तुम्ही पडत नाही. मी तुम्हाला निवडून आणतो.'

'निवडून न आणायला तुम्ही काय घ्याल ?'

दीक्षित जोरात होता–

'सोबत वाचलात का, 'सोबत' ?'

'काल आलोय–अजून वाचला नाही.'

'लेख वाचा आपण ! देशमुखांचे म्हणणे कसे खोटारडे आहे, हे पुराव्यानिशी सिद्ध केलंय मी.'

तितक्यात दि. बा. मोकाशी आले त्यांनी दीक्षितांचा लेख वाचला होता. दीक्षितांच्या लेखात काय आहे, हे मोकाशींनी ज्या पद्धतीने सांगितले, त्यावरून तो लेख अगदीच मचूळ असावा, असा आपला माझा ग्रह झाला. लेख चांगला का वाईट, आवडला की आवडला नाही, हे मोकाशींनी शेवटपर्यंत कळू दिले नाही.

नंतर आठवडाभर दीक्षित कधी सकाळी, तर कधी ऐन दुपारी, तर कधी सायंकाळी भेटत असत. त्यांचा उत्साह वाढला होता. म्हणायचे–

'कानिटकर, मला फक्त तुमची काळजी आहे !'

आपण मजेत असताना दीक्षितांनी काळजी करावी, यामुळे मी अधिकच शर-मिंदा होत चाललो होतो.

बुधवारी २४।३।७६ च्या 'सकाळ'मध्ये मंत्री खताळ यांचे भाषण वाचले–

'मंत्रिपद, लायकी, कर्तबगारी व बुद्धिमत्ते-मुळे मिळत असते, तर माझ्यापेक्षा जे हुशार लोक आहेत, ते केव्हाच त्या पदावर गेले असते. हे एक लोकशाहीचे देणे आहे. कसली कर्तबगारी नि पात्रता घेऊन बसलात ? योगायोग, परमेश्वराची कृपा व थोरांचे आशीर्वाद असावे लागतात.'

कुणी निवडून आला किंवा मंत्री झाला की, त्याला मोठा समजण्यात आपली चूक तर होत नाहीना, अशी शंका मला वारंवार येत असे. परंतु तसे बोलण्याचे धैर्य कोण दाखवणार ? खरे बोलल्याबद्दल मी मनातल्या मनात मंत्री खताळ यांचे अभिनंदन केले.

कर्तबगारी अथवा पात्रता नसताना साहित्य परिषदेच्या निवडणुकीला उभे राहण्यात आपण केवढा गाढवपणा केला, याची मला एकदम गंभीर जाणीव झाली. लोक-शाहीचे देणे गळचात पडले तर आपले काय होणार, या विचाराने मी अस्वस्थ झालो. आशा एकच होती, दीक्षितांची काळजी खरी ठरून मी पडेन.

२८ तारखेला रविवार होता. सकाळी नेहमीप्रमाणे जोशीबुवांकडे गेलो गप्पा मारायला, तर जोशीबुवा बाहेर निघालेले. म्हणाले–'मला मतमोजणीकडे गेले पाहिजे.'

मला आठवण झाली. आपण पडण्याचा दिवस उगवलेला आहे. जोशीबुवा गेले.

घरी आलो. माजगावकर आले. 'सरिता' प्रकाशनाचे भावे आले. गप्पा चालू होत्या. थोड्या वेळाने तिघे मोकाशींच्या दुकानाकडे गेलो. मी चहा दिलेला असूनही पुनः चहा घ्यायचा ठरला. हॉटेलपाशी गेलो. तो तिथे पुंडलिकही !

अर्धा-पाऊण तास गेला. बाहेर पडल्यावर मोकाशी म्हणाले– 'मी साहित्य परिषदेत चाललो. तिथे मतमोजणी संपत आली असेल.'

मध्यंतरी भावे यांनी आशादायक वृत्त आणले होते. मी मत दिलेले सर्व उमेदवार आघाडीवर होते. मला सहाव्या क्रमांकावर मते पडत होती. परंतु अखेर लोकशाहीने दावा साधला. तासाभरात मोकाशी सांगत आले, 'तुम्ही निवडून आला.'

मी म्हटले– 'दीक्षितांना फार आनंद झाला असेल !'

मोकाशी म्हणाले–

'देशमुख पडले यामुळे त्यांना आनंद झालेला आहे...' आणि तुम्ही उभे राहिलात म्हणून ते पडले, हा त्यांचा हिशोब आहे.'

बाप रे ! निकाल लागता लागताच एवढे भरीव कार्य माझ्या हातून झाले, यावर माझा विश्वास नाही. हे लोकशाहीचे देणे आहे. लायकी, कर्तबगारी वा बुद्धिमत्ता नसताना ते कोणाच्याही अंगावर कोसळते, हा मंत्री खताळांचा तर्क अगदी बरोबर आहे.

मला मते देणाऱ्यांची यासाठी प्रथमच क्षमा मागतो.

**– वि. ग. कानिटकर**

चौकशीच्या जाळयात

# सी. आय्. ए.

सी. आय. ए. बाबत चौकशी करणाऱ्या समित्यांनी अनेक प्रकरणे उजेडात आणली आहेत. त्यांत राजकीय व्यक्तींच्या खुनाचे कट, संघटीत गुन्हेगारी, सरकार उलथविण्याच्या योजना, राजकीय पक्षांना केलेली आर्थिक मदत, हेरगिरीसाठी वापरलेले मार्ग यांबाबतच्या सी. आय. ए.च्या कृष्ण-कृत्यांवर प्रकाश टाकला आहे.

या चौकशी समित्यांच्या गोंधळामुळे सी. आय. ए. ची कार्ययंत्रणाच धोक्यात आल्याचे मत एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नुकतेच व्यक्त केले आहे. या चौकशीसत्रात अतिशय 'टॉप सिक्रेट' म्हणून एखाद्या प्रश्नावर चौकशी समितीच्या सदस्यांपुढे अत्यंत गुप्तपणे सी. आय. ए.च्या अधिकाऱ्यांनी काही माहिती सांगावी व काही तासांतच ती माहिती 'फ्लॅश' झालेली टी. व्ही. नेटवर्क किंवा वर्तमानपत्रात वाचावी अशी स्थिती आहे. त्यामुळे सी. आय. ए.चे अस्तित्वच धोक्यात आल्याचे काही अधिकाऱ्यांचे मत.

'शुकान' या जपानी साप्ताहिकाने जपानमधील सी. आय. ए.च्या काही एजंटस्‌ची नावे नुकतीच प्रसिद्ध केली आहेत. युरोपातील काही देशांतील सी. आय. ए.च्या एजंटस्‌ची जी माहिती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे त्याच्याशी 'शुकान'मधील माहिती बरीचशी मिळतीजुळती आहे.

न्यूयॉर्क येथील नॉर्मन मिलर या स्तंभ लेखकाने काही देशांतील सी. आय. ए.च्या एजंटस्‌ची नावानिशी माहिती प्रसिद्ध करून खळबळ उडवून दिली आहे. ही माहिती अर्थात त्याने चौकशी समितीच्या सदस्यांकडूनच मिळविलेली असणार याबाबत शंका नाही.

'शुकान'चा खप सात लाखाच्या वर आहे. जपानमधील सहा सी. आय. ए. एजंटस्‌ची नावासह माहिती प्रसिद्ध करण्यात आलेली असली, तरी एकंदर ६० ते ७५ सी. आय. ए. एजंट जपानमध्ये असावेत असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यांत परराष्ट्र खात्यातील अधिकारी, लष्करी तळावरील कर्मचारी, काही व्यापारी व कलाकारांचा समावेश आहे. या सर्वांचा मुख्य व्यवसाय म्हणजे सी. आय. ए. ला माहिती पुरविणे. ज्या सहा लोकांची नावे प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत ते सहाजण टोकिओतील अमेरिकन वकिलातीत काम करीत आहेत. त्यांपैकी एक प्यून म्हणून काम करीत असून इतर पाचजण निरनिराळ्या हुद्यावर आहेत. ही माहिती प्रसिद्ध झाल्यानंतर जपानमध्ये खळबळ उडाली. याबाबत गंभीर दखल घेतल्याचे जपानच्या परराष्ट्र खात्यातर्फे सांगण्यात आले. परंतु जपानमधील सी. आय. ए.च्या हस्तकांच्या हकिकती यापूर्वीही प्रसिद्ध झाल्या आहेत. जपानमध्ये अमेरिकन गुप्तहेरांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले असल्याचे जपानने जवळजवळ गृहीतच धरले आहे. रशिया व चीनच्या लष्करी हालचालींची माहिती गोळा करण्यासाठी अमेरिकन गुप्तहेरांचे व त्यांच्या खबऱ्यांचे जे जाळे जपान व इतर इंडोचायनातील राष्ट्रांत पसरले आहे त्याची सर्व सूत्रे टोकीओतून हलविली जातात.

'शुकान'ने सी. आय. ए.च्या एजंटस्‌ची जी यादी प्रसिद्ध केली आहे ती फारच अपूर्ण आहे अशी तक्रार विद्यार्थ्यांच्या डाव्या संघटनेने केली आहे. पूर्ण यादी प्रसिद्ध केली तर, जपानमधील अमेरिकन वकिलातील सर्वांची बदली करण्याची मागणी करावी लागेल असा दावा त्यांनी केला आहे.

सी. आय. ए. च्या बेकायदेशीर कारवायांची चौकशी करण्यासाठी अमेरिकेच्या सिनेटने नेमलेल्या समितीच्या पाहणीतील अहवालाचा आधार घेऊन इटलीतील 'ला स्तँप' या दैनिकाने, काही माहिती नुकतीच प्रसिद्ध केली आहे. पायके उपसमितीच्या अहवालानुसार १९४८ ते १९७२ या काळात कम्युनिस्टांविरुद्ध निवडणूक लढविण्यासाठी सात कोटी चाळीस लाख डॉलर्स इटलीतील राजकीय उमेदवारांना वाटण्यात आलेले आहेत.

अमेरिकेचे इटलीतील माजी वकील ग्रॅहम मार्टीन यांनी इटलीतील गुप्तचर अधिकारी जनरल व्हिटो मायसेली याला आठ लाख डॉलर्स दिले. जनरल मायसेली उजव्या गटाचे आहेत. १९७० साली झालेल्या लष्करी उठावावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला असून खटला चालू आहे. या वर्षी झालेल्या, मित्रराष्ट्रांतील पार्लमेंटरी निवडणुकीत निरनिराळे राजकीय पक्ष व काही राजकीय उमेदवार यांना अमेरिकेने सी. आय. ए. तर्फे

एक कोटी डॉलर्सचे वाटप केले आहे.

अमेरिकन अधिकाऱ्यांना चिंता वाटण्याचे कारण 'ला स्तँप 'सारख्या इटलीतील वर्तमानपत्राने पायके उपसमितीच्या पाहणीतील निष्कर्ष पोटकलमांसह जसेच्या तसे छापले आहेत. सी. आय. ए. ची लक्तरे वेशीवर टांगण्यास चौकशी समितीचे सदस्य व वृत्तपत्रे उत्सुक असली तरी, त्याचा विपरीत परिणाम सी. आय. ए. च्या कार्यपद्धतीवर झाला आहे. सी. आय. ए. चे इतर परकीय गुप्तहेर संघटनांशी असलेले संबंध सध्या बिघडले आहेत. कारण एखादी गुप्त माहिती सी. आय. ए. ला पुरवली तर, ती गुप्त राहीलच असा विश्वास आता कुणालाच वाटेनासा झाला आहे. जगभर निरनिराळ्या लष्करी केंद्रांच्या आसपास माहिती गोळा करून ती विकणारे धंदेवाईक गुप्तहेरसुद्धा सी. आय. ए. शी जवळचे संबंध ठेवण्यास तितकेसे तयार नाहीत. कारण कोणत्याही क्षणी आपले नाव जाहीर होण्याची धास्ती त्यांना सारखी वाटत असते.

एखादा एजंट जर फुटला व शत्रुपक्षाला जाऊन मिळाला किंवा पकडला गेला तर, एखादी योजना उघडकीस आली तर, त्यामुळे किती नुकसान झाले याची मोजणी सी. आय. ए. चे उच्च अधिकारी करतात. सी. आय. ए. चौकशी समितीच्या सत्रात इतक्या गोष्टी उघड झाल्या आहेत की, त्याबाबतचे मूल्यमापन करावयाचेही कुणाच्या लक्षात आलेले दिसत नाही, असे मत एका सिनेटरने व्यक्त केले. सी. आय. ए. ची चिरफाड झाल्यामुळे होणारे परिणाम दीर्घ काळ टिकतील असा जाणकारांचा अंदाज.

अमेरिकन नागरिकांवर गुप्तपणे पाळत ठेवणारे, फोन टॅप करणारे व पत्रव्यवहार चोरून वाचणारे अशा, सी. आय. ए. च्या सर्व अधिकाऱ्यांवर खटले भरण्यात येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांत गोंधळ निर्माण झाला आहे. 'आम्ही जी कामे करतो ती अतिशय महत्त्वाची आहेत. देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत, अशी आमची भावना होती. त्यासाठी वेळप्रसंगी आमच्या सहकाऱ्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावली आहे. परंतु त्याच कामासाठी आमच्यावर खटले भरण्यात येतील असे वाटले नव्हते. त्यामुळे आमचे मानसिक धैर्य खचले आहे.

'सी. आय. ए. ची गुपिते जाहीर केल्यामुळे झालेले नुकसान आताच लक्षात येणार नाही,' असे मत सी. आय. ए चे माजी डेप्युटी डायरेक्टर रे क्लाईन यांनी व्यक्त केले.

अनेक राष्ट्रांतील गुप्तहेर संघटना पूर्वीप्रमाणेच माहिती पुरवीत आहेत परंतु ती अतिशय दक्षतेने. मिळालेली गुप्त माहिती कशी मिळाली, कोणाकडून मिळाली हे न सांगता, फक्त माहिती पुरविण्यात येत आहे. त्यामुळे या गुप्त माहितीचा उपयोग करणे सी. आय. ए. ला व अमेरिकन लष्करी तज्ज्ञांना अवघड झाले आहे. चीनच्या पॉलिटब्यूरोत काय घडले याची माहिती जपानी गुप्तहेर संघटना सी. आय. ए. ला देते. पण ती माहिती हाँगकाँगच्या खबऱ्याकडून मिळाली की, पॉलिटब्यूरोतील एजंटकडून मिळाली, हे न समजल्याने त्या माहितीचा खरेखोटेपणा कळत नाही.

राष्ट्रीय सुरक्षिततेचा विचार करून सी. आय. ए. चा गैरवापर होऊ नये म्हणून कोणते उपाय योजावेत, याबाबत रॉकफेलर कमिशनवर शिफारस करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. □

## हिटलरच्या खुनाचा प्रयत्न
## नवा प्रकाश

आत्मसंरक्षणासाठी हिटलरच्या खुनाचा प्रयत्न एका जर्मन व्यक्तीने केला होता. तो कसा केला, का केला व तो का फसला याची हकिकत या व्यक्तीने आपल्या 'सिक्रेट डायरी' या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात सांगितली आहे. दुसऱ्या महायुद्धातील काही व्यक्तिगत अनुभव, लष्करी घडामोडी व अप्रकाशित ऐतिहासिक माहिती या डायरीत नमूद करण्यात आलेली आहे.

युद्धपिपासू नाझी जर्मनीच्या शस्त्रास्त्र उत्पादन खात्याचा अल्बर्ट स्पिअर हा जनरल मॅनेजर. त्यामुळे हिटलरपासून इतर सर्व जर्मन युद्ध सेनानींशी त्याचा जवळून परिचय. 'सिक्रेट डायरी 'च्या प्रकाशनापूर्वी त्याने हायडेलबर्ग येथील आपल्या घरी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्याने आपल्या डायरीतील माहितीचा खरेपणा पटावा म्हणून पत्रकारांना स्वतःजवळचे पुरावे दाखविले.

फेब्रुवारी १९४५मध्ये स्पिअरने हिटलरच्या खुनाचा प्रयत्न केला. हा प्रयत्न कोणत्याही तात्त्विक मतभेदामुळे केला नाही तर, केवळ आत्मसंरक्षणाच्या भूमिकेतून केला असे त्याने स्पष्ट केले." २० जुलै १९४४ रोजी हिटलर-विरोधी कट रचणाऱ्यांची भूमिका पूर्णपणे वेगळी होती. अनेक बाबतीत मूलभूत मतभेद असल्याने हा कट रचण्यात आला होता. तो कट रचणाऱ्यांविषयी मला सहानुभूती वाटते असे स्पिअरने पत्रकार परिषदेत सांगितले.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा जोपर्यंत विजय होत होता तोपर्यंत, हिटलरच्या निर्णयाबाबत किंवा तत्त्वाबाबत स्पीअरच्या मनात कधीच शंका निर्माण झाली नाही. परंतु पराभवाला सुरुवात झाल्यानंतर हिटलरच्या निर्णयाच्या योग्यतेबाबत स्वतंत्रपणे विचार करण्याची आवश्यकता त्याला वाटायला लागली. हुकूमशाहीत घेतले जाणारे निर्णय सर्वस्वी नेत्याचे असतात. तो आपल्या सहकाऱ्यांची मते विचारात घेऊ शकतो परंतु अंतिम निर्णय त्याचा स्वतःचा असतो. त्याचे बरेवाईट परिणाम अर्थात साऱ्या देशाला भोगावे लागतात. जर्मनीचा पराभव होणार हे जाणत्या लोकांच्या लक्षात येऊ लागले होते. पण हिटलरच्याविरुद्ध ब्र काढायची कुणाची ताकद नव्हती. युद्ध जर हरलो तर, जर्मन जनतेला जगायचा हक्क नाही, असे हिटलर वारंवार सांगू लागला होता. विजय किंवा सर्वनाश असे दोनच पर्याय हिटलरपुढे होते. अखेरपर्यंत प्रत्येकाने प्राणपणाने लढलेच पाहिजे असा त्याचा आग्रह होता.

'या वातावरणाचा माझ्यावर परिणाम झाला.' स्पीअरने सांगितले. तो पुढे म्हणाला, 'हिटलरचा खून करावयाची कल्पना ज्या वेळी माझ्या मनात पक्की झाली त्यावेळी निश्चित असे राजकीय किंवा तात्त्विक कारण नव्हते. आत्मसंरक्षणाची भावनाच प्रबळ होती. माझे कुटुंब, माझी मुलं, इतर कुटुंब सर्वनाशापासून वाचविण्यासाठी केलेला तो एक आत्मसंरक्षक उपाय होता. केवळ एका हिटलरच्या हट्टापायी साऱ्या जर्मन राष्ट्राचा सर्वनाश व्हावा हे मनाला पटत नव्हते. समजा एखाद्या कुटुंब प्रमुखाने, आपल्या कुटुंबातील व्यक्तींना सांगितले की, माझ्या-

जवळ बॉंब आहे. आज ना उद्या मी तो फोडणार असून सर्वांना नाहीसे करणार आहे. तर कुटुंबातील सर्वांचे प्राण वाचविण्यासाठी एखाद्याने प्रयत्न करावा तशी माझी अवस्था होती.'

बर्लिनमधील हिटलरच्या बंकरमध्ये विषारी वायू सोडण्याचा कट स्पीअरने रचला. परंतु तो अयशस्वी झाला. हिटलरने पहिल्या महायुद्धातील अनुभवावरून विषारी वायूशी कसे तोंड द्यावयाचे याची तरतुद आधीच केली होती. विषारी वायू हवेपेक्षा जड असल्याने तो खाली बसतो. बंकरमध्ये शुद्ध हवा आत घेण्यासाठी जे पाइप्स वापरले होते त्यांची तळापासूनची उंची विषारी वायूच्या स्तरापेक्षा किंचित उंच ठेवण्यात आली होती. त्यामुळे बंकरमध्ये सतत खेळती हवा राहिली व विषारी वायूचा उपयोग झाला नाही.

स्पिअर याची ही 'सिक्रेट डायरी' अमेरिका व ब्रिटनमध्ये एकाच वेळी प्रसिद्ध होणार आहे.

—पी. जे.

# ओचाको शिंजू

पाश्चात्य यंत्रयुगीन संस्कृतीचा अपरिहार्य परिणाम म्हणून आपण हिप्पी संस्कृतीकडे पाहतो. अतिशय समृद्ध जीवनाला कंटाळलेल्या पाश्चात्य युवकाचे चरस, गांजा, हाशीश इत्यादी व्यसनांत बुडालेले आयुष्य मनाला चटका लावते. पण त्याही पलीकडची स्थिती जपानमध्ये आली आहे. पत्नीने घटस्फोट घेतला म्हणून पती आपल्या दोन मुलींसकट आत्महत्या करीत आहे. कित्येक ठिकाणी तर, आई स्वतःच आपल्या मुलांच्या माना मुरगाळून नंतर स्वतः जीव देते, असे आढळून आले आहे. यालाच जपानी भाषेत 'ओचाको शिंजू' असे म्हणतात.

'ओचाको शिंजू' म्हणजे एकापेक्षा अधिक जणांनी एकदम आत्महत्या करणे. हा प्रकार अगदी अंगावर कांटा आणणारा आहे. निष्पाप मुले आईबापांच्या लहरीखातर आपला प्राण गमावतात. जपानी संस्कृतीत 'हाराकिरी' (आत्महत्या) या प्रकाराला अद्याप कुणालाच आळा घालता आलेला नाही. 'ओचाको शिंजू' ही हाराकिरीच्या पुढची पायरी आहे.

टोकिओच्या दक्षिणेला समुद्रकाठी मामोरा मासूदा या ४२ वर्षीय टॅक्सी ड्रायव्हरने आपल्या चिको (१२ वर्षे) आणि मिकी (९ वर्षे) या दोन मुलींसकट समुद्रात जीव दिला. त्याची पत्नी आपल्या प्रियकराकडे निघून गेली होती. तिला लिहिलेल्या चिठ्ठीत त्याने म्हटले होते, 'मला गेलंच पाहिजे आणि तेही मुलींसकट.'

विद्यार्थ्यांना मानसिक दौर्बल्य येणे हाही आजच्या संस्कृतीचा अपरिहार्य परिणाम आहे. अशाच एका मुलाला कंटाळून खुद्द त्याच्या आईनेच आपल्या १६ वर्षांच्या मुलाचा खून केला. याकोहामाजवळ कायासाकी इथे ही घटना घडली. काझूहिरो हे त्या मुलाचे नाव. त्याला आपल्या कॉलेजच्या प्रवेश परीक्षेची भीती वाटत होती. त्याच्या या मानसिक दौर्बल्याला कंटाळून त्याच्या आईने त्याचा खून केला आणि नंतर गॅसची चावी उघडून स्वतःही जीव देण्याचा प्रयत्न केला.

अशा अनैसर्गिक गोष्टींकडे आईबाप का वळतात? आर्थिक दुस्थिती एक मोठे कारण तर आहेच. टोयोनाकोच्या तकाशी नाकामूरा या गृहस्थाने आणि त्याच्या पत्नीने आपली १८ वर्षांची मुलगी युमी हिचा गळा दाबून जीव घेतला आणि नंतर दोघांनी गॅसची चावी उघडून मारून घेतले. आणि या सर्वांचे कारण काय तर, ताकाशी नाकामूरा हा बेकार होता आणि त्याला हृद्रोगाने पछाडले होते. वृद्धावस्था, मानसिक दौर्बल्य, एकलेपणाची भावना ही 'ओचाको शिंजू'ची इतर कारणे आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानी कुटुंबव्यवस्था पार बदलून गेली. ग्रामीण शान्त, सुस्थीर जीवन बदलून तेथे शहरी धावपळीचे युग आले. कुटुंबाचा आकारही लहान झाला आणि व्यक्तीला सुरक्षिततेचा अभाव जाणवू लागला. प्रोफेसर लिझूकू म्हणतात की, 'ओचाको शिंजू'च्या मागे हीच 'हरपलेपणा'ची भावना आहे, पण आईवडिलांना आपल्या निष्पाप मुलांचा प्राण घेण्याचा काय अधिकार आहे? डॉ. सोईची हाकोझाकी हे टोकिओचे मानसशास्त्रज्ञ म्हणतात की, 'बौद्ध संस्कृतीत भौतिक जीवन हे निकृष्ट मानले असून दुसऱ्या जगातील आयुष्य श्रेष्ठ मानले आहे. हे कदाचित् त्यामागचे कारण असेल.'

१९७५ या एकाच वर्षात 'ओचाको शिंजू' चे ४९४ प्रकार झाले असे ओसाकाचे प्राध्यापक मोमोयामा गाकूईन म्हणतात.

—विजया जोशी


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

आनंदाच्या दाही दिशा

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : दहा रुपये

# सोलकढी

## ☐ विद्यापीठाची होळीधूळपंचमी

तुमचीआमची होळी, तुमचीआमची धुळवड, तुमचीआमची रंगपंचमी मार्च महिन्यात येते आणि मार्च महिन्यातच जाते. मुंबई विद्यापीठाची होळी-धूळवड-रंगपंचमी मार्चपासून चांगली जून-जुलैपर्यंत बंबबोंबत असते. तुमच्याआमच्या होळीत, तुमच्याआमच्या धुळवडीत, तुमच्याआमच्या रंगपंचमीत तुम्ही आम्ही आता तसा काही सक्रीय भाग घेत नाही. मुंबई विद्यापीठाचे तुमच्याआमच्यासारखे नाही. मुंबई विद्यापीठाचे सगळे घटक त्यांच्या होळी-धुळवड-रंगपंचमीत अगदी जोरदार भाग घेतात. उगाच नाही या कालावधीत अवघ्या देशाचे डोळे, नुसते टकमकटकमक मुंबई विद्यापीठाकडे' लागलेले असतात.

नव्या आणीबाणीप्रीत्यर्थ यंदा, विद्यापीठाची ( यापुढे स्फुटात जेथे जेथे नुसता 'विद्यापीठ' असा उल्लेख येईल तेथे तेथे तो मुंबई विद्यापीठाचा आहे, असे समजावे. जेथे जेथे 'मुंबई विद्यापीठ' असा उल्लेख येईल तेथे तेथेदेखील तो मुंबई विद्यापीठाचाच आहे, असे समजावे. आभारी आहे. ) होळीधूळपंचमी हरताळकेच्या अथवा वटपौर्णिमेच्या गांभीर्याने साजरी होईल, असे आम्हाला खरोखरच वाटत होते. पण तसे झाले नाही : ती, होळीधूळपंचमीच्याच गांभीर्याने साजरी झाली-होईल.

सगळीकडे झालेल्या शिस्ताईमुळे यंदा सगळ्या महाविद्यालयांतून पूर्वपरीक्षा घेण्यात आल्या. विद्यार्थी या परीक्षांना बसले. गेली दोन वर्षे या परीक्षांना बसायची त्यांची सवय सुटली होती. दोन वर्षांखाली कुलगुरू त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे या एन. सी. सी. माणसाला लोकशाही घेराव घालून मुंबई विद्यापीठाच्या समंजस विद्यार्थ्यांनी पूर्वपरीक्षा रद्दबातल करवून घेतल्या होत्या. पूर्वपरीक्षा हव्यातच असे म्हणणाऱ्या खंबीरराव प्राचार्यांनी त्यावेळी पूर्वपरीक्षा शैक्षणिकदृष्ट्या एकूण अनावश्यकच कशा आहेत याचे मोठे मार्मिक, मुद्देसूद, आणि मनमोहक विवेचन केले होते. आणीबाणी आल्यावर पूर्वपरीक्षा एकूण आवश्यकच होऊन बसल्या. त्या आवश्यकच आहेत हे मुंबई विद्यापीठाच्या समंजस विद्यार्थ्यांनासुद्धा पटले. त्याप्रमाणे त्या यथासांग पार पडल्या. वर्षभरात जे विद्यार्थी समाधानकारक प्रगती दाखवू शकले नाहीत त्यांना विद्यापीठाच्या परीक्षेला बसायची संधी नाकारण्यात आली. मग समंजस विद्यार्थ्यांनी मुंबईचे मॅंड्रेक बॅ. रजनी पटेल यांची करुणा भाकली. रजनी पटेलांनी परिस्थितीचा साकल्याने विचार करून सगळ्या विद्यार्थ्यांना, त्यांचा पूर्वपरीक्षेचा निकाल काहीही असो, विद्यापीठाच्या परीक्षेला बसू द्यावे असे आवाहन कुलगुरुमाऊलीला केले. कुलगुरुमाऊलीने परिस्थितीचा साकल्याने विचार केला. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला पूर्वपरीक्षेबद्दल महाविद्यालयांना जो कडक अध्यादेश दिला होता तो आपल्या उदारविस्मरणात घातला आणि करुणार्द्र व्हायचे ठरवले. पण लोकशाही संकेताप्रमाणे प्राचार्यांनी संमती दिल्याखेरीज माऊलीला जाहीरपणे करुणार्द्र होता येत नव्हते. मग प्राचार्यांची बैठक झाली. त्या बैठकीत, परिस्थितीचा साकल्याने विचार करून, प्राचार्यांनी सगळ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेला बसू देणे योग्य, उचित आणि स्वाभाविक होय, असे ठरले. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांतून, पूर्वपरीक्षेचे अवमूल्यन प्राचार्यांना पूर्णतया नापसंत असल्याचे वृत्तान्त वाचायला मिळाले. तेव्हा कुठे, सगळ्यांना विद्यापीठाच्या परीक्षांना बसायला मिळणार अशी सगळ्यांची पक्की खात्री पटली.

येणेप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या वार्षिक होळीधूळरंगपंचमी-महोत्सवाची सुरुवात तर मोठी डरॉंवडरॉंव झाली आहे. ज्याची सुरुवात इतकी डरॉंवडरॉंव त्याची सांगता किती डरॉंवडरॉंवडरॉंवडरॉंव असेल, याची कल्पना करण्यात अनंतरावांचे दिवस सध्या मोठे सुखात चालले आहेत.


— अनंतराव



साफल्याचे दशक

# चलनवाढीवर नियंत्रण

गेल्या दहा वर्षांतील एक ठळक यश म्हणजे, फोफावती चलनवाढ मागे परतवून लावण्यांत मिळालेली सफलता.



- वाढत्या किमती ही हर आज संपूर्ण जगाच्याच अनुभवाची बाब ठरली आहे.
- भारतात सप्टेंबर 1974 मध्ये चलनवाढीचे वार्षिक प्रमाण 32.0 टक्क्यांवर जाऊन पोहोचलें होतें.
- तथापि सरकारने निर्धारपूर्वक कारवाई केल्यामुळे, ही चलनवाढ पार ओसरवून लावणें शक्य झालें आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा असेंच हें यश आहे.

"भाववाढ उतरवण्यांत मिळालेल्या यशामुळे आपल्या श्रमजीवी वर्गांना, आणि ठराविक मर्यादित उत्पन्न असलेल्या लोकांना फार मोठी मदत झालेली आहे."

—श्रीमती इंदिरा गांधी



# अर्जेंटिना

## आणखी एक लष्करी क्रांती

वा. दा. रानडे


अर्जेंटिनामध्ये लष्कराने सत्ता हाती घेतली व श्रीमती इसाबेल पेराँ यांना पदच्युत केले. ही लष्करी क्रांती अनपेक्षित नव्हती. एकतर दक्षिण अमेरिकेतील बहुसंख्य राष्ट्रांप्रमाणे अर्जेंटिनातही लष्करी कट व उठावांची परंपरा आहे. तेथे लोकशाही स्थिर झालेली नाही. गेल्या दहा वर्षांत चार लष्करी क्रांत्या झाल्या. दुसरे कारण अध्यक्ष श्रीमती पेराँ यांचा अकार्यक्षम कारभार, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, चलनवाढ रोखण्यासाठी, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी त्यांनी कोणतेही परिणामकारक उपाय योजले नाहीत. एका वर्षात चलनवाढ ३३५ टक्क्यांनी वाढली. हा जागतिक उच्चांक होता. 'भिंतींना सध्याच्या किमतीस मिळणारा वॉलपेपर लावण्यापेक्षा शंभर पेसोच्या नोटा लावणे अधिक स्वस्त पडेल' हे अंतर्गत सजावट व्यवसायातील एका माणसाचे उद्गार बोलके आहेत. चलनवाढीचे विदारक चित्रच त्यातून मोजक्या शब्दांत डोळ्यापुढे उभे राहते. पेसोचा परदेशी चलन बाजारातील दर १९५० मध्ये एका डॉलरला चार पैसे होता तो १९७६ च्या जानेवारीत एका डॉलरला चौदा हजार पेसो झाला होता. या चलनवाढीमुळे असंतोष वाढत होता. हवाई दलातील उजव्या गटाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या डिसेंबरमध्येच श्रीमती पेराँ यांच्या राजवटीविरुद्ध बंड केले होते. पण त्यावेळी ते अयशस्वी झाले. तरी त्यानंतर तीन महिन्यांनी झालेली लष्करी क्रांती यशस्वी झाली.

पेराँ यांची पहिली पत्नी इव्हापेराँ कर्तबगार, लोकप्रिय कार्यकर्ती होती, त्यांची तिसरी पत्नी इसाबेलबद्दल तसे म्हणता येणार नाही. पेराँ १९७४ साली निधन पावले आणि त्यावेळी उपाध्यक्षपदी असलेली इसाबेल अध्यक्ष झाली. अध्यक्षपदासाठी उभी राहून ती निवडून आलेली नव्हती. जगातील पहिली महिला अध्यक्ष म्हणून तिचा उल्लेख केला जात असला, तरी हे पद तिला कर्तृत्वापेक्षा दैवयोगाने मिळाले होते.

लष्करी क्रांतीचे प्रमुख जनरल व्हिडेला यांना देशाचे अध्यक्ष घोषित करण्यात आले आहे. देशाची आर्थिक घडी नीट बसविण्यात लष्करी राजवटीला तरी कितपत यश येईल याची शंका आहे. कारण आतापर्यंतच्या लष्करी राजवटी याबाबतीत अयशस्वी ठरल्या आहेत. अर्जेन्टिनात लोकशाही सरकार पुनः केव्हा प्रस्थापित होणार ? निवडणुका केव्हा घेणार ? हे नव्या अध्यक्षांनी घोषित केलेले नाही. लष्करी राजवट बेमुदत चालू राहणार असेच यातून सूचित होते. देशाला कोणत्या मार्गाने न्यावयाचे याबद्दल लष्करी सत्ताधाऱ्यांपुढे ठाम भूमिका व स्पष्ट आराखडा नाही. लष्करी नेत्यांतच सत्तेसाठी संघर्ष होतात. एक लष्करी राजवट जाऊन दुसरी येते असाच आतापर्यंतचा अनुभव आहे.

पेराँवादाचा तरी अर्जेंटिनावर कितपत प्रभाव आहे ? दुसऱ्या महायुद्धानंतरच्या राजवटीत सर्वांत जास्त नऊ वर्षे (१९४६–१९५५) पेराँ यांचीच राजवट टिकली होती. पेराँ पदच्युत झाल्यानंतरही त्यांचा प्रभाव कमी झाला नाही. ते अठरा वर्षे देशाबाहेर अज्ञातवासात असताही १९७३ मधील निवडणुकांत त्यांच्या पक्षाने बहुमत मिळविले. पेराँ यांना स्वदेशी बोलावण्यात आले व अध्यक्षपदाची सूत्रे त्यांनी हाती घेतली. पेराँ कम्युनिस्ट नव्हते पण कामगार संघटनांचा पाठिंबा हा त्यांच्या पक्षाचा मोठा आधार होता. पहिल्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत ४८ तासांचा आठवडा, एक महिन्याचा बोनस, किमान पगार वगैरे कामगारहिताच्या सुधारणा त्यांनी केल्या. स्त्रियांना मतदानाचा हक्क, घटस्फोटाला कायदेशीर मान्यता, कुंटणखान्यांना बंदी, अनौरस संततीला प्रतिष्ठा या सामाजिक सुधारणा त्यांनी कायद्याने घडवून आणल्या. ब्रिटिश मालकीची रेल्वे त्यांनी १५ कोटी पौंड नुकसानभरपाई देऊन ताब्यात घेतली. तसेच अमेरिकन टेलिफोन कंपनी, विमान कंपन्या, जहाज बांधणे व स्थानिक वाहतुकीचे त्यांनी राष्ट्रीयीकरण केले. जमीन सुधारणा मात्र त्यांनी केल्या नाहीत. तसेच आपली राजवट टिकविण्यासाठी दडपशाहीचा अवलंब केला. सुप्रीम कोर्ट गुंडाळून ठेवण्यात आले. पेराँ यांच्या मतांना विरोध दर्शविणे हा देशद्रोह मानला जाऊन त्याबद्दल कडक शासन ठेवण्यात आले. दुसऱ्यांदा अध्यक्षपद स्वीकारले तेव्हा पेराँ ७७ वर्षांचे होते. त्यानंतर एक वर्षाने ते निधन पावले. पेराँ यांचे व्यक्तित्व व नेतृत्व यांचा जो एक प्रभाव होता तो श्रीमती इसाबेल पेराँ यांच्याजवळ नव्हता. सत्तेला चिकटून राहण्यापलीकडे देशाची स्थिती सुधारण्यासाठी कोणताही धडाडीचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला नाही. 'अखेर परिस्थिती आटोक्याबाहेर जाताच लष्कराने त्यांना पदच्युत केले.

नव्या राजवटीपुढे मुख्य प्रश्न मॉन्टेनेरोंच्या गनिमी चळवळीस तोंड कसे द्यावयाचे हा आहे. मॉन्टेनेरो स्वतःला खरे पेराँवादी समजतात व सध्याची पेराँवादी चळवळ आपल्या मूळ भूमिकेपासून दूर गेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक पेराँवादामागे सुसंगत तात्त्विक भूमिका कधीच नव्हती. पेराँ यांच्या प्रभावी व्यक्तित्वामुळेच तो पक्ष टिकून होता. पण त्यांच्या निधनानंतर तो विस्कळीत झाला आहे. मॉन्टेनेरो गनिमी संघटना काही भागात जवळजवळ प्रतिसरकार म्हणून कारभार करीत आहे. या गनिमी चळवळीत पेराँवाद आणि कम्युनिझम यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्त्यांतील लोक, कारखान्यांतील कामगार आणि ग्रामीण भागांतील लोक यांना संघटित करण्यावर मॉन्टेनेरो चळवळीने भर दिला. पेराँच्या निधनानंतर या चळवळीचे बळ दर महिन्याला वाढतच गेले आहे. तीन हजार अधिकाऱ्यांची ही गुप्त संघटना आहे. पार्टिडो आँटेरिको हे त्यांच्या राजकीय पक्षाचे नाव आहे. प्रत्येक पातळीवर स्त्रियांना प्रतिनिधित्व हे या चळवळीचे एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे. पीपल्स रेव्होल्यूशनरी आर्मी ही दुसरी गनिमी संघटना अर्जेंटिनात आहे. दोन्ही संघटनांचा कार्यक्रम डावीकडे झुकणारा आहे. गनिमी लढ्याच्या मार्गाने देशाची सत्ता हाती घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. □



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

**पु. ल. इनामदार**

या अंकात श्री. गोपाळ गोडसे यांचा ' फ्रीडम अ‍ॅट मिडनाईट ' यासंबंधीचा क्रमशः तिसरा लेख प्रसिद्ध व्हायला हवा होता. त्याप्रमाणे श्री. गोडसे यांनी लेख लिहून तो प्रसिद्धीसाठी पाठवूनही दिला. पण अचानक त्यांचा दूरध्वनी आला व लेखप्रसिद्धी स्थगित ठेवावी असे त्यांनी कळवले. कारण असे की, ' फ्रीडम अ‍ॅट मिडनाईट 'च्या लेखकद्वयावर, प्रकाशकावर त्यांनी अब्रुनुकसानीचा दावा दाखल केलेला आहे व प्रकरण आता न्यायप्रविष्ट झाल्याने गोडसे यांनाया विषयापुरते काही काळ मौन पाळणे अवश्य ठरलेले आहे. या खटल्यातून मोकळे झाल्यावर श्री. गोडसे पुन्हा या विषयाकडे वळणार आहेत.

दरम्यान गेल्या अंकात श्री. गोडसे यांनी ज्यांचा उल्लेख केला आहे त्या श्री. इनामदार वकिलांची ' कहाणी ' वाचण्याचा व त्यांच्याशी या प्रकरणाबाबत सविस्तर चर्चा करण्याचा योग आला. गांधी खून खटल्यात ग्वाल्हेरचे डॉ. परचुरे हे एक आरोपी होते. नथुराम-आपटे यांच्याप्रमाणेच डॉ. परचुरे यांनाही या खटल्यात फाशीची शिक्षा होणार, असा भोपटकर वगैरे आरोपींच्या वकिलांचाही समज होता. परंतु श्री. इनामदार वकील यांनी आरोपीचा निरपराधीपणा सिद्ध करून दाखवला व डॉ. परचुरे यांची शेवटी निर्दोष मुक्तता झाली. पुढे सिमल्याच्या उच्च न्यायालयात नथुराम व गोपाळ गोडसे यांच्या वतीनेही श्री. इनामदार यांनी काम पाहिले. या निमित्ताने त्यांचा या सर्व प्रकरणाशी व या प्रकरणात गोवल्या गेलेल्या सर्व व्यक्तींशी फार निकटचा संबंध आला.

श्री. पु. ल. इनामदार हे मूळचे गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेले व गांधीजींच्या शिकवणुकीप्रमाणे स्वतःचे आचरण ठेवणारे एक गृहस्थ. ग्वाल्हेरमधील अन्यायपीडितांच्या बाजूने उभे राहणे हा त्यांचा बाणा. अजूनही ते खादी वापरतात. पण नियतीने त्यांना गांधीजींच्या खुनाचा आरोप असणाऱ्यांच्या बचावासाठी निवडावे, हाच एक केवढा चमत्कारिक योगायोग आहे ! मानसिक संघर्षाने त्यांचे मन काही काळ दुभंगून गेले. पण शेवटी गांधीजींचा त्यांच्यावरील प्रभाव निर्णायक ठरला; सत्याच्या बाजूने खंबीरपणे उभे राहण्याचा त्यांनी निर्णय घेतला व संकटे आली' मानहानी पत्करावी लागली, लोकांकडून-समव्यावसायिकांकडून अवहेलना झाली, तरी या निर्णयाचे अंतिम टोक त्यांनी गाठले.

आज मुंबईत ते निवृत्त जीवन जगत आहेत.

त्यांची ' कहाणी ' प्रसिद्ध व्हावी अशी त्यांची इच्छा दिसली.

' माणूस 'मधून या अंकापासूनच ती सुरू होत आहे.

'फ्रीडम अॅट मिडनाईट' वाल्यांचे हे एक उपकारच मानले पाहिजेत. त्यांनी अर्धसत्ये सांगून अनेकांना डिवचले. वस्तुस्थिती सांगायला प्रवृत्त केले. पुस्तकातील इतर भागासंबंधीही वस्तुस्थिती कथन करणारे, पूर्वग्रहविरहित लिखाण या निमित्ताने प्रसिद्ध होत राहिले तर वाईटातून हे एक चांगले निघाले असे समजायला हरकत नाही.

इनामदारांची कहाणी ही या वस्तुस्थिती-कथनाचा एक लहानसा प्रयत्न आहे. असे प्रयत्न जेवढे होतील तेवढे हवे आहेत. इनामदारांचे योग चांगले असतील तर, पुढेमागे ही कहाणी इंग्रजीतूनही प्रसिद्ध होईल अशी आशा बाळगू या.

## १ : पक्षसमर्थनासाठी विनवणी

महात्मा गांधींच्या हत्येचा अभियोग–'महात्मा गांधी खून खटला' माझ्या आयुष्यात एक नाट्यपूर्ण व मर्मस्पर्शी अनुभव ठरला. मी निःशंकपणे स्वीकार करतो की, माझ्या वकिलीच्या व्यवसायात या अभियोगाचे वकीलपत्र त्यावेळी मला मिळणे, हा एक अभावित योगायोग होता. ते काम स्वीकार करायला मी पात्र होतो की नाही, याची मला त्यावेळी भारी शंका होती. परंतु माझ्या नियतीने माझ्या नशिबात ते फार पूर्वीपासून लिहून ठेवले होते, असे आता म्हणायला मला आडकाठी वाटत नाही. १९४८ मध्ये ज्या दिवशी माझ्या कार्यालयात सौ. सुशीलाबाई परचुरे व त्यांच्या मोठ्या जाऊबाई सौ. परचुरे अचानक आल्या नि त्यांनी मला सल्ला व मदत देण्याविषयी विनवणी केली, त्या दिवशी माझ्या मनात एकदम उसळून आलेल्या विचारांपैकी हा एक विचारही होता की, काय मी वकिलीचा व्यवसाय ग्वाल्हेरला येऊन आरंभ केला त्याची परिणती अशी व्हायची होती का? सगळे होऊन गेल्यानंतर मला आता निश्चितपणे असेच वाटत आहे; ते सारे माझ्या नियतीने माझ्यासाठी योजून ठेवले होते. माझा हा अनुभव नाट्यपूर्ण यासाठी म्हणायचा की, १९४८ एप्रिलच्या पूर्वीच्या आयुष्यात मी मनात ज्या भावना अनुभवीत असे व जी ध्येये उराशी बाळगली होती त्या भावना आणि ती ध्येये यांचाच तीव्र संघर्ष मला अनुभवावा लागला. आणि मर्मस्पर्शी यासाठी की, त्या सगळ्या पार्श्वभूमीवर झालेले संघर्ष त्यावेळी मला अतिशय मर्मभेदी वाटले. पण त्यांची आठवण आता सुखदायकच राहिली आहे, एका वकिलाला आत्मसंतोष देणारी झाली आहे.

त्या सगळ्या संघर्षमय अनुभवांतली गुंतागुंत नि उकल सांगताना, मला ही कहाणी आत्मनिवेदनपर शब्दांत सांगावी लागत आहे. एका इतिहासकाराच्या भूमिकेवरून अथवा केवळ वकरकाराच्या भूमिकेवरून नव्हे. त्या ऐतिहासिक अभियोगासंबंधी घटनांचे संगतवार टाचण लिहून काढायला मला आवडलेही असते; पण त्या सगळ्या नाट्यपूर्ण प्रसंगांमध्ये एका वकिलाच्या भूमिकेवरून वावरताना मी स्वतः भावनांनी पिजून गेलो. अगदी परकायाप्रवेश करू शकणाऱ्या नटाच्या समरसतेने मला वेढून टाकले होते. यामुळे ही वकिलाची कहाणी ही आत्मनिवेदनपर कथा झाली आहे.

या आत्मनिवेदनपर कथेची सुरुवात माझ्या किशोरावस्थेतील आठवणींनीच करायला हवी. मी स्वतः वयाच्या सातव्या वर्षीच पोरका झालो; पण मला एका अतिशय संवेदनाक्षम मनाची देणगी मिळाली होती. त्यामुळेच की काय, मी माझ्या मनाला विविध भावनांमध्ये गुंतवून ठेवायला शिकलो; मला आवडलेली ध्येये उराशी बाळगून त्यातच निवारा शोधण्याकडे माझी प्रवृत्ती होऊ लागली; व थोडेसे समजू लागताच माझे मानी मन आंग्ल कवी मिल्टनच्या "To scorn delights and live laborious days" या विचाराने अगदी भारून गेले. वडीलमंडळींच्या सौजन्याने मला १९२० च्या डिसेंबर महिन्यातले नागपूरचे काँग्रेस अधिवेशन बघायला मिळाले होते व तेथे मी महात्मा गांधींची मूर्ती बघितली होती. पुण्याच्या नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांनी त्यावेळी नुकतेच या बॅरिस्टर गांधींना 'महात्मा' म्हणून गौरविले होते याची आठवण मला होती व म्हणूनच त्यावेळचे गांधींचे साधेसुधे रूपदर्शन माझ्या मनावर चटकन् परिणाम करून गेले. माझ्या भोवताली जे काही बोलले जात होते त्या सर्वांचा नीटसा अर्थ कळण्याचे माझे वय नव्हते. तरी पण त्या भारावलेल्या मनःस्थितीत मला कवी आनंदराव टेकाडोंची 'आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा' ही कविता ऐकायला मिळाली व त्याचे स्वर नि शब्द मला मुखोद्गत झाले. नागपूरहून परत येऊन शाळेत गेल्यावर, मी ज्या काही गोष्टी केल्या, त्यांमध्ये त्या पदाच्या प्रती कागदांवर लिहून काढून मी माझ्या वर्गबंधूंना वाटल्या! त्यानंतर लवकरच मला सौ. अवन्तिकाबाई गोखल्यांनी मराठीत लिहिलेले गांधीजींचे चरित्र वाचायला मिळाले. त्या चरित्राचा माझ्यावर इतका परिणाम झाला होता की, एकदा–मला वाटते इंग्लिश चवथीच्या इयत्तेमध्ये–एका परीक्षेत 'तुम्हाला आवडलेली व्यक्ती' या विषयावर निबंध लिहिताना मी महात्मा गांधींचे चरित्रच निबंध म्हणून लिहून काढले होते! त्या दिवसांतल्या गांधीजींच्या असहकार आंदोलनाचे माझ्या मनावर इतर काही परिणाम व्हायच्या अगोदर मी शाळेतच खादी वापरायला सुरुवात केली होती व कॉलेजात गेल्यावरही ती वापरीत असे.

अशा रीतीने गांधींच्या शिकवणुकीबद्दल आदर, त्यांच्या राहणीविषयी आवड इत्यादींनी माझ्या मनात घर केले असता; १९२७ मध्ये नागपूर येथे हिंदू–मुसलमानांच्या दंग्याचे दिवस मला पाहायला मिळाले व त्याच भरात मी लाठीकाठीचे शिक्षण घ्यायला सुरुवात केली. याच दिवसांत तथाकथित सामाजिक नि राजकारणी नेतेमंडळींच्या उच्चार नि आचार यांमधले दिवसेंदिवस वाढणारे अंतर पाहून माझे मन ध्येय नि आचरणाच्या झगड्यात बेचैन होत असे. अशाच काहीशा द्विधा मनःस्थितीमध्ये मी १९२७ मध्ये एका निबंधात लिहिलेली वाक्ये येथेही लिहितो :

"पैशाशिवाय आपले काही चालत नाही हा हरघडीचा अनुभव व संन्यास व त्याग यांशिवाय मोक्ष नाही ही हरघडी मिळणारी शिकवण, या परस्परविरोधी सत्यातले 'श्रेयस' कोणते ?...आजपर्यंत नदीचे मूळ किंवा ऋषीचे कूळ न शोधण्याबद्दल शास्त्राज्ञा असे. पण मी म्हणतो या देशभक्तांचे अंतरंगदेखील कोणी चुकूनसुद्धा अजमावू नये. ...यांचे कार्य बघावे तर 'वान्याशी भांडण्यासारखे' किंवा 'भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखे' 'प्रोपोगॅण्डाज्'......इतके असूनही हे मानमरातबासाठी चुलतभावापेक्षाही जास्त शत्रुत्वाने भांडतात. निवडणुकीच्या अगोदर स्वतःच्या निरीच्छतेविषयी तिस्मारखां शाही गोष्टी सांगणारे आमदार, स्वतः दिवाण होताच आपल्या मतदारांना कसे दिवाणे बनवितात हे कोणाला सांगावयास नको ! देवाचे देव्हारे माजविण्याचा हा प्रकार बघून तरुणाच्या मनावर काय परिणाम होत असेल ? अप्रतिकारी सत्याग्रहाचा पुरस्कार करून साम्राज्यसत्तावाद्यांच्या तोंडाला कुलूप घालणाऱ्या महात्मा गांधींवर त्यांचा स्वतःचाच मुलगा-उलटलेला बघून त्यांनी कोणावर विश्वास टाकावा ? मिसेस मालिनीबाई खान यांच्यावर कुत्र्यासारखे तुटून पडणाऱ्या हिंदुधर्माभिमान्यांचे चोरटे व्यवहार बघून त्याने कोणत्या मार्गांचा अवलंब करावा ?...माझ्याने असे प्रश्न मला येऊन पडले आहेत याची जाणीव असताना त्यांच्याकडे डोळेझाक करणे होणार नाही. आणि या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी एखाद्या सद्गुरूचीच अत्यंत जरूरी आहे. पण सद्गुरू तरी कोण निवडावा ? महात्मा गांधींना देवाप्रमाणे भजणारे जितके लोक आहेत, तितकेच शिव्या देणारेही लोक आहेत. 'अवतार' म्हणून पुढे आलेल्या जे. कृष्णमूर्तींविषयी नाही नाही ते बरळणारेही लोक आहेत. सूर्य उगवला की नाही हे ठरविण्याकरिता मतामतांचा गलबला होत नाही...मग तो या अवतारी व्यक्तीविषयी का असावा ? गौरीशंकराच्या श्रेष्ठत्वाविषयी वाद घातलेला दिसत नाही, नीतितत्त्वांना स्वतःची जाहिरात लावावी लागत नाही. सत्य ते सत्य, असत्य ते असत्य, गुण तो गुण, दुर्गुण तो दुर्गुण. पण परस्परविरोधी गोष्टींचे एकत्र वास्तव्य असू शकते यावर माझा विश्वास नाही. गांधी एकाच वेळी महात्मा व भोळे-मूर्ख असू शकतात, हे मला पटत नाही. आणि हे पटवून देणारा सद्गुरू भेटल्याखेरीज माझ्या मनाची तळमळ थांबणार नाही."

माझ्या शाळेतल्या जीवनापासूनच मी शरीर नि मन ताब्यात ठेवण्याच्या उद्देशाने उपवास करण्याची सवय स्वतःला लावून घेतली होती. पुणे येथे कॉलेजमध्ये कायद्याच्या परीक्षेचा अभ्यास करताना मी एकदा अवघे पस्तीस दिवस रोज दोनदा, केवळ थोडे भाजलेले किंवा उकडलेले शेंगदाणे खाऊन काढले होते. असल्या माझ्या वागणुकीला प्रेरणा गांधीजींजवळूनच मिळाली होती. महात्मा गांधींनी येरवडा, पुणे येथे हरिजनांना विभक्त मतदारसंघ देण्याला विरोध दर्शविण्याकरिता उपवास आरंभिला होता ! घरी रोज मी वर्ध्याच्या आश्रम-भजनावलीचे पाठ म्हणायलाही सुरुवात केली होती. आपण आयुष्यात वकिलीचा व्यवसाय करून पीडितांची सेवा करण्याचे व्रत घ्यावे, असे मला वाटायला लागलेच होते. वकिलीची सनद काढल्यावर माझे म्हणून मिळालेले व जपून ठेवलेले पहिले पाच रुपये मी महात्मा गांधी आमच्या गावी आले असताना त्यांच्या सत्याग्रहफंडासाठी दिले होते !

१९३५-३६ मध्ये मी ग्वाल्हेर येथे वकिली करायला म्हणून जाऊन राहिलो व थोड्याच दिवसांत मी तेथल्या अरेराव संस्थानी अधिकाऱ्यांच्या वागणुकीने त्रस्त होणाऱ्या रयतेच्या वतीने कामे पत्करण्याला सुरुवात केली होती. कोणी हिंदू आहे का मुसलमान आहे, याचा विचार न करता तो केवळ एक पीडित आहे, म्हणून त्याचे वकीलपत्र घ्यायचे, असा आदर्श माझ्यासमोर होता. पुण्याचे सार्वजनिक काका त्यावेळच्या ब्रिटिश साम्राज्यसत्तेविरुद्ध बंड करणाऱ्या वासुदेव बळवंत फडके यांचे वकीलपत्र घेऊन न्यायासनासमोर नव्हते का उभे राहिले ? गांधीजी स्वतः आफ्रिकेमध्ये नेटिव्ह जनतेच्या बाजूने गोऱ्या राजसत्तेविरुद्ध भांडायला नव्हते का उभे राहिले ? मला अत्यंत विपरीत परिस्थितीतही ग्वाल्हेरला जाऊन वकिली करताना हाच आदर्श आधार म्हणून होता, असे म्हणू का ? हिंदू आणि मुस्लीम पक्षकारांचेच काय, पण पुढे मी १९४४-४५ मध्ये ग्वालिअर राज्य सार्वजनिक सभेच्या-स्थानिक काँग्रेसच्या दहा-बारा नेत्यांची बाजू घेऊन न्यायालयात उभा राहिलो होतो. १९४७ च्या सत्तांतराच्या स्वातंत्र्यदिनी, १५-८-१९४७ ला, ग्वाल्हेर राजघराण्याची सत्ता जशीच्या तशी असताना देखील, तिरंगी ध्वजाचे उत्तोलन-ध्वजपूजन करण्याचा आम्ही काही वकिलांनी अट्टाहासाने प्रयत्न केला. परंतु उघड्यावर हा समारंभ करण्याची अनुज्ञा हायकोर्टच्या अधिकाऱ्यांकडून मिळेना, म्हणून बाररूममध्ये थोडीशी दाराखिडक्यांची 'आड' घेऊन ध्वजपूजन केले होते !

याच दिवसांत भारताच्या विभाजनाच्या निर्णयाने माझे स्वतःचे मन अतिशय दुःखी झाले होते. एकीकडे मी पैसा मिळविणाऱ्या वकिलांपेक्षा आर्त-पीडितांचे वकीलपत्र घेऊन उभा राहणारा म्हणून ओळखला जाऊ लागलो होतो; दुसरीकडे देशी व इंग्रजी वर्तमानपत्रांतून त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे नेते व महात्मा गांधी यांच्याविरुद्ध प्रसिद्ध होणारे दैनिक लिखाण वाचून व्यथितही होत होतो. २० जानेवारी १९४८ च्या गांधींच्या प्रार्थनासभेच्या वेळी झालेल्या 'बॉम्ब-स्फोटाचे' वृत्त प्रसिद्ध होऊनही माझे लक्ष त्या बातमीकडे विशेषसे गेले नव्हते ! पण ३० जानेवारी १९४८ च्या संध्याकाळी ५-३० वाजता महात्मा गांधींवर पिस्तुलाचे बार झाडून त्यांचा खून करण्यात आल्याची बातमी ऐकून मला एकदम सुन्न झाल्यासारखे झाले ! सगळ्या भारतीयांच्या विधिलिखितातल्या त्या शोचनीय संध्याकाळी ती दुर्भाग्यपूर्ण बातमी ऐकून माझ्याने घरी स्वस्थ बसवले नाही. घराबाहेर पडून मी लष्कर शहरातल्या काँग्रेस कार्यालयाच्या दिशेने जायला सुरुवात केली. आणखी काही वृत्त कळावे, ही माझी इच्छा होती. बऱ्याच वेळाने पाकिस्तानी रेडिओची बातमी म्हणून व नंतर भारतीय आकाशवाणीवरूनही मारेकरी व्यक्तीचे नाव 'नथूराम विनायक' आहे, असे कळले. तो सिंधी निर्वासित असावा, असे त्यावेळी लोक बोलू लागले होते. रस्त्यावरून चालताना दुकाने-बाजारपेठांचे दरवाजे बंद करायला सुरुवात झाली होती. शहरच्या काँग्रेस ऑफिसच्या शेजारीच असलेल्या 'डॉ. परचुरेंचा दवाखाना' अशी पाटी असलेले दवाखान्याचे दारही बंद असलेले मी पाहिल्याचे मला आठवते. माझ्या स्वतःच्या नियतीने त्या दवाखान्याचे ते बंद दार नि ती दुर्दैवी नि शोकपूर्ण संध्याकाळ पुढल्या कितीतरी महिन्यांकरिता माझ्या मनामध्ये घर करून बसणार आहे, असे लिहून ठेवले

होते नि ते स्वतःच्या डोळ्यांनी बघायला नि कानांनी ऐकायला मला घराबाहेर काढले होते ! पण त्यावेळी या विधिलिखिताची मला काय कल्पना ? मी दुर्दैवी, रस्त्यामध्ये उभा राहून आकाशवाणीवरून पंडित जवाहरलाल नेहरूंचे ते शोकपूर्ण घोगऱ्या आवाजातले भाषण ऐकत होतो ! ते म्हणत होते, 'हमारे जीवनपर अंधेरा छा गया है— Light has gone out of our life !' त्यांचे ते हृदय पिळवटून टाकणारे भाषण ऐकताना माझ्याही डोळ्यांत पाणी नि गळ्यात हुंदका आल्याशिवाय राहिला नव्हता !

दुसऱ्या दिवशी सकाळच्या वर्तमानपत्रांतून वाचायला मिळाले की, महात्मा गांधींचा मारेकरी कोणी 'नथूराम विनायक गोडसे, राहणार पुणे' नावाचा आहे ! माझ्या व्यथित मनाला तो एक दुसरा धक्का होता ! नथूराम गोडसेच्या नावाची त्यावेळी मला काहीच माहिती नव्हती व ते नाव मी प्रथमच ऐकत होतो. अर्थातच तो मारेकरी सिंधी निर्वासित नव्हता, हेही कळले होते. थोड्याच दिवसांत महाराष्ट्रातून व इतरही प्रांतांतून हिंदुसभा व आर. एस. एस. च्या माणसांची सरसकट धरपकड सुरू झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या व त्याबरोबरच महाराष्ट्रामधून ब्राह्मणांविरुद्ध, ते कोणत्या पक्षाचे आहेत, याचा विवेक बाजूला ठेवून अब्राह्मणांनी जाळपोळीचे नि मारामारीचे आंदोलन सुरू केल्याच्या बातम्या येऊ लागल्या. महाराष्ट्रातल्या दक्षिणी जिल्ह्यांमधल्या माझ्याच काही नातेवाइकांना या अब्राह्मण मोहिमेचा प्रसाद मिळाल्याचे वृत्तही मला कळले. त्यांच्या घरांवर जेव्हा हल्ला झाला त्यावेळी सुदैवाने ते घरी नव्हते. यामुळेच त्यांची सुटका झाली असे कळले ! ग्वाल्हेर येथेसुद्धा एका गोगटे नावाच्या अस्थायी कर्मचाऱ्याला बडतर्फ करण्यात आल्याची वावडीही काही दिवस उठली होती. खरे काय ते कळले नाही. बडतर्फीचे काय कारण, तर म्हणे त्याचे नाव गोडसे नावासारखे आहे ! पुढे पुढे तर प्रत्यक्ष आम्हा वकिलांच्या बाररूममध्ये आम्हा काही वकिलांना 'अरे, ये तो गोडसेवाला है !' म्हणून हिणवलेले ऐकायला मिळायचे !

महात्मा गांधींच्या हत्येनंतर दोन-चार दिवसांत ग्वाल्हेर हिंदुसभा व आर. एस. एस. चे बरेचसे नेते व कार्यकर्ते पकडले गेल्याचे वृत्त पसरले. थोड्याच दिवसांत बाररूममध्ये ही बातमी ऐकली की, ग्वाल्हेरचे डॉ. परचुरे यांना गांधीहत्येच्या आरोपावरून पकडले आहे व ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर ठेवले आहे. कैदी माणसाला किल्ल्यावर अडकवून ठेवण्याबद्दल पूर्वीचे दोनच दाखले आम्हाला माहीत होते. सतराव्या शतकात औरंगजेब बादशहाने आपला भाऊ मुराद याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यावरील एका प्राचीन राजवाड्यात तळघरातल्या कोठडीत ठेवून छळ करून ठार मारले होते. तो राजवाडा व ती ही कोठडी अजून आहे. विसाव्या शतकात दुसरा दाखला माधवराव शिंदे महाराजांनी दोघा कुप्रसिद्ध व खूंख्वार (रक्तपिपासू) डाकूंना, (डोंगर व बटरे ह्या नावाचे) पकडून किल्ल्यावर ठेवले होते ! डॉ. परचुरे यांच्या अटकेच्या बातमीनंतर थोड्याच दिवसांत त्यांचे मोठे भाऊ, जे ग्वाल्हेर सरकारचे इन्व्हेस्टमेंट व बँकिंग सचिव होते त्यांना व डॉ. परचुरे यांच्या मुलाला, जो कॉलेजमध्ये इंटरच्या वर्षात शिकत होता, त्यालाही पकडले आहे असे कळले ! ह्या बातम्या बाररूममध्येच कळायच्या, पण बाररूममध्ये चार-चौघांत गप्पा मारताना नव्हे, तर एकाने दुसऱ्याला, त्याने तिसऱ्याला गुप्त बातमी सांगितल्यासारख्या कुजबुजीतून ? बाररूमच्या बाहेरही बातम्यांच्या वावड्या अशाच. लवकरच आम्हा काही वकिलांना हेही कळले की, डॉ. परचुरे यांनी ग्वाल्हेरच्या एका मॅजिस्ट्रेटसमोर हत्येच्या अपराधाचा कबुलीजबाब लिहून दिला आहे ! पण कोण्या मॅजिस्ट्रेटसमोर हे मात्र कुणालाच सांगता येईना. आम्ही काही वकिलांनी चौकशी केली— अगदी कोर्टातले क्लार्क, चपराशी वगैरेंनाही माहिती विचारली, पण कुणालाच काही माहीत नव्हते ! आम्हाला याचे आश्चर्य वाटले होते ! रोज सकाळी येणाऱ्या वर्तमानपत्रांतूनही, कोर्टकचेऱ्यांच्या कामाबद्दल नेहमी येणाऱ्या बातम्यांमधूनही, गांधीहत्येच्या चौकशी—धरपकडी वगैरेंबद्दल अवाक्षरसुद्धा नसायचे. स्थानिक वर्तमानपत्रांमधून सुद्धा काही माहिती नसायची. हिंदी, मराठी, इंग्रजी वर्तमानपत्रांमधून रकानेच्या रकाने महात्मा गांधींच्या महानिर्वाणाबद्दल मजकुराने भरलेले असायचे ! महात्माजींच्या शेवटच्या यात्रेचे, अलोट जनसंमर्दाचे वर्णन रेडिओचा 'आँखो देखा हाल', गांधीजींचे चंदनाच्या चितेवरचे दाहकर्म, ते बघायला देशविदेशांच्या राजकीय प्रतिनिधींची तेथली उपस्थिती, अगदी भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांचे तेथे हजर राहून गांधीजींच्या शवाला अभिवादन करणे ! हे सगळे वाचायला मिळून, ऐकायला मिळून, एकमेकांना सांगण्यात आम्हाला किती नि काय वाटायचे हे कसे लिहून सांगू ? एकीकडे अतिशय दुःख व एकीकडे आत्मगौरवाची, देशगौरवाची अनुभूतीदेखील व्हायची ! अंगावर रोमांच उभे राहायचे नि डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहायच्या ! माझ्या घरी रोजच्या रोज वर्तमानपत्रांतून येणारे मृत्युलेख, देशी व परदेशी लेखकांनी लिहिलेले लेख वाचण्यात माझा वेळ जायचा. मी तर निरनिराळ्या देशी-विदेशी, हिंदी, मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रांतले मृत्युलेखांचे अंक गोळा करण्यात गर्क असे, अगदी पाकिस्तान—लाहोरच्या इंग्रजी 'डॉन' या वर्तमानपत्राचा अंकदेखील मला मिळाला होता. त्या मृत्युलेखांतले विचार, भाषेची हळुवारता, शब्दांचे औचित्य इत्यादींनी मला मोहून टाकले होते, भारावून टाकले होते. घरी मी हे लिखाण वाचण्यात व मजजवळ असलेल्या श्री. कनू देसाई यांच्या गांधीजींच्या रेखाचित्राच्या छापील प्रतीसमोर रोज एखादुसरे फूल वाहण्यात दिवस घालवीत होतो. ती फोटोप्रत अजूनही मजजवळ आहे. महाकवी टागोरांच्या 'एकला चलो रे' कवितेचे शीर्षक असलेली ! पुढे जेव्हा गांधीजींच्या अस्थिरक्षेच्या काही भागाचा कलश ग्वाल्हेरला आणला होता, तेव्हा एक दिवशी सकाळी उठून त्याचे दर्शन घ्यायलादेखील मी गेलो होतो, बरोबर माझ्या मुलाला नि मुलीला घेऊन !

अशा विचारात गढून गेलेल्या मला जेव्हा १९४८ च्या एप्रिल महिन्यातल्या एका संध्याकाळी माझ्या कार्यालयामध्ये भेटायला

सौ. सुशीलाबाई परचुरे व त्यांच्या जाऊबाई सौ. परचुरे आल्या नि त्यांनी आपल्या दुर्दैवी संकटाची व कठीण परिस्थितीची करुण कहाणी मला सांगितली नि माझ्याजवळ सल्ला व मदतीची याचना केली, त्यावेळी मला काय झालें असेल ! माझे मन बधिर झाले होते नि त्यांच्याकडे मी दृष्टी नसलेल्या उघडया डोळयांनी बघायला लागलो होतो !

त्या दोघीजणी माझ्यासमोर आल्या नि त्यांनी आपली ओळख मला सांगितली, तेव्हा मी उठून उभा राहिलो. त्यांना नमस्कार करून बसायला सांगितले. त्यातल्या धाकटया सौ. परचुरे मराठीत मला म्हणाल्या, 'वकीलसाहेब ! आम्ही आपल्याकडे काही कामाकरिता आलो आहोत. पण ते काम आपल्याला सांगायच्या अगोदर आपणाला विनंती अशी की, आम्ही येथे आल्याचे कोणाला दिसू नये व आमचे बोलणे कोणी ऐकू नये. आम्ही समोरचे दार लोटून घेऊ का ? आम्हाला आपला बराच वेळ घ्यावा लागेल !'

डॉ. परचुरे यांचे नाव ऐकताच मी जवळजवळ दचकलोच. पण त्यांना तसे काही न दाखवता त्या दोघींना बसायला सांगितले. मी स्वतः जाऊन समोरच्या व्हरांडयाचा दिवा विझविला व ऑफिसचे दर्शनी दार लोटून घेतले व वरती जाऊन घरातल्या मंडळींना 'मला जेवायला यायला उशीर होईल' असे सांगून परत आलो. मी येऊन आपल्या जागेवर बसताच धाकटया सौ. परचुऱ्यांनी बोलायला पुन्हा सुरुवात केली. 'आपल्याला आमच्यावर कोसळलेल्या संकटांची कल्पना आहे की नाही याची आम्हाला कल्पना नाही. आम्हा दोघींचे यजमान कैदेत आहेत. माझा मोठा मुलगासुद्धा कैदेत राहून आला आहे. घरात कोणी पुरुष-माणूस नाही. आम्ही एकाकी आहोत. आमच्याकडे कोणी येत नाही, कोणी आमच्याशी बोलत नाहीत. अगदी परिचित, मित्र, नातेवाईकसुद्धा—सगळयांनी आमच्याकडे पाठ फिरविली आहे. आम्ही वाळीत टाकल्यासारखे राहतो आहोत. ह्यांनी मला आपणाला भेटायला यायला सांगून पाठवले आहे, म्हणून आम्ही आलो आहोत. खरं म्हणजे ह्यांनी मला पुष्कळ दिवसांपूर्वीच भेटायला सांगितले होते. अगदी तावडतोब भेटायला सांगितले होते—पण...?' आणि सौ. सुशीलाबाईंना हुंदका आला व त्यांनी पदराने आपले तोंड झाकले !

थोरल्या जाऊबाईंनी सुशीलाबाईंच्या पाठीवर हात ठेवून त्यांना 'असं काय करता ? धीर धरावा, नका नका,' असे म्हणत सांत्वन करण्याचा प्रयत्न केला व थोडया वेळाने स्वतःच बोलायला सुरुवात केली. 'त्याचे असे झाले... !'

मोठया सौ. परचुऱ्यांनी मला शांतपणे, हळूहळू पण धीराच्या स्वरात सांगायला सुरुवात केली. काय बोलायचे, कसे बोलायचे, किती बोलायचे याचा त्या दोघींनी पूर्ण विचार करूनच त्या आल्या होत्या, याविषयी लौकरच माझी खात्री झाली. सुरुवातीसच त्यांनी माझ्या हातात कागदाची एक लहानशी चिठ्ठी—साधारणपणे तीन—चार इंचांची चौकोनी—दिली. चिठ्ठी बरीचशी चुरगळलेली, मळकी अशी होती. त्यावर तीन—चार ओळीच बारीक अक्षरांत लिहिलेल्या असाव्यात. त्या चिठ्ठीवर तारीख नव्हती, कुणाला लिहिली, कुणी लिहिली याचा निर्देश नव्हता. त्या दोघींनी मला विश्वासाने सांगितले की, चिठ्ठी डॉ. परचुऱ्यांच्या हस्ताक्षरातली होती नि चिठ्ठी त्यांना पाठवली होती. त्यांनी ती चिठ्ठी मला वाचायला सांगितली. चिठ्ठी मराठीत लिहिलेली होती. त्यावरचे काही शब्द स्पष्ट वाचता येण्याजोगे असे होते— 'धर्म' ... 'कर्तव्य' ... 'सात कोऱ्या' ... 'इनामदारा' ... 'भेटावे' ... 'त्यांना' 'तावडतोब' ... 'प्यास' ... 'सांगा ...' काही शब्द बरेच अस्पष्ट, शाई पुसून गेल्यासारखे झाले होते, काही हात लागून मिटल्यासारखे झाले होते. मजजवळ आता ती चिठ्ठी नाही. मी वरचे शब्द स्मरणाने लिहिले आहेत. कारण त्या शब्दांचे माझ्या डोळयांसमोरचे चित्र अजून पुसलेले नाही, अजूनही त्यांनी माझ्या आठवणीला घट्ट धरून ठेवले आहे ! मी काही वाक्यांचा—शब्दांचा संगतवार अर्थ त्या दोघींना विचारून लावण्याचा प्रयत्न केला. त्या चिठ्ठीमध्ये मॅजिस्ट्रेटचे नाव होते ! सगळे वाचून, ऐकून मला हे अवश्य कळले की, डॉक्टरसाहेब मला काही तरी तावडतोब करण्यास सांगत आहेत.

'याचा अर्थ काय ? हा कागद तुम्हाला केव्हा, कसा मिळाला ?' माझ्या आवाजातली रागाची धार आवरून धरीत मी त्यांना विचारले,

'त्या दिवशी डयूटीवर असलेल्या मिलिटरी गार्डने हा कागद आणून दिला.' सौ. सुशीलाबाईंनी पुन्हा बोलायला सुरुवात केली होती. त्यांनी स्वतःला सावरून घेतलेले दिसले. त्यांनी मला सुरुवातीपासूनची हकीकत संगतवार सांगण्याला आरंभ केला. त्यांनी मला त्यावेळी सांगितलेल्या हकीकतीचा थोडक्यात सारांश असा होता की, '१८ फेब्रुवारी १९४८ ला सकाळपासून तो मिलिटरीचा शिपाई किल्ल्यावर डयूटीवर होता. डयूटी संपवून घरी परत आला तो तेथे त्याची आई त्याच्या खेडयावरच्या घरी अत्यवस्थ असल्याची बातमी आली होती, म्हणून तो इतर कशाचा विचार न करता त्याच पावली आपल्या खेडयावर जायला निघाला. त्याला डॉक्टरांनी दिलेला कागद व त्यासंबंधीचे काम तो पार विसरून गेला होता. तो शिपाई खेडयावर गेल्यावर थोडयाच दिवसांत त्याची आई मरण पावली. तिचे सर्व क्रियाकर्म रीतसर करून व नंतर आईच्या अस्थी 'फुले' 'गंगाजी'ला घेऊन गेला व तेथून परत आल्यावर गंगाभोजन वगैरे आटोपून नुकताच—जवळजवळ दीड महिन्यांनी परत-ग्वाल्हेरला सैन्यात डयूटीवर हजर झाला होता नि लगेच सौ. परचुरे यांच्याकडे येऊन त्याने तो कागद त्यांना देऊन त्याबद्दलचा त्याला माहीत असलेला, डॉक्टरांनी स्वतः सांगितलेला निरोप सांगितला होता. त्या शिपायाने त्या दिवशी किल्ल्यावर आलेल्या मॅजिस्ट्रेटचे नाव सांगितले होते व वकीलसाहेबांना भेटायची निकड सांगितली होती. दोघी परचुरे-महिलांनी मला खात्री देऊन सांगितले की, 'तो शिपाई जरी शिकलेला नाही—अडाणीच आहे, पण फारच इमानदार व विश्वासाचा मनुष्य आहे. तो कधीच खोटे बोलणार नाही. त्या बिचाऱ्या शिपायाचे दुर्दैव होते की, त्याच दिवशी त्याच्या आईला शेवटचे भेटण्यासाठी त्याला तातडीने जावे लागले, पण 'आमचे नशीब असे दुर्दैवी की, तो कागद आम्हाला वेळेवर देऊ शकला नाही. त्याने कागद दिला पण तो इतक्या उशीराने !'

मी ते सर्व ऐकून सर्दच झालो. माझ्या मनात उसळणाऱ्या विचारांचा कल्लोळ मला झेपेनासा झाला होता !

रात्रीचे साडेनऊ वाजून गेले होते. मी त्यांचे बोलणे आवरते घेतले

नि त्या दोघींना मला दोन–तीन दिवसांनी पुन्हा भेटा असे सांगून त्यांचा त्या दिवशी निरोप घेतला. माझा निरोप घेताना सौ.सुशीलाबाई परचुऱ्यांनी मला अत्यंत काकुळत्या स्वरात नि भरल्या डोळ्यांनी म्हटले की, 'वकीलसाहेब ! माझे सौभाग्य तुमच्याच हातात आहे. अजूनही काही तरी करा !'

त्या दोघींचा निरोप घेऊन मी भारावलेल्या मनानें ऑफिसची दारे बंद केली नि वर गेलो. माझी पत्नी माझी वाटच पाहत होती. जेवताना तिने मला त्या दोघी परचुरे कशाकरता आल्या होत्या हे विचारले, म्हणून मीही त्रोटक शब्दांत त्या दोघींच्या कामाबद्दल आणि त्यांनी मजवर सोपवलेल्या जबाबदारीबद्दल सांगितले व लगेच झोप येत आहे म्हणून निजायला गेलो !

मी माझ्या मनात येणाऱ्या सगळ्या विचारांचा उल्लेख पत्नीजवळ त्या दिवशी करू शकलो नाही. वरकरणी चेहरा शांत ठेवून व तिला काळजी करण्यासारखे काही नाही, असे सांगून झोपण्याकरता अंथरुणावर डोळे मिटून स्वस्थ पडून राहिलो. माझी पत्नीही तिच्या अंथरुणावर जाऊन झोपली नि तिला थोड्याच वेळात झोपही लागल्याचे दिसले, ती झोपली पण माझे डोळे साफ उघडे ! मला जणू उजाडलेच होते. मी माझ्या अंथरुणावर कितीतरी वेळ तडफडत पडलो होतो. दोघी परचुरे जावा मला डॉक्टर परचुरे यांच्यावतीने मी मॅजिस्ट्रेट अटल यांना भेटावे असे सांगत आहेत, हे पुन्हा पुन्हा आठवत होते. माझ्या विचारांनी माझ्या मनाच्या चिंधड्या करायचे ठरवले होतेसे मला त्यावेळी वाटत होते ! कोण जाणे मला केव्हा झोप लागली.

[ क्रमशः ]

# पॅपिलॉन पुस्तक योजना

## चवथे पुस्तक । मॅक्झिम गॉर्की । लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

पॅपिलॉन पुस्तक योजनेतील चवथे पुस्तक 'मॅक्झिम गॉर्की'. लेखिका : सौ. सुमती देवस्थळे, पुढील आठवड्यात प्रसिद्ध होत आहे.

सभासदांनी दिनांक २ एप्रिल ते ११ एप्रिल या मुदतीत राजहंस प्रकाशन कार्यालयातून पुस्तक न्यायची व्यवस्था करावी. संदर्भासाठी पावती हवी.

पॅपिलॉन योजनेतील यापूर्वीची तीनही पुस्तके व्ही. पी. व पोस्टद्वारे पाठवून झालेली आहेत. ज्यांना अद्याप मिळालेली नसतील त्यांनी कार्यालयाला कृपया लवकर कळवावे. पत्रात पावती क्रमांक वगैरे लिहावा.

१ मार्चपासून पोस्टाचे दर खूपच वाढलेले आहेत. त्यामुळे पॅपिलॉन पुस्तक योजनेतील चवथे व जून ७६ मध्ये तयार होणारे पाचवे पुस्तक एकदम पाठविणे सभासदांच्या दृष्टीने सोयीचे व कमी खर्चाचे ठरणार आहे. त्यामुळे ही दोन्ही पुस्तके व्ही. पी. किंवा रजिस्टर पोस्टाने एकदम, एकाच वेळी, म्हणजे जून–जुलै ७६ मध्ये पाठविली जातील. तरीपण ज्यांना 'गॉर्की' हे योजनेतील चवथे पुस्तक प्रकाशित झाल्यावर लगेच हवे असेल त्यांनी तसे कळविल्यास पाठविण्याची व्यवस्था होऊ शकेल.

केवळ पाच रुपयात पुस्तक द्यायचे तर विनाकारण वाढत जाणारा पत्रव्यवहार व इतर खर्च यांना काट देणे अवश्यच होते. त्यामुळे काही सभासदांचा गैरसमज झाला असण्याची शक्यता आहे. पण बहुसंख्य सभासदांचे उत्तम सहकार्य लाभले हेही नमूद केले पाहिजे. या सहकार्यामुळे व परस्पर विश्वासामुळेच या योजनेतील पाचांपैकी तीन पुस्तकांचे वाटप पूर्ण होऊ शकले व उरलेल्या दोहोंचेही येत्या २–३ महिन्यांत पूर्ण होईल. दरमहा एक पुस्तक हे वेळापत्रक मात्र थोडे मागेपुढे झाले. पहिली तीन पुस्तके वेळेवर प्रकाशित झाली. समक्ष नेणाऱ्यांनी ती वेळेवर नेली. पोस्ट-पाठवणीला थोडा विलंब लागला. चवथे 'गॉर्की' निघायला एक महिना उशीर होत आहे. अनेक विक्षेप येतात व वेळापत्रक बिघडून जाते. सभासदांनी हे सर्व समजून-उमजून घ्यावे एवढीच नम्र विनंती.

व्यवस्थापक

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ-पाराजवळ, पुणे ४११ ०३०

# महाराष्ट्र कृषिजीवन वस्तुसंग्रहालय : एक आवश्यकता

**लक्ष्मीकान्त पाटील,** कृषि अभियंता

: १ :

भारताच्या अर्थमंत्र्यांनी नुकताच एक प्रबंध लोकसभेपुढे सादर केला. त्यांनी भारताच्या ग्रामीण भागाचा झपाटयाने कायापालट घडवून आणण्याच्या उद्देशाने ह्या प्रबंधाद्वारे एक योजना मांडलेली आहे. शेतीतंत्राचा आधुनिक-पद्धतीने विकास, कृषि उद्योगधंद्यांचा विस्तार आणि रोजगारसुविधा ह्या तीन प्रमुख सूत्रांनुसार योजलेल्या ह्या कार्यक्रमांमधून ग्रामीण भागाची आर्थिक आणि सामाजिक प्रगती साधावयाची आहे.

तसा जर विचार केला तर, महाराष्ट्रात गेल्या पंचवीस-तीस वर्षांत ह्या दृष्टिकोनातून पावले उचलली गेली आहेत. थोडीफार प्रगती साधलेली आहे. महाराष्ट्राच्या शेतीच्या स्वरूपात गेल्या पंचवीसएक वर्षांत पुष्कळच बदल झालेला आहे. शासनाच्या धरण–पाटबंधारे योजनांच्यामुळे पाटाखालच्या शेतीत थोडीफार वाढ झाली आहे. आता मागच्या काळात महाराष्ट्रावर पडलेल्या दुष्काळाच्या सावटीमुळे, आणि त्यावेळी महाराष्ट्र शासनाने आखलेल्या कार्यक्रमामुळे प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याची ग्रामीण भागातील जनतेची हिंमत वाढली आहे. पडेल ते आणि मिळेल ते पाणी शेतीसाठी साठविण्याचे आणि ह्या पाण्याचा मर्यादित पद्धतीने वापर करून त्यावर पीक घेण्याचे महत्त्व, गेल्या दुष्काळी परिस्थितीतील शासनाच्या कार्यक्रमामुळे, शेतकऱ्यांना पटले आहे. शेतकऱ्यांची अस्मिता जागृत झालेली आहे. ओढ्या-नाल्यावर बांध टाकणे, ओढ्या-नाल्याला शक्यतो सरळ मार्ग देणे, पाझर तलाव बांधणे, जुने तलाव साफ करणे इ. कामांमुळे किती क्षेत्र पाण्याखाली येऊ शकले हे फार महत्त्वाचे नाही. त्या भागातील शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे हेच फार महत्त्वाचे. अशा ह्या जिद्दीच्या भावनेतूनच सदैव दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या जत–आटपाडीसारख्या माळावर हिरवी शाल अंथरण्याचे प्रयत्न यशस्वी होतात.

जायकवाडी प्रकल्पाने मराठवाड्याच्या शेतीचा चेहरामोहरा बदलला जात आहे. निरा, गोदावरी व प्रवरा कालव्यांच्यामुळे झालेला शेतीचा विकास लक्षात येण्यासारखा आहे. बाध, इटियाडोह ते काळम्मावाडी धरणयोजनेमुळे होणारा लाभ परिचयाचा आहे. कोयना-विद्युत्‌निर्मिती योजनेमुळे महाराष्ट्रांत औद्योगिक विकासाला गती मिळालेली आहे. ह्या विकासाचा दृश्य आणि अदृश्य परिणाम महाराष्ट्राच्या कृषिजीवनावर होतो आहे. ग्रामीण विद्युत्‌पुरवठा योजनेमुळे खेडोपाडी वीज पोहोचली आहे. त्यामुळे विहिरीतील पाण्याचा उपसा करून त्याखाली घेतल्या जाणाऱ्या क्षेत्रांत वाढ झाली आहे. शेतीमालावर प्रक्रिया करणारे आणि शेतीशी संबंधित असणारे अनेक लहान लहान उद्योग ग्रामीण भागात सुरू होऊ लागलेले आहेत. कृषि यांत्रिकीकरणाला गती मिळालेली आहे. कर्षित्रांना (ट्रॅक्टर्सना) वाढती मागणी आहे. ह्यांतून शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत थोडी सुधारणा झाली आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळे आणि सुशिक्षितांनी शेतीव्यवसायात लक्ष घातल्यामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात फरक होऊ लागलेला आहे. जीवनपद्धती उंचावू लागलेली आहे. गोबर गॅस प्लँटसारख्या सुविधेमुळे गॅसच्या शेगडीचा वापर शेतकऱ्यांच्या घरातून होऊ लागला आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनपद्धतीत आणि शेतीपद्धतीत होणारा हा बदल आवश्यक आणि आशादायक आहे. परंतु अजून बरीच वाटचाल चालावयाची आहे. सर्वत्र शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत झालेली नाही. महाराष्ट्राच्या सर्वच विभागात शेतीविकासाला योग्य तो वेग आलेला नाही. परंतु आतापर्यंत जी काही वाटचाल केलेली आहे, ज्या परिस्थितीमधून चिंतन, परिश्रम आणि जिद्द ह्यांच्या जोरावर जे काही यश मिळविले, त्या परिस्थितीचा आणि प्रयत्नांचा इतिहास पुढच्या पिढ्यांच्या माहितीकरता जोपासला पाहिजे, अभ्यासला पाहिजे. विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहणे हे राष्ट्राच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. तसेच इतिहासाला विसरून जाणे हे अस्मिता गमावल्याचे चिन्ह आहे.

: २ :

महाराष्ट्राच्या कृषिजीवनाचा इतिहास उपेक्षिला गेलेला आहे. कृषि इतिहासाचा अभ्यास फारसा झालेला नाही. वास्तविक सदैव दुष्काळ, संघर्ष आणि आर्थिक अडचणींच्या छायेत असलेल्या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांची जिद्द, शेतीसुधारणेकरता झालेले प्रयत्न, इत्यादींचा इतिहास अभ्यसनीय आहे. अशा तऱ्हेचा अभ्यास केला जाणे आवश्यक आहे.

ग्रामीण विभागाच्या कायापालटाच्या योजना ज्या वेगाने पुढे येत आहेत, त्या वेगामुळे महाराष्ट्राच्या कृषिजीवनाच्या इतिहासाच्या अभ्यासाची साधनसामग्री नष्ट होऊन जाईल अशी भीती निर्माण झाली आहे. आमची शेती मागासलेली होती. आमचा शेतकरी अडाणी होता. त्याच्याजवळ असलेली साधनसामग्री टाकाऊ होती. त्याचे जीवन हे जगण्यासारखे नव्हते. अशा काही विचारप्रवृत्तींचा जबरदस्त पगडा आमच्या मनावर असल्यामुळे ह्या जुन्या खाणाखुणा आम्ही नुसत्याच अडगळीत टाकत नाही, तर त्या नष्ट करून टाकत

आहोत. जुनी जीवनपद्धती साफ पुसून टाकून त्या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाने सजलेली जीवनपद्धती आम्हाला आणावयाची आहे. पण हे करताना, आम्ही ही लढाई कशी जिंकली, हे आमच्यानंतर येणाऱ्या पिढ्यांना सांगता आले पाहिजे. आमच्या आधीच्या पिढ्यांनी काय केले ह्याची जाणीव आम्हाला आज पाहिजे. त्यांच्या परिस्थितीत त्यांनी काय केले ह्याची जाणीव आम्हाला असती, तर आम्ही कृतज्ञतापूर्वक आणि अभिमानाने त्याचा उल्लेख केला असता.

ऐंशी–नव्वद वर्षांपूर्वी डॉ. व्होअलकर आणि मॉलिसन ह्या कृषितज्ज्ञांनी "महाराष्ट्राचा शेतकरी कोठल्याही युरोपिअन शेतकऱ्यापेक्षा बुद्धिमत्तेमध्ये, कार्यशीलतेमध्ये कमी नाही." असे स्पष्ट म्हटले होते. त्यांच्या मते जर ह्या शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक आणि सामाजिक मदत मिळाली तर तो उत्तम शेतकरी होऊ शकेल. आजच्या परिस्थितीने त्यांचे मत खरे असल्याचे दर्शविले आहे.

पण ऐंशी–नव्वद वर्षांपूर्वी आमच्या शेतीची काय परिस्थिती होती ह्याची माहिती आम्हाला नाही. गॅझेटिअर्स, ॲग्रिकल्चरल लेजर ह्या तत्कालीन ग्रंथ–मासिकांचा अभ्यास केला जात नाही. उलट ही जुनी ग्रंथसंपत्ती माळ्यावर फेकून दिली जाते किंवा रद्दीच्या भावात विकली जात आहे. मराठेशाहीत, पेशवाईत आमची शेती कशा तऱ्हेची होती ह्याची माहिती मिळविणे तर दुरापास्तच होते.

आमच्या कृषिजीवनाचा इतिहास आम्हाला विसरून जायचा नसेल, तर आज ज्या खाणाखुणा, जी साधनसामग्री आम्हाला मिळेल ती शोधून जमा केली पाहिजे. त्याचा पद्धतशीर अभ्यास केला पाहिजे आणि ही माहिती जतन करून पुढच्या पिढ्यांच्याकरता प्रदर्शित केली पाहिजे. शासनातर्फे आणि काही विद्यापीठांतर्फे 'लोक–जीवन', 'लोकसंस्कृती', 'लोकसाहित्य' इत्यादींबाबत व मागच्या काही पिढ्यांच्या जीवनपद्धतीबाबत मागोसा घेण्याचे प्रयत्न झालेले आहेत, चालू आहेत. कृषिविद्यापीठांनी महाराष्ट्राच्या कृषिजीवनाचा इतिहास अभ्यासण्याची सोय करावी असे वाटते.

**: ३ :**

महाराष्ट्राच्या कृषिजीवनाच्या इतिहासाचा अभ्यास करताना जमा होणारी साधनसामग्री संरक्षितरित्या ठेवण्यासाठी, अभ्यासण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेसाठी आणि शेतकऱ्यांच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्यासाठी महाराष्ट्र कृषिजीवन वस्तुसंग्रहालयाची गरज आहे. ऐतिहासिकदृष्ट्या कृषिसमाजजीवन अभ्यासणे हा जरी संकल्पित महाराष्ट्र कृषिजीवन वस्तुसंग्रहालयाचा प्रधान हेतू असला तरी आजची कृषिपद्धती आणि कृषिसुधारणांचा मार्ग दाखविण्याचे कामदेखील ह्या संग्रहालयाकडून अपेक्षित आहे.

ही कृषिवस्तुसंग्रहालयाची कल्पना काही नवीन नाही. पाश्चात्य देशांत संग्रहालयाचे तंत्र आणि शास्त्र पुष्कळच जोपासले गेले आहे, अभ्यासले गेले आहे. आपल्याकडे संग्रहालयाबद्दल फारशी आस्था नाही एवढेच.

सतराव्या–अठराव्या शतकांत युरोपमध्ये शेती सुधारणेबाबत बरेच प्रयत्न सुरू झाले होते. नुकत्याच झालेल्या 'औद्योगिक क्रान्ती'चा उपयोग शेतीविकासासाठी व्हावा असे अनेकांना वाटत होते. सर्वसामान्य शेतकऱ्यांना निरनिराळ्या संशोधनाची, शेतीपद्धतीची, यंत्रसुधारणेची माहिती मिळावी म्हणून ह्या काळात अनेक ग्रंथ, लेख जपले गेले. अशाच ग्रंथांपैकी एक ग्रंथ आहे 'कृषी ज्ञानकोश अथवा शेतकऱ्यांस, बागाइतदारांस किंवा गवळ्यांस नेहमी उपयोगी पडणारी शेती, कला, शास्त्र, तंत्र इत्यादी विषयांची संपूर्ण माहिती देणारा संदर्भग्रंथ' ह्या नावाचा. रेव्हरंड जॉन विलसनने संपादित केलेला हा ग्रंथ एडिमबर्ग (स्कॉटलंड) शहरात इ. स. १८४९ मध्ये प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथात त्याने म्हटले आहे... 'शेती आणि शेतीसुधारणा ह्यांबाबत सर्वच बाबतीत माहिती आणि मदत देण्यासाठी कृषिवस्तूसंग्रहालय हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.'

इ. स. १८४० साली हेन्री एलसवर्थने 'नॅशनल गॅलरी ऑफ सायंटीफिक, ॲग्रिकल्चरल ॲन्ड इंडस्ट्रीअल क्युरिऑसिटीज' ह्याकरिता पुष्कळशा कृषिउद्योगाच्या वस्तूंचा संग्रह केला होता.

अठराव्या शतकात– विशेषतः उत्तरार्धात-कृषिसुधारणेच्या कार्यक्रमाबरोबर कृषिवस्तूसंग्रहालय स्थापन करण्याची अहमहमिका युरोप-अमेरिकेतील देशांत लागली. काही ठिकाणी व्यक्तिगत स्वरूपाची, काही शेतकऱ्यांच्या संघटनांची, आणि काही राजपाठिंबा असलेली कृषिवस्तू संग्रहालये ह्या कालावधित उदयास आली. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, हंगेरी, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, अमेरिका इत्यादी राष्ट्रांमधून स्थापन झालेल्या कृषिवस्तूसंग्रहालयांची ख्याती एकोणीसाव्या शतकाच्या सुरवातीस सर्वत्र पसरली होती. कृषिवस्तूसंग्रहालयाची उपयुक्तता कृषिसुधारणेचा विचार करणाऱ्या विचारवंतांना पटलेली होती.

कृषिवस्तूसंग्रहालयांचे यशामुळे प्रभावित होऊन असेल, पण तत्कालीन मुंबईप्रांतातील उपकृषिसंचालक ह्या पदावर असलेल्या फ्लेचर ह्या अधिकाऱ्याने कृषिवस्तुसंग्रहालय उभारण्याची मनीषा १९०६–०७ सालच्या मुंबई प्रांत कृषिखात्याच्या वार्षिक अहवालात व्यक्त केली होती. काही नमुने फ्लेचरने गोळा केले होते असे अहवालावरून वाटते. कृषिवस्तुसंग्रहालयाबद्दल आस्था दाखविणारी कृषिखात्याच्या दप्तरी असलेली ही एकमेव नोंद. खात्याच्या नंतरच्या वार्षिक अहअहवालात कृषिवस्तुसंग्रहालयाबद्दल उल्लेख झाल्याचे निदर्शनास आले नाही. प्रशासकीय कामकाजपद्धतीमुळे फ्लेचर साहेबांची इच्छा लवकरच विरून गेली असावी असे वाटते.

परंतु कृषिवस्तुसंग्रहालयाची कल्पना पूर्णपणे विरून गेली नाही. हंगेरी देशातल्या कृषिवस्तुसंग्रहालयाचा बोलबाला जगभर होत होता. कोल्हापूर संस्थानच्या छत्रपती राजाराम महाराजांनी इंग्लंड–युरोपातील ह्या कृषिवस्तुसंग्रहालयांचे यशापयश आणि महत्त्व जाणले. त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या शेतकऱ्यांच्या उपयोगासाठी इ. स. १९२७ साली एक लाख पंच्याहत्तर हजार रुपये (तत्कालीन) खर्च करून लेडी आर्यविन कृषिवस्तुसंग्रहालय स्थापले. ह्या संग्रहालयाकरता एक स्वतंत्र दुमजली मोठी इमारत बांधून दिली. ह्या संग्रहालयात वनस्पतींचे नमुने, कृषिविषयक माहिती, जनावरांच्या जातीची मॉडेल्स इत्यादी प्रदर्शित करण्यात आले होते. कोल्हापूरसंस्थानच्या विलीनीकरणाबरोबरच हे कृषिवस्तुसंग्रहालय नष्ट करण्यात आले.

कोल्हापूर संस्थानच्या विलीनीकरणानंतर अनेक सरकारी कचेऱ्या कोल्हापूर शहरात आल्या. नव्यानेच आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या

कचेरीसाठी शोभेल अशी वास्तू हवी होती. म्हणून ह्या कृषिवस्तुसंग्रहालयातील वस्तू हलविण्यात आल्या. काही फेकून देण्यात आल्या. पुष्कळशा वस्तू बारदानात गुंडाळून एका खोलीत ठेवून देण्यात आल्या... आणि अजूनही एकेकाळच्या कृषिवस्तुसंग्रहालयाची दालने टेबले, खुर्च्या, फायली ह्यांनी भरलेली आहेत. महाराष्ट्राचे पहिलेवहिले कृषिवस्तुसंग्रहालय अशा प्रकारे नष्ट झाले आणि तेदेखील ह्या कृषिप्रधान देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या सुरवातीच्या काळात!

यदाकदाचित वस्तुसंग्रहालये ही ज्ञानकोशासारखी असतात हे प्रशासनाला पटले नसावे. नाहीतर ह्या ज्ञानसंग्रहालयाची अशी दुर्दशा झाली नसती. बुडापेस्टमधील कृषि वस्तुसंग्रहालयाने दोन जागतिक महायुद्धे आणि राजकीय उलथापालथी अनुभवलेली आहेत. परंतु अशी अवहेलना मात्र त्या संग्रहालयाच्या वाट्याला आली नाही.

कोल्हापूरचे लेडी आर्यविन कृषिवस्तू संग्रहालय अशा प्रकारे नष्ट झाले. बडोद्याचे लेडी ॲलन कृषिवस्तू संग्रहालय उपेक्षित जिणे जगत आहे.

सर आर. जी. ॲलन हे बडोदा सरकारचे कर्तबगार ॲग्रिकल्चरल कमिशनर. त्यांच्या कारकीर्दीत बडोदा संस्थानच्या शेतीविषयक कार्यक्रमाला चालना मिळाली. त्यांनी व त्यांच्या पत्नीने संस्थानच्या ग्रामीण विकास कार्यक्रमाकडे खूप लक्ष घातले होते. ह्या दोघांनी केलेल्या कामाची स्मृति म्हणून श्रीमंत सयाजीराव महाराजांनी लेडी ॲलन कृषिवस्तूसंग्रहालयाची स्थापना केली. बडोदा शहराच्या परिसरात असलेल्या ह्या संग्रहालयासाठी एक टुमदार इमारत आहे. ह्या इमारतीमध्ये एक सभागृह, छोटेसे ग्रंथालय आणि संग्रहालयाची गॅलरीवजा दालने आहेत. ह्या दालनांमधून बडोदा संस्थानमधील महत्त्वाच्या पिकांचे नमुने, मशागतीची औते औजारांची-मॉडेल्स, कीटकसंग्रह इत्यादी मांडण्यात आलेले होते.

बडोदे संस्थानच्या विलीनीकरणानंतर मुंबई राज्याच्या कृषिखात्याकडे लेडी ॲलन कृषिवस्तू संग्रहालयाचा कारभार आला. संग्रहालयाचा उद्देश काय हे न समजल्याकारणाने काटकसरीच्या धोरणाच्या नावाखाली संग्रहालयाची सूत्रे कनिष्ठ दर्जाच्या (शेतकी मदतनीस) सेवकाकडे सोपविण्यात आली. वार्षिक अनुदानात कपात करण्यात आली. कृषिखात्याच्या ह्या धोरणामुळे कृषिसंग्रहालयाची वाढच खुंटली.

कोणत्याही संग्रहालयाला जिवंत राहण्यासाठी सदैव जागरूक राहावे लागते. नवीन संग्रह, परिशीलन आणि प्रदर्शनातील नावीन्य यांच्या साहाय्याने जनतेपर्यंत पोहोचावे लागते. जुन्या पुराण्या वस्तूंचे गोदाम अशी संग्रहालयाची अवस्था झाली की, ते संग्रहालय मृतवत होते. कृषि–वस्तू–संग्रहालयाला जुन्या आणि नव्या वस्तूंची दखल घ्यावी लागते. बडोद्याच्या लेडी ॲलन कृषिवस्तूसंग्रहाला विलीनीकरणानंतर योग्य ते नेतृत्व मिळाले नाही. आर्थिक साहाय्य मिळाले नाही. जुन्या मुंबई राज्याचा वारसा घेतलेल्या गुजराथ राज्याच्या प्रशासनाकडून ह्या कृषिवस्तूसंग्रहाला फारसे प्रोत्साहन मिळालेले नाही. अवघ्या पस्तीस ते चाळीस वर्षांच्या ह्या संग्रहालयाचे कार्य असून नसल्यासारखेच आहे.

मुंबई राज्याच्या कृषिखात्याच्या कृषिवस्तूसंग्रहालयाबाबतच्या अनास्थेचे मोठे उदाहरण म्हणजे खात्याच्याच जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी कृषिवस्तुसंग्रहालय स्थापावयाच्या योजनेची फलनिष्पत्ति. कर्नाटकातले एम. पी. पाटील मुंबई राज्याचे कृषिमंत्री होते. मंत्रिमहोदयांना शेतीशिक्षण-व्यवस्थेबद्दल खूप आस्था असे. कृषिमहाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी खेड्यात जाऊन शेतकऱ्यांना नव्या शेतीपद्धतीबद्दल माहिती सहज घेता यावी, जिल्ह्यातील शेतीविकासाचे चित्र पाहता यावे, म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक कृषिवस्तूसंग्रहालय स्थापन करावे अशी त्यांची कल्पना. परंतु कल्पनाशक्तीचा अभाव असलेले कृषिखाते 'टाईप प्लॅन' च्या जंजाळात गुंतून गेले. एका धारवाड जिल्ह्याचा अपवाद वगळता कोणत्याच जिल्ह्यामधून कृषि वस्तु संग्राहलय उभे राहू शकले नाही. धारवाड जिल्हा कृषिसंघाच्या प्रयत्नाने, आणि मंत्रीमहोदयांच्या पाठिंब्यामुळे, धारवाडला 'कर्नाटक कृषिवस्तुसंग्रहालया'चे सप्टेंबर १९५६ मध्ये उद्घाटन झाले.

गुजराथप्रमाणेच कर्नाटकातील कृषिखात्याचे प्रशासन मुंबई राज्याचा वारसा घेतलेले आहे. ॲग्रिकल्चरल एक्स्टेन्शन किंवा कृषिविस्तार ह्या कामाकरता बराच पैसा खर्च करीत असताना शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्य जनतेपर्यंत सहज जाता येईल अशी कृषिवस्तुसंग्रहालयासारखी सुविधा उपेक्षिली जाते हे कशाचे लक्षण? मला मिळालेल्या माहितीप्रमाणे बडोद्याच्या लेडी ॲलन कृषिवस्तुसंग्रहालयाप्रमाणेच धारवाडचे कर्नाटक कृषिवस्तुसंग्रहालय कसेबसे जिवंत आहे.

डॉ. वि. गो. वैद्य महाराष्ट्र राज्याचे कृषिसंचालक असताना प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी 'कृषिसदन' स्थापन करण्याची एक योजना त्यांनी मांडली होती. ह्या योजनेच्या प्राथमिक चर्चेत ह्या कृषिसदनामध्ये एक छोटेसे सभागृह, एक कृषिमाहितीकेंद्र आणि कामाकरिता आलेल्या शेतकरी आणि शेतकीखात्याचे अधिकारी ह्यांच्याकरिता तात्पुरत्या निवासस्थानाची सोय असावी, असा विचार ठरला होता. पुढे ही योजना जिल्हा परिषदेमार्फत हाताळली गेली. काही ठिकाणी कृषिसदने उभी राहिली. माहिती केंद्रे मात्र उभी राहिली नाहीत. कल्पकता आणि जिद्द ह्यांची जोड असली तर त्या काळी छोट्या स्वरूपात का होईना, पण कृषिवस्तूसंग्रहालये उभी करता आली असती.

गेल्या सत्तर वर्षांत आम्ही शेतकऱ्यांच्या माहितीकरता आणि कृषिजीवनाचा इतिहास अभ्यासण्याकरता कृषिवस्तूसंग्रहालय उभारू शकलेलो नाहीत. ह्याबद्दलच्या आमच्या उदासीनतेचे फार साम्य अमेरिकेच्या कृषिखात्याच्या उदासीनतेशी आहे. ॲग्रिकल्चरल हिस्टरी सोसायटी ह्या अमेरिकेतील संस्थेचे एक अध्यक्ष डॉ. लॅमसन स्क्रिबनेर ह्यांनी २६ मे १९२१ रोजी अमेरिकन असोसिएशन ऑफ म्युझिअम्स ह्या संस्थेच्या सदस्यांच्यापुढे कृषिवस्तुसंग्रहालयावर एक प्रबंध वाचला होता. ह्या प्रबंधात एके ठिकाणी त्यांनी पुढील विचार व्यक्त केले होते.

'आमच्याकडे राष्ट्रीय दर्जाचे कृषिवस्तुसंग्रहालय नाही आणि आम्ही त्याबाबतीत कोठेच काही थोडाफार विचार केलेला आढळत नाही. असे का? शेतीव्यवसाय हा कनिष्ठ दर्जाचा, सामान्य म्हणून का आम्ही उदासीन आहोत? यदाकदाचित शास्त्रीय प्रयोग, वस्तूमधील आश्चर्य आणि कलावस्तूमधील सौंदर्य ह्यांपैकी काहीही कृषि-

विषयक वस्तूमध्ये आढळणार नाही, असा आमचा गैरसमज असावा. बहुतांशी शेतीविषयक माहिती आकर्षक पद्धतीने संग्रहालयातून दाखविली जात नसावी, म्हणून हे औदासिन्य असावे.

जवळजवळ पंचावन्न वर्षांपूर्वी अमेरिकन दृष्टिकोणाबाबत काढलेले हे उद्गार आम्हाला आजदेखील लागू पडतात.

**: ४ :**

महाराष्ट्र आणि त्याच्या पूर्वीच्या संबंधित प्रदेशातील कृषिवस्तू-संग्रहालयाच्या कल्पनेची झालेली परवड आपण पाहिली. महाराष्ट्र कृषिवस्तुसंग्रहालय का आणि कसे असावे ह्याचा विचार करण्याआधी पाश्चात्त्य देशांतील कृषिवस्तुसंग्रहालयांच्या यशापयशाचा थोडासा मागोवा घेणे जास्त संयुक्तिक होईल.

उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे असे स्पष्ट दिसते की, कृषिवस्तुसंग्रहालयाच्या कल्पनेचा पाठपुरावा इंग्लंडमध्ये केला गेला. परंतु ह्या कल्पनेला भव्यतेची जोड हंगेरीने दिली तर नावीन्याची झळाळी स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क ह्या स्कँडिनेव्हिअन राष्ट्रांतून चमकली.

ज्ञात असलेले पहिले कृषिवस्तुसंग्रहालय श्री. ड्रमाँड ह्या सधन गृहस्थाने स्टर्लिंग शहरात इ. स. १८३० मध्ये स्थापिले. ह्या वस्तुसंग्रहालयाला मिळालेले यश पाहून इ. स. १८३३ मध्ये श्री. लॉसन ह्यांनी एडिंबर्ग ह्या शहरात कृषिवस्तुसंग्रहालय सुरू केले. इ. स. १८३८ मध्ये हायलँड अॅग्रिकल्चरल सोसायटी ह्या संस्थेने एडिंबर्ग शहरातच दुसरे कृषिवस्तुसंग्रहालय स्थापन केले. ह्याच सुमारास रॉयल अॅग्रिकल्चरल सोसायटी ऑफ इंग्लंड ह्या संस्थेने लंडन शहरात कृषिवस्तुसंग्रहालय उभारले. त्यानंतर तीन एक वर्षांत (१८४१) रॉयल अॅग्रिकल्चरल इम्प्रुव्हमेंट सोसायटी ऑफ आयर्लंड ह्या संस्थेने डब्लिनमध्ये कृषिवस्तुसंग्रहालय स्थापन केले.

इ. स. १८५१ साली साजऱ्या झालेल्या महोत्सवी प्रदर्शनानंतर (ग्रेट एक्झिबिशन) एक शास्त्रविषयक वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याची सूचना प्रिन्स कन्सोर्ट (व्हिक्टोरिया राणीचे पती) ह्यांनी केली. ह्या सूचनेप्रमाणे इ. स. १८५७ साली म्युझिअम ऑफ सायन्सची स्थापना झाली. प्रथमपासून शेतीविषयक वस्तू आणि माहिती जमा करण्याचे धोरण ह्या संग्रहालयाने ठेवले होते. त्यामुळे आज ह्या संग्रहालयाजवळ जुनी मशागतीची औजारे, पेरणी यंत्रे, कोळपी, कापणी–मळणीची यंत्रे, गाड्या, दुग्धव्यवसायाची यंत्रसामग्री इत्यादींचा मोठा संग्रह आहे. अत्यंत आकर्षक पद्धतीने औते–औजारे ह्या संग्रहालयात प्रदर्शित केलेली आहेत.

ब्रिटिश म्युझिअम हे आणखी एक जुने वस्तुसंग्रहालय. ह्या संग्रहालयात शेतीच्या इतिहासाची प्रमुख साधने– हस्तलिखिते, ग्रंथ इत्यादी उपलब्ध आहेत. पूर्वीच्या इम्पिरिअल इन्स्टिटयूट– आताची कॉमनवेल्थ इन्स्टिटयूट–मधील संग्रहालयात शेतीच्या व्यापाराबद्दल पुष्कळशी माहिती, उत्पादित मालाचे नमुने इ. मांडण्यात आलेली आहे.

म्युझिअम ऑफ इकॉनॉमिक बॉटनी, क्यू गार्डन्स ह्या वनस्पतिशास्त्राच्या संग्रहालयाचे स्वरूप थोडे वेगळे आहे. इ. स. १७५९ साली वनस्पतिशास्त्राचे अभ्यासकेंद्र म्हणून सुरू झालेली ही संस्था इ. स. १८४० मध्ये म्युझिअम ऑफ इकॉनॉमिक बॉटनी ह्या नावाने राष्ट्रीय संस्था म्हणून स्वीकारली गेली. शंभर–सव्वाशे हेक्टर जागेवर पसरलेल्या विस्तीर्ण बागांमधून संग्रहालयाच्या इमारती उभ्या आहेत. बागांमधून वनस्पती छायाकुटिरे (अर्बोरेटम) आणि वनस्पती शीतकुटिरे (ग्रीन हाऊसेस) उभारण्यात आलेली आहेत. ह्या कुटिरांमधून वनस्पतींची प्रत्यक्ष वाढ पाहता येते. इमारतीमधून वनस्पतींची पाने, फुले, फळे ह्यांचे संरक्षित नमुने, मॉडेल्स, चित्रे, उपयुक्त भाग अथवा वनस्पतींपासून तयार केलेला जिन्नस ह्यांचे पद्धतशीर प्रदर्शन आहे. ह्या संग्रहालयाच्या उत्कृष्ट प्रयोगशाळांमधून वनस्पती–जीवनाचा शास्त्रीय दृष्टिकोणातून सदैव संशोधनात्मक अभ्यास चालतो. वनस्पती–जीवन हा कृषिव्यवसायाचा गाभा असल्यामुळे एका प्रकारे क्यू गार्डन्सचे म्युझिअम ऑफ इकॉनॉमिक बॉटनी हे एक कृषिवस्तुसंग्रहालय आहे असे मानता येईल.

ब्रिटिश म्युझिअम, कॉमनवेल्थ इन्स्टिटयूट, सायन्स म्युझिअम ह्याप्रमाणेच ऐतिहासिक दृष्टया उपयुक्त अशा औते औजारांचे आणि इतर कृषिसाहित्याचे संग्रह ग्रेट ब्रिटनमधील इतर काही वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केले आहेत. आयर्लंडमधील बेलफास्ट म्युझिअम अँन्ड आर्ट गॅलरी ह्या संग्रहालयाजवळ असा एक उत्तुंग संग्रह आहे.

कृषिजीवनपद्धतीचा अभ्यास करणारे 'म्युझियम ऑफ इंग्लिश रूरल लाईफ' हे १९५१ साली रिडींग विद्यापीठाने स्थापिलेले वैशिष्टयपूर्ण संग्रहालय आहे. इंग्लंडमधील ग्रामीण जीवनाच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी जमा केलेल्या साधनसामग्रीकरता हे वस्तुसंग्रहालय स्थापन केलेले आहे. कृषिव्यवसाय, ग्रामीण कारागिरी, गृहसाधने आणि ग्रामीण जीवनपद्धती ह्या चार प्रमुख वर्गीकरणाखाली ग्रामीण भागातून उपयुक्त साधनसामग्री जमविण्यात येते आहे. गेल्या पंचवीस वर्षांमध्ये ह्या संग्रहालयाजवळ औते–औजारांचा, गाड्यांचा आणि इतर कृषिसाहित्याचा बराच मोठा संग्रह झालेला आहे. अनेक अभ्यासपूर्ण प्रबंध ह्या संग्रहालयाने प्रकाशित केले आहेत. ग्रेटब्रिटनमध्ये संग्रहालयांतील कृषिवस्तुसंग्रहाची सविस्तर यादी आणि वर्गीकरण करण्याचे कार्य ह्या संग्रहालयाने नुकतेच हाती घेतले आहे.

पुरातन काळापासून इतिहासाच्या खाणाखुणा काळजीपूर्वक जतन करण्याची हौस ब्रिटनमधील लोकांना आहे. त्यामुळे बाबिलोनिअन संस्कृतीच्या काळात वापरात असणारा इजिप्तमधील पुरातन नांगर सायन्स म्युझिअममध्ये पाहायला मिळू शकतो. जनसंस्कृति संग्रहालये (फोक म्युझिअम्स) स्थापन करून पुरातन लोकजीवनपद्धतींचा अभ्यास करण्याचे प्रयत्न अठराव्या शतकापासून ब्रिटनमध्ये केले जात आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात शेतीच्या यांत्रिकीकरणाचा वेग वाढला. शेतीव्यवसायाची अर्थव्यवस्था बदलली. ह्या बदलत्या परिस्थितीचा परिणाम ग्रामीण जीवनपद्धतींवर साहजिकच होऊ लागला. एडिंबर्ग युनिव्हर्सिटी, लीड्स् युनिव्हर्सिटी, लंडन युनिव्हर्सिटी आणि रिडींग युनिव्हर्सिटी ह्या प्रमुख विद्यापीठांनी ग्रामीण जीवनपद्धतीचा आणि संस्कृतीचा अभ्यास करण्याची योजना गेल्या कित्येक वर्षांपासून स्वीकारलेली आहे. ह्या योजनेतूनच रिडींग विद्यापीठाने 'म्युझिअम ऑफ इंग्लिश रुरल लाईफ' ह्या कृषि वस्तु-संग्रहालयाचा पुरस्कार केला. विद्यापीठाकडून मिळणाऱ्या वार्षिक अनुदानामधून संग्रहालयाची आर्थिक बाजू सांभाळली जात आहे.

: ५ :

कृषि–वस्तु–संग्रहालयाच्या बाबतीत ग्रेट ब्रिटनमध्ये जरी बराच विचार होत राहिला तरी संग्रहालय जगतात आदर्श निर्माण केले हंगेरी देशातील कृषि-वस्तु-संग्रहालयाने आणि स्वीडनमधील ग्रामायन पद्धतीच्या कृषि-वस्तु-संग्रहालयाने.

हंगेरिअन अॅग्रिकल्चरल म्युझिअमने स्थापन झाल्यापासून स्वतःचे अग्रेसरत्व सदैव जोपासले आहे. हंगेरी राष्ट्राच्या स्थापनेला एक हजार वर्षे पूर्ण झाली म्हणून योजिलेल्या महोत्सवी प्रदर्शने आणि समारंभ ह्यांमधून इ. स. १८९६ मध्ये ह्या कृषि-वस्तु-संग्रहालयाची कल्पना साकारली. ह्या सहस्र–सांवत्सरिक–महोत्सवी राष्ट्रीय प्रदर्शनातील महत्त्वाच्या कृषिजीवनविषयक वस्तू सुरवातीस एका तात्पुरत्या इमारतीत मांडून संग्रहालयाची सुरुवात करण्यात आली. इग्नेशिअस अल्पार ह्या वास्तुशिल्पकाराने रचलेल्या प्रासादतुल्य इमारतीमध्ये हे संग्रहालय नंतर स्थापन करण्यात आले. हंगेरी राष्ट्रातील इमारत रचनापद्धतीतील महत्त्वाच्या विचारप्रवाहांचा सौंदर्यपूर्ण मिलाफ ह्या वास्तूच्या रचनेत साधण्यात आलेला आहे. त्याकाळी हंगेरीच्या पार्लमेंटने ह्या संग्रहालयाच्या इमारतीसाठी चार लाख डॉलर्सइतकी आणि इतर साधनसामग्रीसाठी ऐंशी हजार डॉलर्स इतकी रक्कम मंजूर केली होती.

सुरुवातीच्या काळांपासून कृषि व्यवसायाची वर्तमान प्रगत स्थिती मांडली जावी, संग्रहालय हे फक्त जुन्यापुराण्या वस्तूंचे कोठीघर होऊ नये, ह्याबद्दल ह्या हंगेरिअन कृषि-वस्तु-संग्रहालयाचे चालक दक्ष राहिलेले आहेत. त्यामुळे संशोधन आणि संग्रहालय तंत्राचा विकास ह्या ठिकाणी सदैव चालू राहिलेला आहे. दुसऱ्या महायुद्धाचे काळात ह्या संग्रहालयाची पडझड आणि नुकसान फार मोठ्या प्रमाणावर झाले होते. परंतु राष्ट्राची जिद्द ही वेगळी असते. इ. स. १९४९ ते १९५८ पर्यंत ह्या संग्रहालयाच्या इमारतींची दुरुस्ती, दालनातील प्रदर्शन व्यवस्थेची पुनर्रचना, संग्रहातील वस्तूंची तपशीलवार नोंदणी इत्यादी संग्रहालयाच्या पुनरुज्जीवनाची कामे सातत्याने चालू होती.

संग्रहालयाच्या प्रवेशद्वारातून आत आल्यानंतर प्रथम हवामान-शास्त्रविषयक माहिती मिळते. त्याच्यापलीकडे भूशास्त्रविषयक नमुने, शेतजमिनींचे वर्गीकरण आणि उत्पादनक्षमता ह्याबद्दलची माहिती, जमीन सुधारणा आणि खतांचा वापर, जमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जीवशास्त्रीय गुणधर्म दर्शविणारी माहिती ह्यांचे उत्तम प्रदर्शन आहे.

ह्यापुढे जलसिंचन व्यवस्था, जलनियंत्रण पद्धत आणि हंगेरी देशांतील ओलिताखालील क्षेत्र ह्याबद्दल तपशीलवार माहिती आहे. देशांतील जलविद्युतयोजनांची माहितीपण आहे.


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |

हंगेरी देशातील चराऊ–रानांची व्यवस्था, गवत वाढविण्याच्या पद्धती, गवतांच्या जाती, गवत कापणी आणि वाळविण्याच्या पद्धती, त्यासाठी लागणारी ओते–औजारे, गुराखी–त्यांचे वेश आणि राहण्याच्या पद्धती ह्या गोष्टी मांडण्यात आलेल्या आहेत. अन्नधान्ये, कडधान्ये, बटाटा आणि इतर कंद–मूळ पिके, वैरणीची पिके, तंबाखू इत्यादी पिकांच्या जाती, मशागतीच्या पद्धती, प्रसार आणि व्यापार ह्यांची माहिती नकाशे, चित्रे, छायाचित्रे, मॉडेल्स, संरक्षित नमुने इत्यादी प्रकारांनी दाखविण्यात आलेली आहे.

औषधोपयोगी आणि औद्योगिकदृष्टचा महत्त्वाच्या पिकांची संपूर्ण माहिती एका वेगळ्या दालनात आहे. ह्यामध्ये हंगेरीच्या 'पाप्रिका' (लाल मिरी) ह्या पिकाला प्रमुख स्थान आहे. पाप्रिका-मशागतीची लागवडीपासून ते तयार केलेली लाल मिरपूड डब्यात भरण्यापर्यंतची संपूर्ण क्रमवार माहिती प्रदर्शित केलेली आहे. ह्या पीकाखाली असणारे क्षेत्र आणि ह्या पिकाचा उद्योग–व्यापार ह्याची व्याप्ती हेदेखील दाखविण्यात आले आहे.

मका, बार्ली ह्यांच्या मशागतीच्या माहितीबरोबरच बार्ली–माल्ट तयार करण्याच्या उद्योगाचीपण माहिती दाखवलेली आहे. गहू, ओट ह्या पिकांची लागवड पद्धत दाखवलेली आहे. शेतीच्या औजारांचा विकास मॉडेल्सचा वापर करून आणि प्रत्यक्ष औजारे ठेवून दाखविण्यात आलेला आहे.

पीकसंरक्षणाबाबत कीटक आणि रोगजंतु ह्यांचे सुरक्षित नमुने, छायाचित्रे इत्यादींच्यामार्फत संपूर्ण माहिती दाखविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शेतीच्या यांत्रिकीकरणाच्या विकासाचे टप्पे प्रदर्शित केले आहेत.

कृषि शिक्षणपद्धती आणि सुविधा, फळबागशास्त्र, बाग-बगीचे, द्राक्षमळे आणि मद्य तयार करण्याच्या पद्धती, ह्या बाबतीत संग्रह-प्रदर्शन आकर्षक तऱ्हेने रचण्यात आले आहे.

शेती व्यवसायाशी संलग्नित अशा जंगल.विकास आणि वन्यप्राणी संपत्ती, मत्स्योद्यान आणि हंगेरीची मानबिंदू असणारी अश्वसंपत्ती उत्कृष्टपणे ह्या संग्रहालयातील काही स्वतंत्र दालनातून मांडली गेलेली आहे.

हंगेरीतील दुग्धव्यवसाय, पशुसंपत्ती आणि कुक्कुटपालन व्यवसाय हे रंगीत छायाचित्रे, डायोरमा, मॉडेल्स आणि व्यवसायात वापरली जाणारी यंत्रसामग्री इत्यादींच्या साहाय्याने समजावून दिले आहेत. हंगेरीमधील सामान्य शेतकऱ्यांची झोपडीवजा घरे, शाकारलेली घरे, श्रीमंत शेतकऱ्यांची आणि जमीनदारांची घरे आणि शेतीव्यवसायासाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींचे नमुने ठेवण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागातील लोकांची वाद्ये, त्यांचे वेश, घरगुती साहित्य इत्यादीदेखील ह्या संग्रहालयातील कपाटांमधून मांडण्यात आले आहे.

ग्रामीण–विशेषतः कृषिजीवन संस्कृती–विविध स्वरूपांत मांडली गेली आहे. संग्रहालयाच्या सभागृहात वेळोवेळी तज्ज्ञमंडळींची व्याख्याने आयोजित केली जातात. कृषिव्यवसायातील काही विशिष्ट प्रश्नांबाबत, विषयांबाबत, सर्वांगीण माहिती देणारी छोटी प्रदर्शने संग्रहालयातर्फे भरवली जातात. संग्रहालयाजवळ सुसज्ज यंत्रशाळा आणि प्रयोगशाळा आहेत. एक भव्य ग्रंथालय आहे. संग्रहालयातर्फे संग्रही असलेल्या वस्तूंच्या आधारे, छोटचा माहिती पुस्तिका आणि संशोधनप्रबंध प्रसिद्ध केले जातात. ह्या वैशिष्टचपूर्ण संग्रहालयाला हंगेरी देशातीलच नव्हे तर, परदेशातलेदेखील हजारो लोक आवर्जून भेट देत असतात. ह्या कृषिवस्तुसंग्रहालयाने जगातील अनेक देशांना प्रभावित केले आहे. पुष्कळशी कृषि-वस्तुसंग्रहालये ह्या हंगेरिअन संग्रहालयाच्या धर्तीवर उभारण्यात आली आहेत. इजिप्तमधील कैरो येथील कृषि-वस्तुसंग्रहालय हंगेरिअन संग्रहालयाच्या संचालकांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेले आहे.

## : ६ :

बुडापेस्ट येथील हंगेरिअन कृषि-वस्तुसंग्रहालयाप्रमाणेच कृषि-वस्तुसंग्रहालयाच्या कल्पनेवर महत्त्वाचा परिणाम स्वीडनमधील संग्रहालयांनी केला आहे. इ. स. १८९१ मध्ये डॉ. आर्थर हॅझेलिअस ह्या शिक्षकाने स्टॉकहोम शहराजवळ ग्रामायन पद्धतीचे कृषि-वस्तु-संग्रहालय उभारले. वास्तविकरीत्या हे संग्रहालय पूर्णार्थाने कृषि-वस्तुसंग्रहालय होऊ शकत नाही.

डॉ. हॅझेलिअस ह्यांच्या मूळ कल्पनेप्रमाणे स्वीडनच्या निरनिराळ्या भागातील आणि निरनिराळ्या कालखंडातील वैशिष्टचपूर्ण ग्रामीण इमारती, शेतकऱ्यांची निवासस्थाने, ग्रामीण कारागिरांचे कारखाने इत्यादी मूळ स्वरूपात उचलून आणून एका ठिकाणी उभारायच्या. ह्या इमारतींमध्ये तत्कालीन फर्निचर आणि इतर साहित्य ठेवल्यामुळे आणि तत्कालीन वेशभूषा केलेले वाटाडे किंवा साहाय्यक ठेवल्यास प्रेक्षकांना विशिष्ट कालखंडातील वातावरण अनुभवता येईल. ह्या इमारती कालखंडानुसार गटवारीने उभारायच्या. निरनिराळ्या कालखंडातील ग्रामीण इमारतींचे वैशिष्टच ह्या संग्रहात, तत्कालीन जीवनपद्धतीसह अनुभवायला मिळते.

डॉ. हॅझेलिअस ह्यांनी स्कानसेन येथे इ. स. १८९१ मध्ये उभारलेल्या संग्रहालयामध्ये पुष्कळशी घरे आहेत, जुने पुराणे चर्च आहे, पवनचक्क्या आहेत, कारखाने आहेत, बाजार आहे, घरांतून जुन्या प्रकारची भांडीकुंडी आहेत, जुन्या प्रकारचे पलंग आहेत, खुर्च्या आहेत, जुनी घडचाळे आहेत. हे सर्व त्या त्या प्रकारच्या काळाला अनुसरून आहे. ह्या ग्रामायनात त्या काळातील पद्धतीनुसार नांगराने नांगरटी होत असताना पाहता येते. काळानुरूप वेशभूषा असणाऱ्या स्त्रिया सूत कातताना, कापड विणताना दिसतात. संग्रहाला भेट देणाऱ्या प्रेक्षकाला त्या काळात प्रत्यक्ष वावरल्याची जाणीव होते.

डॉ. हॅझेलिअसची ही कल्पना लवकरच लोकप्रिय झाली. स्वीडनमधील अँडर्स झॉन ह्या चित्रकाराने उभारलेल्या छोटचाशा संग्रहालयामधील एक इमारत ९०० वर्षांपेक्षा जास्त जुनी आहे. ही कल्पना जवळच्या नॉर्वे आणि डेन्मार्क ह्या देशांनी स्वीकारली.

नॉर्वे देशातील लिलीहॅमर येथे असलेल्या संग्रहालयात जवळजवळ २६ इमारती आहेत. ह्यांपैकी काही पंधराव्या शतकातील आहेत. ऑस्लो शहराजवळ असेच एक मोठे संग्रहालय आहे. नॉर्वे देशात ठिकठिकाणी अशी संग्रहालये आहेत. कृषी आणि ग्रामीण संस्कृतीच्या खाणाखुणा सांभाळण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ह्या संग्रहालयांकडून केले जात आहे.

डेन्मार्क देशातील कोपेनहेगन शहराजवळील संग्रहालयात २०

जुन्या ग्रामीण इमारती (शेतकऱ्यांची राहण्याची घरे) आहेत. ह्या गवताने शाकारलेल्या घरांमधून तत्कालीन जीवनपद्धतीची कल्पना येते. ह्या संग्रहालयासमोरच पारंपारिक पद्धतीचे संग्रहालय आहे. ह्या कृषि-वस्तुसंग्रहालयाजवळ प्रदर्शनासाठी आठ ते नऊ हजारांवर वस्तू आहेत. डेन्मार्क देशातील शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या औते-औजारांचा खूप मोठा संग्रह आहे आणि तो आकर्षक रीतीने मांडला गेला आहे. शेतीच्या औते-औजारांचा विकास समजावून सांगण्यासाठी रेखाचित्रे, मॉडेल्स इत्यादी साहित्यांचा वापर करण्यात आलेला आहे. ग्रामीण आणि शेतीव्यवसायात वापरल्या जाणाऱ्या इमारतींची मॉडेल्स आहेत. शेतीबाबत इतर सर्व माहिती ह्या संग्रहालयात आहे.

या पद्धतीच्या संग्रहालयावर काही मर्यादा येत असल्यामुळे वेगळे मध्यवर्ती कृषि-वस्तुसंग्रहालय पूरक संग्रहालय म्हणून स्वीडनमध्ये स्वीकारण्यात आले आहे.

: ७ :

हंगेरिअन अॅग्रिकल्चरल म्युझिअम, बुडापेस्ट आणि नॉर्वे, स्वीडन आणि डेन्मार्क ह्या देशांतील कृषिसंग्रहालये ही वैशिष्टयपूर्ण आहेत. म्हणून ती जास्त प्रसिद्ध आहेत. युरोपमधील जवळजवळ प्रत्येक देशात कृषिवस्तुसंग्रहालये आहेत. सगळयांचाच उल्लेख करणे शक्य नाही.

बर्लिन येथील 'डयूशेस म्युझिअम' जवळ कृषियंत्र-औजारांचा मोठा संग्रह आहे. पॅरिसच्या 'कॉन्झर्वेटरी ऑफ आर्टस् अॅन्ड क्राफ्टस्' ह्या संग्रहालयांत शेतीच्या औते-औजारांच्या नमुन्यांचा मोठा संग्रह आहे. ह्या संग्रहालयात कृषिजीवन दर्शविणारी जलरंगातील अनेक चित्रे आहेत, छायाचित्रे आहेत.

लेनिनग्राड येथे राष्ट्रीय कृषि-वस्तुसंग्रहालय आहे. इ. स. १८५९ साली झारशाहीच्याकाळात स्थापन झालेल्या कृषि-वस्तुसंग्रहालयाची सोव्हिएट काळांत वाढ झाली आहे. ह्या संग्रहालयात तीस हजारांहून जास्त कृषिविषयक वस्तू मांडण्यात आल्या आहेत. ह्याव्यतिरिक्त मॉस्को येथे कायम स्वरूपाचे कृषि प्रदर्शन उभारलेले आहे २०७ हेक्टरवर पसरलेल्या ह्या प्रदर्शनात विस्तीर्ण बागा आहेत आणि कायम स्वरूपाचे 'पॅव्हिलिअन्स' बांधलेले आहेत. ह्या इमारतींमधून रशियन शेतीची ऐतिहासिक प्रगती दाखवली जाते.

इंग्लंड युरोपमधील कृषि-वस्तु-संग्रहालयांचे यश आणि त्यांची उपयुक्तता पटल्यामुळे इतर अनेक देशांत अशी संग्रहालये उभी राहिली. ह्यांपैकी कैरो येथे उभारण्यात आलेली दोन संग्रहालये प्रेक्षणीय आहेत. इ. स. १९३८ साली उभारलेले राष्ट्रीय कृषिवस्तु-संग्रहालय हे कैरो शहराच्या एका उपनगरात विस्तीर्ण बागेमध्ये उभारलेले आहे. संग्रहालयाचा व्याप पांच मोठ्या इमारतीमधून पसरलेला आहे. एक इमारत कार्यालयीन कामासाठी वापरण्यात आली आहे. दुसऱ्या इमारतीमध्ये इजिप्तच्या कृषि इतिहासाचा मागोवा घेणारे प्रदर्शन आहे. तिसऱ्या इमारतीमध्ये इजिप्तमधील आणि जगातील इतर काही देशांमधील कृषिविषयक वनस्पतींचा संरक्षित संग्रह आहे. चौथ्या इमारतीत वाळवंटी प्रदेशातील आणि ओअॅसिस भागातील जीवनक्रम दाखविला आहे. ह्या इमारतीतच भूसुधारणा, खतांचा वापर, निचरा आणि जलसिंचन, हवामान, कीटकशास्त्र आणि पशुसंवर्धन ह्यांबद्दल माहिती ठेवण्यात आली आहे. पांचव्या इमारतीमध्ये इजिप्तची पिके, मशागतीची साधने आणि पद्धती, फळबागा, भाजीपाला लागवड इ. बाबतीतील माहिती प्रदर्शित केली आहे.

कैरोजवळच गझीरा येथे असलेले 'कापूस संग्रहालय' हे १९२० मध्ये स्थापन करण्यात आले होते. कापसाच्या जाती, लागवडीच्या पद्धती, कापूस वेचणीपासून कापसाच्या गांठी तयार करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया मॉडेल, रेखाचित्रे, छायाचित्रे ह्यांच्या साहाय्याने दाखविण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणे सूत काढण्यापासून कापड विणण्यापर्यंतच्या प्रक्रिया दाखविण्यात आल्या आहेत, युरोपमध्ये अशी विशिष्ट पिकासाठी अथवा कृषिविषयासाठी ( उदा. कीटकशास्त्र, दुग्धव्यवसाय, रेशीम व्यवसाय इ. ) असलेली संग्रहालये विखुरलेली आहेत.

दक्षिण अमेरिकेतील ब्राझिल, अर्जेंटिना, पेरू, व्हेनिझुआला इ. देशांमधून कृषिवस्तूसंग्रहालये आहेत. हंगेरिअन संग्रहालयाच्या धर्तीवर उभारलेल्या ह्या संग्रहालयांमधून त्या त्या देशाचा शेतीविकास दर्शविण्यात आलेला आहे. कानडा देशात कृषिशैक्षणिक शाळांमधून कृषिसंग्रहालये आहेत.

कृषि इतिहास जोपासणारी अनेक लहानमोठी संग्रहालये अमेरिकेत आहेत. ह्यांपैकी काही कृषिजीवन दर्शनासाठीच उभारलेली आहेत. हेन्री मर्सर संग्रहालय हे त्यांपैकी एक जुने इ. स. १८९७ सालांत उभारलेले कृषि संग्रहालय. पेनसिल्व्हानिया राज्यांतील सुरवातीच्या काळात वापरात असणारी शेतीची अवजारे, शेतकऱ्यांची घरे. ह्यांतील साहित्य इत्यादी ह्या संग्रहालयांत आहे,

मिशिगन राज्यातील हेन्री फोर्ड म्युझिअममध्ये आधीच्या काळातील ( वसाहत काळातील ) शेतीव्यवस्था, फळबाग आणि वनव्यवसाय ह्यांच्याबद्दलची, विशेषतः साधनसामग्रीबद्दल, माहिती मिळते. मॅसॅच्युसेटस् राज्यातील हॅडले फार्म म्युझिअममध्ये वसाहत-काळातील शेतकऱ्यांच्या घरांचे नमुने, तत्कालीन औतेऔजारे, इतर साधनसामग्री पाहावयास मिळते. अशाच तऱ्हेचा संग्रह न्यूयॉर्क राज्यातील डॅनिअल पॅरिस विटर कृषिवस्तूसंग्रहालयात आढळतो. नॉर्वे देशातून वसाहतीकरता आलेल्या शेतकऱ्यांनी बरोबर आणलेली शेतीची औतेऔजारे आयोवा राज्यातील नॉर्वेजियन-अमेरिकन हिस्टॉरिकल म्युझिअममध्ये पाहावयास मिळतात.

शिकागोच्या म्युझिअम ऑफ सायन्स अॅन्ड इंडस्ट्रीमध्ये अमेरिकेतील पुरातन औतेऔजारांचा संग्रह आहे. अश्वशक्तीचा वापर करून शेतातील गवताचे भारे उचलण्यासाठी इ. स. १८४० ते १८७० ह्या काळांत संशोधिलेली तीन यंत्रे ह्या संग्रहालयाजवळ आहेत. ह्या काळात ह्या यंत्राना पेटंट मिळालेले होते. अठराव्या शतकात तयार केलेले मळणीचे एक यंत्र संग्रहात आहे. वॉशिंग्टन येथील स्मिथसोनियन इन्स्टिटयूशनमध्ये कृषि-वस्तूंचा मोठा संग्रह आहे. वसाहत-काळातील शेतकऱ्यांचे आणि त्याचबरोबर त्यांच्या गृहिणींचे श्रम वाचविण्यासाठी तयार करण्यांत आलेली औते-औजारे आणि गृहसाधने स्मिथसोनियन इन्स्टिटयूटमध्ये पाहावयास मिळतात.

जगातल्या बहुतेक देशांमधून कृषिवस्तूसंग्रहालये स्थापून शेतीव्यवसायाचा इतिहास सांभाळला गेला आहे. योग्य त्या साधनसामग्रीद्वारे मुक्त प्रशिक्षणाची सोय ह्या कृषिवस्तुसंग्रहालयामधून केली गेलेली आहे. ह्या प्रशिक्षणाद्वारे शेतीव्यवसायाचा विकास साधला गेला आहे. □ □

परंतु दादा कोंडके



# सोंगाड्ये इतके झाले!

नंदू राजे

चित्रपटधंद्याची पक्की नस सापडलेला
नट म्हणून स्वतःच्या मर्यादांची पुरेशी जाण असणारा
बाहेर न दाखवता स्वतःबद्दल प्रचंड पण
क्वाएट स्वरूपाचा आत्मविश्वास असलेला
चाणाक्ष, चतुर....
असा आहे दादा.

व्यावसायिकदृष्टचा छप्पर फाडणारे यश देणाऱ्या
सोंगाडचा, एकटा जीव, आंधळा मारतो आणि
पांडू हवालदार या चार चित्रपटांनंतर
दादाचं नवं चित्र तुमचं आमचं जमलं
एप्रिलमध्ये सर्वत्र झळकत आहे.
यानिमित्तानें दादाची
नंदू राजे यांनी सादर केलेली
ही भन्नाट कथा–आत्मकथा....

'आता मी माझी प्रतिमा थोडीदेखील बदलणार नाहीयू. लोकांनी मला सोंगाड्या म्हणून स्वीकारलंय, उचलून धरलंय, माझं अमाप कोडकौतुक केलंय. त्या प्रेक्षकांच्या कौलाखातर मला सोंगाड्या म्हणून चित्रपटात, वगाच्या बोर्डावर वावरायला हवंय, वावरणं भाग आहे. पडद्यावर वेगवेगळ्या भूमिका रंगवाव्या, असं मला अजिबात वाटतच नाहीय, अशातला भाग नाही... पण त्या रंगवून माझ्या ॲक्टींगचे काही वेगळे रंगढंग दाखवावेत, असा मूर्ख अट्टाहास माझ्याजवळ नाही. मला माझ्या मर्यादांची जाणीव आहे आणि त्याहीपेक्षा लोकांना जे हवंय तेच मला द्यायला हवंय... चित्रपट हा तमाम प्रेक्षक वर्गासाठी निघत असतो. तो मूठभर शिकल्यासवरल्या वा कलात्मक वगैरे डांगोरा पिटणाऱ्या चित्रपट समिक्षकांसाठी नसतो. चांगला चित्रपट काढ असं मला वारंवार सांगणाऱ्या मंडळींनी चांगला चित्रपट म्हणजे नेमकं काय हे सांगून किंवा विचार करून पहावं... चित्रपट हा आतबट्ट्याचा जुगारी व्यवसाय आहे आणि ते निर्माण करणारी संस्था ही दानधर्म करायला जन्मत नसते...

माझ्या चित्रपटातून मला फक्त लोकांना हसवायचं आहे... रिझवायचं आहे, त्यांचं मनोरंजन करायचं आहे. हे मी करायला कधी उणा पडलो तर ते माझं अपयश. बाकी चित्रपट चांगला वाईट आहे असली तर्कटं तद्दन फालतू आहेत...

मी प्रत्येक चित्रपटांत तोच तोच आहे म्हणणाऱ्या पंढांना माझा साधा सवाल आहे... तुम्ही किती सोंगाड्ये पाहिलेत आजपर्यंत ? चार्ली चॅप्लीन, बस्टर किटन, लॉरेल हार्डी ह्या गुणी माणसांना तुम्ही डोक्यावर घेऊन नाचताच की नाही, की ते केवळ परदेशी म्हणून थोर. मी माझी तुलना करत नाहीय... त्यांच्याबरोबर. आपापल्या परीनं ते श्रेष्ठच आहेत. पण शेकडो चित्रपटांतून हे सोंगाड्ये किती बदलले ? लकबी, वळणं ? कपडे, पोशाख. ? बदलल्या होत्या, त्या ते गुंतणाऱ्या घोळांच्या घटना. हो की नाही ? मग मी बदलावं हा मूर्ख अट्टाहास का ?... आता मी बदलणार नाही... प्रेक्षकांनी मला पाडला तर मी संपेन... पण मी बदलणं, आता तरी सोंगाड्या म्हणून शक्य नाहीय. ती वेळ केव्हाच टळून गेलीय.'

आता त्या गोष्टीला कित्येक वर्षं झाली आहेत. तरीपण दादा कोंडके या सोंगाड्याचं पहिलंवहिलं भिडणं मला अत्यंत व्हिविडली आठवतं. मुळातच मला तमाशा, वग सोंगाड्या ह्याचं फॅसिनेशन. आणि मरगळलेली मराठी नाटकं पाहून जीव आंबून गेलेला. तशाच काही मुडात एकदा अशोक शहाणे घरी टपकला होता. 'नंद्या चल, तुला काही बऱ्यापैकी दाखवतो' म्हणून लोकनाट्याला वगैरे घेऊन गेला. 'चलरे आपला रामू नगरकर आहे त्यात' वगैरे सेल्समनशिप करत. एकतर तमाशा वगाला लोकनाट्य इत्यादी मध्यमवर्गीय फालतू लेबलं लावणं म्हणजे नऊवारी साडीतल्या घसघसशीत नाचणारणीला बोर्डावरून पाचवारी नायलॉन साडीत तमाशा वगाचा, खरा ढंग, वळणं नष्ट करून टाकण्यासारखं. मला नीट आठवतं, मी जरासा रिलक्टंटलीच गेलो होतो. चला निदान ही मंडळी म्हणताऐतच तर बघून टाकू अशा केवळ वरवरच्या शिष्टसंमत भावनेपोटीच.

गणगवळण झाली. मावशीबाय कृष्णाची बतावणी सुरू झाली. चांगल्या जाडजूड रामू नगरकरला अर्ध्यामुर्ध्या साडीचोळीच्या मावशीबाईच्या रूपात बघणं फारसं बरंही वाटत नव्हतं. मावशीबायला हे साडीचोळीत आणणं शांतारामबापूंच्या रामजोशी चित्रपटानंतर वगाच्या बोर्डावर आलेलं. नामंजूर वगैरे नव्हतं किंवा हा प्रकार पारंपारिक नाही वगैरेदेखील वाटत होतं असाही भाग नव्हता. पण तरीही किंचित दातात अडकलेल्या सुपारीसारखं ते खटकत राहीलं होतं हे निश्चित. मग वग सुरू झाला. नाव काय तर विच्छा माझी पुरी करा. कथानक कुठल्याही वगासारखं सामान्य होतं. पण लवचिक रबरी हालचालींच्या सोंगाड्यामुळं त्याच्या भन्नाट स्पॉन्टेनिअस कॉमेंटस्नं मी पार उडालो... मागाहून अशोक शहाण्यानं विंगेत नेऊन ओळख करून दिली... हा दादा कोंडके... हा अमुक तमुक. आणि आम्ही दोघांनी चक्क मिठी मारली होती. त्यानंतर विच्छाचे अनेक प्रयोग मी पाहिले असतील. त्यातल्या दादाच्या इंप्रोव्हायझेशनस् ... काही विचारपूर्वक केलेल्या, तर काही चक्क स्टेजवर घेतलेल्या जागांनी अनेक वेळा चकितही होऊन गेलो होतो: काळवेळ, प्रेक्षक बघून यानं घेतलेल्या वेगवेगळ्या सोंगाड्याच्या जागांनी विच्छाचा हरेक प्रयोग कसा 'फर्स्ट टाईम फ्रेश' होतोय याबद्दल मला वाटणारं कौतुकप्रेम— निदान दादा कोंडके या सोंगाड्याबद्दल— इतकी वर्षं उलटून गेली तरी अजूनही संपलेलं नाही. आणि आता मागं वळून पाहिलं, दादा कोंडकेच्या या सोंगाड्याचा विच्छापासून ते थेट पांडू हवालदारपर्यंतचा प्रवास पाहिला की, काही गोष्टी लक्षात यायला लागतात.

तमाशाच्या मोकळ्याढाकळ्या भुईवरून वगाचा थोडाफार बंदिस्त बोर्ड राबवून अत्यंत नैसर्गिकपणे सिनेमाच्या पडद्यावर गेलेला दादा कोंडके हा इथल्या सोंगाड्याच्या पारंपारिक परंपरेतला एक ठिसूळ का होईना, पण अत्यंत महत्त्वाचा दुवा आहेयू असं मला वाटतं. एक प्रकारे दादा हा या निश्चित पारंपारिक आलेखातला एकूलता एक न शेवटचाच सोंगाड्या आहेयू असही कधी कधी वाटतं. म्हणूनच दादाबद्दल लिहिताना लिखाणाच्या व्यावसायिक मर्यादा माझ्या हातून कदाचित सुटतीलही. तो माझ्या लिखाणाचा दोषही असेल नसेल, किंवा दादाच्या अलौकिक कर्तुत्वाचा. (घाणेरडा शब्द) कारण दादा हा माणूस सोंगाड्या म्हणून अजूनतरी इनकंपेरेबल आहे. बस्टर किटन, चार्ली चॅपलीन, हॅरी लँग्डन, हॅरॉल्ड लॉईड हे जसे व्यक्तिनिष्ठ इनकंपेरेबल होते. हे जसे होते, आपापल्या देशांतले ...लॉरेल हार्डी...चार्ली चॅपलीन जसा शेवटपर्यंत इंग्लिशमन टू द बूटस् राहीला तसेच. तुलना वगैरे फालतू, गैरलागू गोष्टी आहेत. तुलनेनं दिनत्व वा मोठेपणा सिद्ध होत नसत किंवा कुणाची इनकंपेरेबल इंडिविजुआलिटी. पण दादाची उंची किंवा खोली ही तद्दन मराठी मातीतली आहेयू. ही माती काळी तांबडी नाहीय तर ही मुंबैच्या कारखान्यात घाम गाळणारी आणि तरीही ओढाळ गावरान माळाचा वास धुंडत जाणारी...नॉस्टॅलजिक... दूर सुगीला गावाकडे परतणारी आणि वर्षभर त्याची आठवण वारंवार चाळवत बसणारी...!

बस्टर किटनचा जन्म थेट वॉडेविल तमाशातच झाला. त्यातच तो

वाढला, फुलला. बोलता येण्यापूर्वीच स्टेजवर आला. पण बस्टरच्या लहानपणाला चॅपलिनच्या बालपणच्या दारिद्र्याची काव्यात्मक आर्तता नाहीय. तरी चॅपलीनदेखील वॉडेविल परंपरेतील आईबाप असलेलाच. सांगायला म्हणून का होईना कदाचित, कारखान्यात विव्हिंग मास्टर असलेले दादा कोंडकेंचे वडील होते वारकरी पंथाचे. भोरजवळील इंगवले गावाकडे थोडीफार शेतीवाडी. जातीने कोळी, पण देशावरले. तेव्हा मासेमारी वगैरे घराण्यात नव्हतीच. अशा पार्श्वभूमीवर दादासाहेब खंडेराव कोंडके या नावाचा इसम १९३१ गोकुळअष्टमीला परळनायगावच्या गिरणगाव मार्तंडच्या वाडिया इस्पितळांत जन्मला. पाळण्यात याचं नाव ठेवलं होतं दायिबाई. कारण पोर होतं अशक्त, रोगट, अधुऱ्या महिन्यांचं...जगेल का वाचेल असं. तेव्हा दायीच्या मांडीवर घातलेलं...

आयला ते कोंबड्यांची अंडी उबवतात, त्या मशीनला काय म्हणतात ?'

'इनक्यूबेटर ?'

'हा तेच तेच. सालं आपलं इंग्लिश लय कच्च हाय '

एअर कण्डीशनवाल्या आलिशान ऑफिसात असं बोलणारा दादा, मुद्दाम गावरान सूर लावून आहे अशी माझी खात्री.

'तर सालं काय, मला धावारा दिवस त्या मिशिनमध्येच ठेवून दिलं. दिवा बिवा लावून, सगळे म्हणत होते, पोर काय जगत नाही. लय अशक्त हाय. पण जगलो. दिडदोन वर्षाचा झालो तर हगवणीनं बेजार. त्यात तीन चार वर्ष गेली. शाळेत जायचं म्हटलं तर, पाटीपुस्तक उचलता नाय यायचं. बिमारी वाढतच राहिली. लय डॉक्टरवेद झाले, पाण्यासारखा पैका खर्च झाला. लोग माझ्या बाला म्हणायचे कशापाय फालतू खर्च करतोस, हे पोर वाचत नाय. सगळ्यांनी हात टेकले जनू, आणि गावासन आजोबा म्हमईला आले...'

दादाच्या आजोबांनी गावाहून येताना कसलिशी मुळी आणलेली. आठ दिवस ह्याचं औषधपाणी झालं न दादा म्हणे खडखडीत बरा झाला. दादा सांगतो त्या या असल्या गोष्टी खरंच खऱ्या घडलेल्या आहेत, का कुठलीही गोष्ट ड्रॅमाटाईज करण्याची सोंगाड्याची ती नैसर्गिक प्रवृत्ती आहेय् की, केवळ जागच्या जागी ऐकणाऱ्याला इंटरेस्ट वाटावा, त्याला हसवावं म्हणून तिथल्या तिथल्या सुचलेल्या गोष्टी आहेत हे मला नक्की कधीच सांगता येणार नाही. गेल्या अनेक वर्षांतल्या अनेक भेटीत दादा कोंडक्यानं मला या ना त्या निमित्तानं असे अनेक किस्सेगोष्टी सांगितलेल्या आहेत. या आठ-दहा वर्षात दादानं स्वतःला एकदाही किस्से सांगण्यात रिपिट केलेलं नाही. ही गोष्ट मला भलतीच संशयास्पद (आणि अर्थातच कौतुकास्पद) वाटते, कारण आताशा विसरभोळा म्हणून-बहुधा मुद्दाम निर्माण केलेल्या-प्रतिमा असलेल्या या माणसाची मेमरी अत्यंत फॅन्टॅस्टिक आहे हे मला अनुभवानं पटलेलं आहेय्. कित्येक जुन्या चित्रपटांतले संवाद सिक्वेन्स दादा बसल्या बैठकीला म्हणून, करून दाखवतो हे मी अनेकवेळा अनुभवलेलं आहेय्...

तरीही इनक्यूबेटरमध्ये ठेवला गेलेला, अपुऱ्या वाढीचा दादा कोंडके आणि त्याच्याच एकटा जीव सदाशिव चित्रपटांतला फक्त मेंढ्यांच्या कळपातल्या फक्त लोकरीवासावर जगू शकणारा सदाशिव अशा दोन समांतर आठवणी एकमेकाला छेदून जातातच. आता पक्की आठवण नाहीय्, पण मला वाटतं, हा इनक्यूबेटरवाला किस्सा दादानं त्याच चित्रपटाच्या निर्मितीच्या आसपास सांगितलेला होता... आणि ही खरंच वास्तवात घडलेली घटना आहे की, चित्रपट कथानक सारखं मनांत रेंगाळतंय म्हणून केलेलं सेल्फ ड्रॅमॅटायझेशन होतं की, केवळ आपण पत्रकाराबरोबर बोलतोय तो हा किस्सा बहुधा कुठं छापेलच म्हणून केलेला एक जाणीवपूर्वक प्रसिद्धीचा भाग होता, यातल्या अचूक रस्त्यावर नेमकं बोट ठेवणं शक्य नाहीय. आणि गंमत अशी की, दादाच्या बाबतीत या तिन्हही शक्यता विचारांत घ्यायलाच हव्या आहेत.

तीच गोष्ट दादाच्या स्वभावाबद्दल.

या माणसाच्या नेमक्या आणि अत्यंत महत्त्वाच्या स्वाभाविक नसीबर, बोट ठेवणंदेखील तितकंच अशक्य आहेय्. इतकी याची पर्सनॅलिटी अनेक उंच सखल, मृदू, कठीण कानाकोपऱ्यांनी भरलेली आहेय्. त्यांतला मृदूपणा बऱ्याच अंशी हा हिशेबाचा भागही असेल, पण त्याच्या निश्चित अस्तित्वाची ठाम जाणीव मला आहे. एकतर कुणाही माणसाच्या स्वभावाबद्दल, खुदाच्या जजमेंट सीटवर बसून त्याच्यावर बोट रोखण्याबद्दल, मला इन्स्टींक्टीव्ह तिटकारा आहे. कुणालाही संपूर्णपणे समजणं जवळपास अशक्यप्राय गोष्ट आहे, असंही मला ठामपणे वाटतं; तसा बंदिस्त अर्थ लावण्याचा कुणालाही कुणाबद्दल अधिकारही नाही, असंही. निदान मला ते भावत नाही प्रसंगोपात माणसाच्या स्वभावाला फुलणारे आश्चर्यजनक बरेवाईट धुमारे आणि मानवी स्वभावातील अनेकपदरी चमत्कृतीनं मी प्रसंगी दबलो आहे, भारावलो आहेय्... वेळोवेळी तिटकाऱ्याच्या काळोखानं झाकोळलोही गेलेलो आहे तरीही मानवी स्वभावातील विविधता, वैचित्र्य आणि त्यांची अक्षरशः अगणित परम्युटेशन्स कॉंबिनेशन्स मला नेहमीच स्तिमित करतात. त्यांतून दादासारख्या विविध पैलू असलेल्या कान्ट्रोव्हरशियल माणसाबद्दल असलेली अनेक इंप्रेशन्स—माझी,दादाच्या जवळ असणाऱ्यांची व काही आता तुटून बाजूला झालेल्यांची—व त्यांत अभिप्रेत असलेल्या विविधरंगी स्वभावसुतांची वीण अतिशय कॉम्प्लेक्स ठरावी. अशी सगळी विशेषणं, लेबलं, मतं या माणसाला लावायची— हे मुळांतच अन्यायकारक आहे. तर दादा कोंडके हा फालतू पुस्तकीज्ञानाचा अजिबात प्रभाव नसलेली, इन्स्टींकन्टीव्ह बुद्धिमत्ता असलेला, विनोदाचा—अगदी सेल्फ रिड्यूकलचा भन्नाट सेन्स असलेला, मखमली मुलायम मोज्याच्या आत प्रभावी लोखंडी पंजा बाळगणारा, टॅक्टफुल आणि तरीही रुथलेस; तरीही लाघवी, शक्यतो हसत खेळत भांडणं मिटविणारा...

, नट म्हणून, माणूस म्हणून फालतू अहंकार नसलेला, स्वतःच्या लिमिटेशन्सची पूर्णार्थानं मनातल्या मनात जाण ठेवणारा, बाहेर न दाखवता स्वतःबद्दल प्रचंड पण क्वाएट स्वरूपाचा आत्मविश्वास असलेला, चाणाक्ष, चतुर, मुत्सद्दी...व्यवहारकुशल, धंद्याची नीट जाण असणारा, माणसांची कुशल पारख करणारा...

अर्थातच या स्वभावनाण्याला माझ्या व इतरांच्या मते अनेक इतर बाजूही आहेत.

अत्यंत शिस्तप्रिय–वक्तशीर. कुठलंही व्यसन नसलेला (दादाच्या तथाकथित बाईच्या व्यसनाबद्दल फारच उलटसुलट मते आहेत आणि नेमक्या सत्यावर बोट ठेवणं कुणालाही शक्य नाही) अत्यंत साधा, लखपती असूनही कुठलेही शानशौक न करणारा, तरीही धूर्त, मतलबी, लबाड, ढोंगी, स्वार्थी, कोल्ड ब्लडेड, पैसे बुडविणारा; कामं संपल्यावर माणसं सहजी तोडून टाकणारा.

'काम संपल्यावर तू माणसं सहज तोडून टाकतोस, हे खरं काय ?' मी विचारलं.

'हे बघ नंद्या' दादानं किंचितही न थांबता सुरुवात केली होती.

'नाटक–सिनेमा हा माझा धंदा. हे व्यवसायच असे आहेत की, कुठली माणसं कोणत्या वेळी कामाला येतील, हे कुणालाच सांगता येत नाही. माणसं तोडण्याचा प्रश्न येतोच कुठं ? मला विचारशील तर, माणसं तोडणं शक्यतो मला रुचत नाही. वेळप्रसंगी पड खाऊन मी अनेक माणसांना गळ घातलेली आहे. उदाहरणार्थ निळू फुले. एक मात्र खरं की, एखादा माणूस आता माझ्या परिसरात या ना त्या कारणांनी बसू शकत नाही, असं मला वाटलं, तर मी त्याच्याकडे पाठ फिरवतो. माझ्या भोवतालची ही काही पोरं बघ. ती अतिशय लॉयल आहेत मला......पैशाबद्दल विचारशील तर, मी कुणाचं देणं ठेवत नाही. या धंद्याच्या पैशाच्या गणितात बसणारे पैसे फार असतात अशातला भाग नाही, पण ते मी चोख देतो. सिनेमा काढायचा तर नटमंडळींना द्यायचा पैसा ३५००० रुपयांवर जाता कामा नाही. त्याच्यावर बजेट गेलं की निर्माता मेलाच! बरं, गुणी आणि त्या रोलसाठी लागणारी–धंद्याच्याही दृष्टीनं–माणसं आणताना मी पैशाची खळ करीत नाही. अरुणा इराणीला विचार. पांडू हवालदारच्यावेळी मी निळू फुलेला, तो घेतो त्याच्या दुप्पट पैसे ऑफर केले होते. तो नाही म्हणाला. पण मी अडून राहत नाही कुणासाठी. ते परवडत नाही...आणि ते माझ्या स्वभावातही नाहीय्.'

'मग हजारो प्रयोग होऊनही विच्छाच्या कलाकारांचे पैसे तू वाढवून देत नाहीस ते का ?'

'हे संपूर्ण खरं नाही. शिवाय विच्छाचे बहुतेक सर्वच कलाकार या ना त्या कामासाठी माझ्या प्रॉडक्शनमध्येही गुंतलेले आहेत. त्यांपैकी कुणालाही पैशाची चणचण नाही, हे मला ठाऊक आहे.'

असं व्यवहाराचं, धंद्याचं रोखठोक, क्वचितप्रसंगी रुथलेस गणित मांडणं ही दादाची एक प्रमुख स्वभाव-नस. धंदाकामासाठी माणसं वापरून त्या प्रमाणातच त्यांना मोबदला देणं ही दुसरी. कोल्डब्लडेड मुत्सद्दीपणानं टॅक्टफुली माणसं जवळ राखणं व वेळ पडलीच तर त्यांच्यासाठी अडून न राहणं, त्यांच्याकडे पाठ फिरवणं ही तिसरी. एकूणच हा माणूस दूरदृष्टीनं, स्वतःच्या धंद्याच्या, स्वतःच्या प्रतिमेच्या भावी काळातील नफ्यासाठी पैसे इन्व्हेस्ट करेल. उदाहरणार्थ प्रेस-पत्रकारांसाठी केलेले पार्टीखर्च...थिएटर-कर्मचाऱ्यांना हरपिक्चरसे दिले जाणारे महिन्यांचे बोनस, दादानं दिलेल्या देणग्या !

वसंतराव सबनिसांसारख्या, दादानं स्वतःचा मोठा भाऊ मानलेल्या विच्छापूर्व संबंध असलेल्या लेखकाशी किंवा निळू फुलेसारख्या राष्ट्रीय, सेवादल, सोशालिस्ट पक्ष ते थेट सोंगाड्यासिनेमापर्यंत साथ देणाऱ्या जिगरदोस्ताशी दादाचे असलेले अलीकडचे संबंध हे वर म्हटलेल्या स्वभावनसांची ठळक उदाहरणं आहेतच, पण दादू इंदुरीकरसारख्या मातब्बर, गुणी; पण सध्या दारूनं पोखरल्या गेलेल्या सोंगाड्याला दादानं दिलेल्या दणक्यात आढळणारी, आणि आता जवळपास सुप्तावस्थेत असणारी दादाची गुंडपुंडाई ही या या माणसाच्या बालपणातच आढळते...

'तुझ्या अभिनयाचं वळण दादू इंदुरीकरांच्या अभिनयाच्या बाजावर बेतलेलं आहे, हे तुला मान्य आहे काय ?' मला कुणी सांगितलं होतं की, दादा हे मान्य करायला मागत नाही.

'निश्चितच, पण संपूर्ण नाही' दादा अशी सर्वांकडे कबुली देईल, याची मात्र मला खात्री नाहीय्.

'तर मग ?'

'ते सोड रे...ते मागाहून सांगतो...माझ्या गुंडगिरीबद्दल विचारत होतास ते ऐक' अशी व्हेवलेन्थवर पलटी खाऊन पुन्हा उलटपलट करत वेगवेगळ्या किस्से-गोष्टींवर येणं हे दादाचं खास ! मी अर्थातच ऐकायला तयार. शिवाय दुबळ्या, अधुऱ्या महिन्यांच्या, अशक्त पोराची गुंडगिरी ही भलतीच इंटरेस्टिंग असू शकणार.

'साला, आम्ही सी वर्गातले, म्हणजे एकदमच सी क्लास. आमची तेव्हा गँग असायची. आताचं सेनाबिना प्रकरण तेव्हा नसायचं. मला फक्त मराठी न गणित विषय आवडायचा. बाकी पुरा बोंब्ला माम्ला. इंग्रजी तर विचारूच नकोस. अजून आयला येत नाही. फक्त इंप्रेशन मारायला शब्द टाकतो. तुला आर. एम्. भट शाळा ठाऊक आहेय ?'

'म्हणजे ती परळमधली कामगार मैदानाला लागूनच असलेली ?'

'बराबर. तर आमचा एक उद्योग काय असायचा तर, मैदाना बाजूकडील पायपावरून शाळेच्या ऑफिसमध्ये शिरायचं नि गोष्टी लंपास करायच्या. विशेषकरून खडूच्या नळकांड्यांचे बक्से. पुरा लाकडाचा भुसा वगैरे भरलेले अख्खेसबंध खडू पळवायला जाम मजा यायची. कायबाय निमित्त करून ऑफिसची बारी आधीच उघडून ठेवायची आणि पायपावरून ऑफिसात. मग ते खडू लहान पोरासोरांत वाटून टाकायचे. लय मजा यायची. कधी कधी शाळा उघडायच्या आधी बाहेरच्या बोर्डावर लिवून टाकायचं 'आज कस्तुरबा जयंतीनिमित्त शाळा बंद राहील' किंवा 'आज महात्मा गांधींना पकडल्यानिमित्त संपूर्ण हरताळ पाळा' आयला शाळावाल्यांना हे उपद्व्याप कोण करतोय हे कधी गावलंच नाही.'

'शाळेत मारबिर खाल्ला की नाही !'

'तशी आपली पिंडी नेहमीच पडायची पण एकदा भलत्याच

कारणावरून खाल्ला. साला आमचा शि कलास् म्हणजे एकदमच ढ. आमच्या तासकर मास्तरांनी आमची लय काढली. तुम्ही बिन्डोक आहात, नुस्तीच मौलागिरी करता, तुम्हाला काही कार्य करायला नको. काय नाय् तर निदान निफंद वगैरे तरी लिहा. कविता करा. साला तेव्हा आपून पेटलो. घरी गेलो न म्हटलं बास गाणं लिवायचं. माझं मराठी चांगलं. खोलीत लय येरझाऱ्या घातल्या तरी गाणं सुचेना. मग खिडकीत उभा ऱ्हायलो तर झाडाला आलेलं गुलाबाचं फूल दिसलं. एकदम गाणं सुचलं. शार्दूलविक्रिडीतलं. आहेस कुठं. लय खोडाखोड करत गाणं लिवलन. फेयरबियर करून दुसऱ्या दिवशी तासकर मास्तरांच्या हातात.'

'तासकर मास्तर खूशच झाले असतील ?'

'तर ! कविता वाचली न ओरडले...कोंडके...इकडे ये. आपण चड्डीला घामाचे हात पुसत सरांजवळ. ही कविता कुठून चोरलीस ?...पहिली छडी, तिच्या आयला चोरली ? पण नाय म्हणायची सोय नाय. धा छडा खाल्या न सांगितलं की हां चोरली ती कविता मासिकातून !'

'कविता आठवते ?'

'थोडी थोडी...एक फूल झाडाला सांगत अस्त की, माझ्यामुळेच तुला शोभा आलेय, तर झाड त्या फुलाला म्हणतं की तुला खरी शोभा देवावर वाहिल्यावरच येईल...तर तेव्हा दोंदे सर आमचे प्रिन्सिपॉल होते. दोंदे सर लाख माणूस. तासकर सरांनी त्यांच्याकडे कंप्लेन केली नि दोंदे सरांनी मला त्यांच्या ऑफिसात बोलावून घेतलं. आयला आपली पिवळी व्हायची वेळ आली होती. दोंदे सरांनी विचारलं, कोंडके, ही कविता तू कुठून चोरलीस, त्या मासिकाचं नाव काय. माझी ततपप झालेली. साला बाहेरची गुंडगिरी वेगळी. हे कविताविविता प्रकरण म्हंजे कठीणच की नाय...तर शेवटी कबूल केलं की, सर ही कविता मी चोरली नाय् ही मीच केली. साला चोरली नाही सांगायला इतकी टरकलेली. तर दोंदे सर म्हणाले, ही कविता तुला कशी सुचली...तेव्हा मी त्यांना खिडकीची गोष्ट सांगितली की, असं असं मला फूल दिसलं. तशी सर म्हणाले, तू ही कविता पहिल्यानं कुठं लिहिलीस ते आणून दाखव. मग त्यांना तो खाडाखोड केलेला कागद नेऊन दिला आणि कविता शाळेच्या बोर्डावर झळकली '......

आमच्या घराच्या खालीच दारूचा अड्डा असायचा. तिथं एक माणूस यायचा. कडक्या, हाडाळ, काटकोळा. पण यानं सत्तर खून केलेले होते. तशा आम्ही पण माऱ्यामाऱ्या वगैरे करायचोच. तरी सेवादलात जाऊन सारे जहाँसे अच्छा वगैरेही म्हणत होतो. मला बॅण्डमधे चानस मिळाला कारण मी बरीच वाद्यं वाजवायचो. तर या खुन्यावरोबर त्यानं केलेले दोन खून पाहिले. ह्याचं एक होतं. हा बाकी तसा गरीब. पण कुठं माम्ल्यात अडकला व याच्या फाटक्या अंगाकडे बघून म्हणाला की, तुम कोन हो तर असं विचारणाऱ्या माणसाची भरलीच. बरं रामपुरी घालून हा शांतपणे मयताच्या सदऱ्यावर सुरा विरा पुसून साफ करून घ्यायचा–एकदम शांत. आमची बघताना गाळण उडालेली, बापरे बाप. पण हा एकदम शांत!'

'शेवटी मॅट्रिकबिट्रिक झालास की नाही ?'

'थत् तिच्या आयला. नॉन–मॅट्रिक ! ते इंग्रजीचं झेंडकं काय सोडतेय होय पिच्छा ? त्याच सुमारास सोशॅलिस्ट पार्टीत गेलो.'

'का ? राजकारणात काही खास इंटरेस्ट ?'

'चल रे–तेव्हाची हवाच होती राजकारणाची. बरं आमच्या गिरणगावात त्यावेळेस सोशॅलिस्ट पक्षच मोठा. कम्युनिस्ट वगैरे मागून आले. तेव्हा कळपाबरोबर म्हणून पक्षात गेलेलो. तिथल्या कलापथकात गाणीबिणी म्हणायची. पण त्यापेक्षा मोठा उद्योग म्हणजे कम्युनिस्टांच्या सभा उधळून लावायच्या. आम्ही पाच-पन्नास मंडळी काळेबिळे बावटे घेऊन त्यांच्या सभेला जायचो. सभा सुरू झाली झाली की ही बोंबाबोंब. दहा कोपऱ्यांतून. लाल बावटा मुर्दाबाद. सोशॅलिस्ट पक्षाचा विजय असो. त्यांना कळायचंच नाही आमची किती माणसं आहेत: सभा एकदम आऊट. एकदा मारे सभा उधळायला गेलो. लाल बावटेवाल्यांचं कलापथक आलेलं. शाहीर अमरशेख, गवाणकर, अण्णाभाऊ साठे. ही तर जबरदस्त कलावंत मंडळी. अमरशेखचं पहिलं गाणं चालू झालं...म्हटलं हे एवढं गाणं ऐकू या, मागाहून सभेची वाट लावू. दुसरं सुरू झालं... दौलतीच्या राजा, उठून सरजा...तर म्हटलं एवढं होऊ दे... भलरी घाल, तुझी भलरी चालू झालं तरी आम्ही ऐकतोच आहोत. अमरशेख म्हणजे बुलंद पहाडी आवाजाचा शाहीर. देखणा. ती सभा उधळणं झालंच नाही. तशेच परतलो. मंडळी म्हणायला लागली...साले गांडू आहात...मोठे सभा उधळायला गेले होते:'

'मग विच्छा माझी पुरी करा करण्याचा किडा केव्हा न कसा उसळला तुझ्या डोक्यात ?'

'तू थांबरे. एका सभेची गोष्ट ऱ्हायलीच. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गोळवलकरगुरुजींची सभा होती दादरच्या शिवाजी पार्कावर. आमचा कंपू गेला काळेबिळे बावटे घेऊन. सभाभर विखरून बसली आमची गँग. सभा सुरू झाली न आम्ही नेहमीप्रमाणं बोंबाबोंब सुरू केली. बा बा बा ! ह्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी आमची अशी पिंडी काढली अशी पिंडी काढली की जनमभर याद राहावी. अरे, आठ आठ दिवस नुसत्या विटकरांनी शेकून घेत होतो. ढुंगण-पाठी, पोटावरच झोपायला लागायचं......'

आजमितीला दादा कोंडके यानं लाखो रुपयांची माया जवळ केली असेल 'तू एक कोटीचा धनी असशील नाही रे ?' मी विचारलं. दार उघडून एडिटिंग रूमकडे जाणारा दादा दाराजवळच थबकला. वळला.

'नायरे असतील पाच पंचवीस लाख' सदिच्छा पिक्चर्सतर्फे त्यानं काढलेल्या सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, आंधळा मारतो डोळा व आताचा तुफान चालणारा पांडू हवालदार हे बॉक्स ऑफिसला अमाप यशाचे चित्रपट ठरलेले आहेत. अख्ख्या महाराष्ट्रभर चित्रपटांचे वितरण करणारी कामाक्षी प्रकाशन

ही डिस्ट्रिब्यूशन संस्थाही आहे. मुंबई, पुण्याला आलिशान कचेऱ्या आहेत. मुंबईला एअर कंडिशण्ड रूम, म्युझिक डिस्कशन रूम आहे. अगदी वॉल टू वॉल कारपेटिंगवाली. संस्थेच्या तीन गाड्या, एक शूटिंग जीप आहेय. नुकताच ह्यानं सिनेकॅमेरा आयात केलेला आहे...एडिटिंग रूम घेऊन त्यात मुव्हीएला आणला आहे...असा हा वाढलेला व्याप आठ-दहा वर्षांखाली विच्छा माझी पुरी करा या जवळपास सामान्य वगानं सुरू झाला. आज विच्छा जरी दादानं बंद केलं असलं तरी त्याचे १२०० च्या वर प्रयोग होऊन गेलेले आहेत....तेच विच्छा माझी पुरी करा अगदी कॅज्युअली निर्माण झालं होतं. त्याला हे इतकं अमाप, भरगोस यश मिळेल असं कुणालाही वाटलं नव्हतं.

दादानं सबनीससाहेबांना त्यांच्या ह्या वगाबद्दल गळ घातली तेव्हा तेही म्हणाले होते की, हा वग कुणी आधीच करून बघितलाय्. तो चालेल असं वाटत नाहीय्...

इथंच नेमका दादा कोंडकेचा क्वाईट कॉन्फिडन्स... यावेळी स्वतात न वगात...कामी आला होता...

'तर साले आपण त्यावेळी सहकार भांडारात कापडं फाडाय ठेवलेला शेलस्मन होतो...'

[ क्रमशः ]

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३।४।७६ ते ९।४।७६

### शेती व आर्थिक प्रगतीला नवे वळण मिळेल

शनि-मंगळ व रवी हे ग्रह सध्या भारताच्या विकासाच्या गतीला वेग आणीत आहेत. त्याचा प्रत्यय अनेक क्षेत्रांत येत आहे. शेतीच्या व्यवसायाला तांत्रिकदृष्ट्या बरीच चालना मिळणार असून या व्यवसायात भारत स्वयंपूर्ण होण्याची शक्यता आहे. अंतर्गत परिस्थितीदेखील सुधारणार आहे. उत्पादनवाढ व औद्योगिक शांतता यांचा प्रत्यय अधिक मोठ्या प्रमाणात येऊ लागणार आहे. मंदीच्या लाटेची भीती वाटत होती पण त्यातून भारत आता बाहेर पडणार आहे. राजकीयदृष्ट्या बळकट असा कॉंग्रेस पक्ष मात्र गुदमरल्यासारख्या परिस्थितीत वावरणार आहे. परिस्थितीचा रेटा लागून व पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जबरदस्त धाकाखाली तो वावरत असला तरी उत्साही मनःस्थिती बिलकूल राहणार नाही. विरोधी पक्षांत काही विचारमंथन सुरू होईल. पण त्याला परिणामाच्या दृष्टीने फारसे यश येणे कठीण आहे. बांगला व इजिप्त यांच्याबरोबरचे भारताचे संबंध जुळले जातील.

### मेष : यशाची चढती कमान

आत्मसामर्थ्याचा प्रत्यय आणून देणारा गुरू राशीत आल्यापासून मेष राशीच्या व्यक्ती सर्वत्र तेजाने तळपत आहेत. सारेच ग्रह जणू काही हात जोडून सहकार्य करण्यासाठी तयार झालेले आहेत. यावेळी मनात आणाल ते करून दाखवण्याची जिद्द निर्माण होईल. नोकरीला तर उत्तमच साथ मिळणार आहे. अधिकारात वाढ होऊन तुम्ही सायबाच्या मर्जीतील व्हाल. अनेक दिवस मागे पडलेली तुमची पगारवाढ यावेळी तुम्हाला मिळेल. मित्र हो, तुम्ही स्वतःचा एखादा व्यवसाय सुरू करा. बँका अगर सरकारी मंडळे तुम्हाला या धंद्यासाठी मदत देऊ शकतील. विवाहेच्छूंचे विवाहाचे अचानक जमेल. संसारातही आता अडचणी नाहीत. शुभ दिनांक ५, ६, ७.

**महिलांना :** घरात पाळणा हालेल. कौटुंबिक जीवन सुखमय होईल. मनाची प्रसन्नता पुन्हा येईल.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणाच्या बाबतीत तुमची विशेष हुशारी दिसेल. यश द्विगुणीत होईल.

### वृषभ : मनाला हुरूप येईल

वृषभ राशीच्या व्यक्ती खूपच सहनशील आहेत. ग्रह अनुकूल असोत वा प्रतिकूल असोत, परिस्थितीला धीम्मेपणाने तोंड देण्यात तुमचा हातखंडा आहे. आता खरे म्हणजे तुमचे ग्रहमान बरेच सुधारले आहे. त्यामानाने आता अडचणी कमी कमी होत जाणार आहेत. एवढे समाधान तुम्हाला अवश्य मिळेल, केतू बारावा आहे व शनी तिसरा आहे त्यामुळे अजून तुमचा मार्ग सुरळीत नाही एवढेच लक्षात असू द्या. बाकी सर्वसाधारणपणे हा आठवडा समाधान देणारा आहे. बरीच कामे मार्गी लागतील. धूळ खात पडलेल्या अनेक कामांना गती मिळेल. जमीन विकत घ्यायची असेल किंवा द्यायची असेल तर तो सर्व व्यवहार या आठवड्यात मार्गी लागेल. पैसा मिळाला तरी खर्च करताना हात सढळ ठेवू नका म्हणजे झाले. शुभ दिनांक ३, ६, ७.

**महिलांना :** मनात असलेली कलाविषयक हौस यावेळी पुरी होईल. पैसा हाती राहणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** उंची वस्तू खरेदीचा मोह होईल. परीक्षा असली तर जास्त काळजी घ्यावी.

### मिथुन : स्वास्थ्याची चाहूल

तुमचे मन आधीच विलक्षण चंचल. त्यातच सध्या मंगळ चंद्राच्या सहवासात येऊन बसला आहे. त्यामुळे थंड आणि गरम यांचे विलक्षण मिश्रण तुमच्या स्वभावात झाले आहे. त्यामुळे मंगळासारखे ग्रह जेव्हा चांगले येतात तेव्हा अडचणीतून मार्ग काढण्याचे सामर्थ्य आपो-

आप प्राप्त होते. हा आठवडा अनेक बाबतींत महत्त्वाचा ठरावा. प्रामुख्याने जे स्वास्थ्य गेले काही दिवस तुम्ही हरवून बसला होता त्याची चाहूल या आठवड्यात लागणार आहे. नोकरीत तुम्ही अजिबात काळजी करू नका. ज्याची तुम्हाला भीती वाटते तेच काम सहज मनासारखें पार पडेल. स्थावरात तुम्ही सहज जिंकणार आहात. तुम्हाला तुमची स्थावर-मिळकत गमावण्याची पाळी येणार नाही. मन उत्साही बनेल. कालची निराशा आज शिल्लक राहाणार नाही. शुभ दिनांक ८, ९.

**महिलांना :** प्रतिकूल परिस्थितीने मन जे कोंडल्यासारखे झाले होते त्याला प्रसन्नतेचा वारा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** भांडणांत गुंतून परीक्षा चुकवू नका. अभ्यासात काळजी घेणे जरूर आहे.

## कर्क : सतत धावपळ

शनी राशीतच आहे. साडेसाती आहे. पण ती तुम्हाला तेवढी वाईट नाही. शनीमुळे तुमचे स्थान उंचावले आहे. प्रतिष्ठा वाढली आहे. आत्मविश्वास दुणावला आहे. मंगळाने व्ययस्थानी ठाण मांडले आहे. त्याची दखल घ्यावीच लागेल. नोकरीत कामाचा ताण इतका वाढणार आहे की विश्रांती मिळणे कठीणच होईल. सहकारी रजेवर जातील व त्यांचे काम तुम्हाला करावे लागेल घरी पाहुण्यांचा तळ पडेल. त्यामुळे घरीदेखील विश्रांती मिळणे कठीण आहे. अनपेक्षित खर्चाची नवी नवी प्रकरणे उद्‌भवतील. व्यवसायात नवे जरी काही करता आले नाही तरी त्रास नाही. शेतीचा धंदा सुधारेल. पैशाची कामे होतील. शुभ दिनांक ६, ८.

**महिलांना :** मानसिक स्वास्थ्य उत्तमपैकी मिळेल. घरगुती खर्चात काटकसर करावी लागेल.

**विद्यार्थ्यांना :** नव्या क्षेत्रांत पदार्पण करण्याची संधी मिळेल.

## सिंह : अडचणी कमी होतील

सिंह राशीच्या व्यक्ती अतिशय मानी असतात; पण परिस्थितीच्या लाटा डोक्यावरून जाऊ देऊन संधी येण्याची वाट पाहात बसण्यातदेखील सिंह व्यक्ती हुशार असतात. सध्या तुम्ही त्याच परिस्थितीतून जात आहात. साडेसाती आहे संयम व धूर्तपणा यामुळे या परिस्थितीतून तुम्ही बाहेर पडाल यात शंका नाही. सध्या रवी व मंगळ आपणास अनुकूल आहेत. त्यामुळे आर्थिक स्थिती तशी काही वाईट राहाणार नाही. देणेकऱ्यांपासून त्रास होणार नाही. तुम्ही व्यापारी असाल तर व्यापारविषयक खरेदी काळजीपूर्वक करा. जमीन खरेदी करताना फसवणूक होणार नाही असे पाहा. नोकरीची परिस्थिती प्रतिकूल नाही. परंतु तात्पुरत्या बदलीची शक्यता आहे. तब्येतीला किरकोळ त्रास असला तरी काळजी करण्यासारखे काही नाही. शुभ दिनांक ३, ५, ६.

**महिलांना :** काल्पनिक चिंतेने मन त्रस्त करून घेऊ नका. पैशाची काळजी करू नका.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा असेल तर लक्ष द्या. चित्रसृष्टीच्या आकर्षणात गुंतू नका.

## कन्या : साहानुभूती मिळेल

दशमस्थानी विराजमान झालेला एकटा मंगळ तुमचे सारे मनोरथ पूर्ण करायला समर्थ आहे. फार छान असा हा आठवडा आहे. स्वतंत्र उद्योगाच्या मागे पडलेल्या योजना पुन्हा कार्यान्वित करा. आर्थिक व तांत्रिक सहकार्य मिळेल. तुमचा व्यापार असला तर त्याला चांगलीच चालना मिळणार आहे. मंदीच्या लाटेने चिंतातूर झालेले तुमचे मन आता चिंतामुक्त होईल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठ तुमच्या कलाने वागू लागतील. खासगी नोकरीत मालक तुमच्यावर एखादी खास जबाबदारी सोपवतील. प्रकृतीने गेले काही दिवस तुम्हाला साथ द्यायचे नाकारले होते, पण आता ती साथ तुम्हाला मिळू लागणार आहे. उष्णतेचे विकार जडणार नाहीत याची काळजी घ्या. शुभ दिनांक ३, ५, ६.

**महिलांना :** तब्येतीसाठी मनात काळजी करीत बसू नका. आता सारे मनासारखे घडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धी तल्लख राहील. अभ्यासाची भीती बाळगू नका.

## तूळ : व्यक्तिमत्त्व उंचावेल

तूळ राशीच्या व्यक्ती आज प्रगतीच्या शिखरावर डोलत आहेत. भाग्यस्थानी मंगळ आहे तर दशमस्थानी शनी आहे. काही उणे पडावे असे प्रतिकूल ग्रहमान नाही. सामान्यतः सर्वच क्षेत्रांत यश आणि प्रगतीची वाटचाल असा अनुभव येईल. नोकरीत वरिष्ठांना तुमच्या सल्ल्याने वागणे भाग पडेल. तुमची अनेक दिवसांची लोंबकळत पडलेली मागणी विचाराधीन राहील. या आठवड्यात प्रवासाचा योग आहे. महत्त्वाच्या शिष्टमंडळातून अगर कामासाठी दूरचा प्रवास होईल. ज्यांचा लग्नास विलंब होत होता त्यांचे लग्न यावेळी चटकन जमेल. शुभ दिनांक ३, ६.

**महिलांना :** विवाहेच्छू तरुणींचे विवाह जमतील. नोकरीत समाधान.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक खर्चासाठी नोकरीचा प्रयत्न केल्यास यश येईल.

## वृश्चिक : पुढे पाऊल पडेल

राहू-हर्शलाने तुम्हाला अगदी कोंडीत पकडले आहे. काय करावे काही कळत नाही, अशी तुमच्या मनाची स्थिती झाली आहे.


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

आमच्या इलाजाने पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्ण लाभ मिळाला असून, त्याला प्रसिद्धी मिळाली आहे. इलाजासाठी औषधीचे एक पॅकेट मोफत मागवा. इलाज सुरू झाल्याबरोबर डागाचा रंग बदलण्यास सुरवात होते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (P.) P. O. KATRI SARAI ( GAYA )

तरी पण मंगळ हा तुमच्या राशीचा स्वामी आहे व तो आठवा आहे. हा मंगळ तुमची आर्थिक गरज भागवल्याखेरीज राहणार नाही. वारसाहक्काने पैसे मिळावयाचे असल्यास ते मिळतील. लॉटरी अगर अशाच मार्गाने पैशाची गरज पूर्ण होऊ शकेल. नोकरीत स्थानांतराचा योग आहे. मात्र हे स्थानांतर वाईट आहे, असे समजू नका. राजकारणात चलती राहील. परदेशी जाण्याचा प्रसंग चटकन घडू शकेल. शुभ दिनांक ४–५–६.

**महिलांना :** माहेरची संपत्ती मिळू शकेल. जागेचा प्रश्न सुटेल.

**विद्यार्थ्यांना :** उन्हात फिरणे महागात पडेल. तब्येतीची काळजी घ्या.

## धनू : मैत्री वाढेल

आठवा शनी तब्येतीची कुरकूर चालूच ठेवणार आहे, पण त्याबद्दल निराश होऊ नका. कारण पाचवा गुरू तुमच्या पाठीशी आता खंबीरपणे उभा आहे. तो तुम्हाला काही उणे पडू देणार नाही. यावेळी प्रामुख्याने तुमचे मैत्रीचे संबंध अनेक क्षेत्रांत वाढतील. ज्यांच्या गाठीभेटी घेणे आवश्यक होते, त्यांच्या गाठीभेटी सहज पार पडू शकतील. आशादायक वातावरण राहील. मिळालेली अभिवचने प्रत्यक्षात येऊ शकतील. अडचणीच्या कोंडीतून मार्ग निघेल. नोकरी-व्यवसाय स्थिरावेल. अस्थिरपणा दूर होईल. ज्यांना बदल करावयाचा असेल त्यांना अनुकूलता आहे. विवाहाचा प्रश्न मार्गी लागेल. शुभ दिनांक ३–५–६.

**महिलांना :** मन शांत राहील. निराशा व निरुत्साह दूर होईल. नोकरीचा प्रश्न सुटेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेची काळजी करू नका. यश तुमच्या हाती आहे. मन प्रसन्न राहील.

## मकर : यश आणि यश

मंगळाचे जबरदस्त सामर्थ्य ज्या राशीत असते ती रास मकरच होय. हा मंगळ सध्या शत्रुस्थानी बसला आहे. त्यामुळे विरोधक उरणार नाहीत. अडथळे दूर होऊन तुमचा प्रत्येक मार्ग 'सरळ' होईल. राजकारणात तर सगळीकडे तुमचे नावच नाव होईल. तुमचे डावपेच यशस्वी होतील. शत्रू तर शरणागती देतील. नोकरीत खूपच मोठे यश पदरी पडणार आहे. तुमच्या अनेक योजना मार्गी लागतील. प्रमोशन, पगारवाढ असे काही तरी पदरी पडेल. चालू कामातही बदल होऊ शकेल. मात्र स्वभाव समंजस ठेवा. सामर्थ्य वाढले तरी तोल सोडू नका. शुभ दिनांक ३–५–७.

**महिलांना :** नोकरीत मोठी अधिकाराची जागा मिळेल. पैशाची कामे पार पडतील.

**विद्यार्थ्यांना :** मनःस्थिती अस्थिर राहील. विवेकाने वागणे जरूर आहे.

## कुंभ : साफल्याचे क्षण

राशिस्वामी शनी सहावा आहे तर मंगळ पाचवा आहे. गुरूसारखा सात्त्विक ग्रह तिसरा आहे. इतकी उत्तम ग्रहस्थिती असली की माणसाच्या जीवावर सफलतेचे क्षण आश्चर्यकारक रीतीने येत असतात. कुंभ व्यक्ती मुळातच काहीशा गूढ, संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या आणि यश पादाक्रांत करणाऱ्या असतात. सध्याची आपली ग्रहस्थिती हाच अनुभव आणून देणारी आहे. नोकरीव्यवसायात प्रगतीचे नवे पर्व सुरू होणार आहे. आशा-आकांक्षा पुऱ्या होण्यासारख्या घटना घडू लागणार आहेत. राजकारणात तुमच्या कर्तृत्वाला वाव मिळणार आहे. नोकरीत बढती व त्यांसाठी बदली होण्याची शक्यता आहे. शुभ दिनांक ३–४–६.

**महिलांना :** सार्वजनिक कार्यात तुमच्या सेवेचे चीज होऊन जाईल. व्यवसायाला गती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाचे यश सहज पदरी पडणार आहे. नैराश्य संपेल.

## मीन : नोकरीत निश्चिती

तुमची रास गुरुप्रधान आहे. विवेकशक्तीचे तुमच्या स्वभावावर फार मोठे नियंत्रण असते. गुरु राशिस्वामी आहे व दुसरा आहे. सामान्यतः हा आठवडा समाधानकारक आहे. फारसा त्रास वा अडचणी नाहीत. नोकरीत हा आठवडा बरीच प्रगती करणारा आहे. ज्यांच्या नोकरीत अनिश्चितता आहे त्यांची नोकरी कायम होईल. सेवानिवृत्त होण्याची भीती ज्यांना वाटते त्यांना मुदतवाढ मिळेल, तर बेकारांना धंद्यासाठी पैसे मिळतील. व्यवसायातील अडचणी कमी होतील. प्रकाशन व्यवसाय प्रगतीचा टप्पा गाठील. इतर व्यवसायही अडचणीतून बाहेर पडेल. राजकारणात चलती राहील. नव्या उद्योगाची सुरुवात करता येईल. गाठीभेटी घ्यायला अनुकूलता आहे. शुभ दिनांक ३-५-७.

**महिलांना :** संसारात स्वास्थ्य व समाधान राहील. मुलांचे कौतुक होईल.

**विद्यार्थ्यांना :** अडचणीतून तुम्ही बाहेर पडणार आहात. पैशाची अडचण नाही.

□ □

पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०